मुग्धा कर्णिक

# शब्दांचीच शस्त्रे



# शब्दांचीच शस्त्रे

डॉ. मुग्धा कर्णिक

ई साहित्य प्रतिष्ठान

“ शब्द, जिवंत शब्द,

भिजले पंख फडफडवणाऱ्या

पाखरांसारखे शब्द,

अन्यायाच्या पहाडाच्या

ठिकऱ्या ठिकऱ्या करणारे

सुरुंगासारखे शब्द,

ओल्या मातीच्या वासाचे शब्द,

प्रकाशाने झळाळणारे शब्द,

अंध सत्तेचा थरकाप उडवणारे शब्द,

गांधी आणि मार्टिन ल्युथर किंग

यांच्या छातीतली जखम व्यक्त करणारे शब्द,

म्हाताऱ्या आजीसारखे अनुभवी, शहाणे शब्द,

अपार निःशब्दतेशी एकाकार होणारे शब्द....”

-मंगेश पाडगावकर

# शब्दांचीच शस्त्रे
## डॉ. मुग्धा कर्णिक

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: **9987737237**

प्रकाशन: १३ जानेवारी २०२२


©esahity Pratishthan®2022

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



लेखिकेचा परिचय

डॉ. मुग्धा कर्णिक

जन्म १९६०

शिक्षण एम् ए समाजशास्त्र

अनुवादशास्त्रात डॉक्टरेट

डॉ. मुग्धा कर्णिक या १९९१ पासून २०१८पर्यंत- संचालक- बहिःशाल शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ होत्या. सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात मुंबई विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण विभागाच्या संचालक म्हणून २७ वर्षे कार्यरत होते. २०१८ साली निवृत्त झाल्या.

या काळात त्यांनी कोकणच्या ग्रामीण जिल्ह्यांत २००२ पर्यंत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले

त्यांच्या राजकीय लिखाणामुळे त्या मराठी परिघात समाज माध्यमांतून प्रसिद्ध आहेत. गेली अनेक वर्षे वृत्तपत्रांतूनही सामाजिक-राजकीय लेखन केले आहे. अनेक अनुवाद केले आहेत.द कुकिंग विच या नावाने त्यांनी केलेले खाद्यपदार्थांच्या कृतीचे लेखनही लोकप्रिय आहे. शैक्षणिक शिबिरांचे डिझाइनिंग आणि अंमल. यात गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, पोषणशास्त्र, जीवशास्त्रातील वनस्पती आणि प्राणीशास्त्रविषय, पर्यावरणशास्त्र, अंधश्रध्दा निर्मूलन, नाट्यप्रशिक्षण, कला या

विषयांवरील कार्यक्रम सुमारे पन्नास गावांतून केले. त्याच वेळी मुंबई शहरात विविध खुल्या- विनाअट प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची आखणी. इंडिया स्टडी सेंटर ट्रस्ट या शैक्षणिक ट्रस्टच्या त्या व्यवस्थापकीय ट्रस्टी असून या ट्रस्टमधून भारताचे भूशास्त्र, जीववैविध्य आणि पुरातत्वीय अभ्यास या क्षेत्रात काम केले जाते. निवृत्तीनंतर त्या या ट्रस्टचे पूर्णवेळ काम पाहातात. कोविड काळात ७५ ऑनलाईन अभ्यासक्रमांचे आरेखन आणि आयोजन त्यांनी केले.

त्यांची आजवरची प्रसिद्ध पुस्तके:

सहस्रकातील विज्ञान, वृक्षराजी मुंबईची, सेंट्रीज ऑफ मुंबई या तीन पुस्तकांचे संकल्पन आणि संपादन, प्रकाशन.

आयन रॅन्ड लिखित ॲटलस श्रग्ड, द फाउंटनहेड या दोन महाकादंबऱ्याचा अनुवाद.

मालाकाईट कॅस्केट या उरालच्या लोककथांचा अनुवाद

जे आर आर टॉल्कीनच्या लॉर्ड ऑफ द रिंग्ज या जगद्विख्यात अद्भुत महाकादंबरीचा अनुवाद

क्लायमेट चेंज रिकन्सिडर्ड या पुस्तिकेचा अनुवाद

आय ॲम अ ट्रोल, शॅडो आर्मीज, द गॉड डिल्यूजन, ऑन टिरनी, द रीयुनियन या राजकीय पुस्तकांचे अनुवाद.

७० हून अधिक इंग्रजी कवितांचे अनुवाद.

याच बरोबर त्यांनी विपुल स्फुटलेखन केले आहे.

या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

टीम ई साहित्य

# प्रास्ताविक

हिंदुत्ववादाचे विषार चारपाच वर्षे पेरत, त्याची मशागत करत भारतीय जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आला त्या वर्षानंतर म्हणजे २०१४ सालानंतर त्यांचे धर्मवर्चस्ववादी फॅशिस्ट स्वरूप लोकांपुढे मांडणे हे राष्ट्रकर्तव्य समजून मी करत आले आहे.

बहुसंख्य लोकांची वैचारिक पातळी घसरत चालली आहे वगैरे केवळ बोलण्यालिहिण्यापेक्षा त्यांना समोर असलेल्या संकटाची तीव्रता जाणवून देणे हे आपले काम आहे असे मी मानते. जगाचा इतिहास माहीत नसलेले, भारताचा इतिहास नेमका ठाऊक नसलेले बहुसंख्य भारतीय आहेत. आणि त्यामुळेच प्रचाराच्या भडीमारासमोर ते सहजच हतबुद्ध होतात.

मोदींच्या पंतप्रधानपदानंतर पहिल्या पाच वर्षांत देशात गोहत्याबंदीवरून मनुष्यहत्या, घरवापसीच्या नावाखाली जुलूम, नोटबंदी, जेएनयूच्या विद्यार्थ्यांना खोटेनाटे रचून तुकडेतुकडे गँग ठरवणे आणि अत्याचार करणे, विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिप्स बंद करणे, वाट्टेल ते लोक नेमणे, प्रकरणे दाबणे, प्रकरणे दाबण्यासाठी माणसेच दाबणे अशा अनेक दुष्ट गोष्टी घडल्या. याबद्दल स्पष्ट लिहायला मराठीतील वर्तमानपत्रेही घाबरत होती. तिखट टीका करणे म्हणजे जिवावरचा धोकाच झाला होता... आणि म्हणूनच या सर्वांसंबंधी विचार मांडत रहाणे महत्त्वाचे होते.

२०१३-१४ या सुरुवातीच्या उन्मादाच्या वर्षात लिहिणे म्हणजे अत्यंत खालच्या थराच्या ट्रोलिंगला सामोरे जाणे होते. तरीही सोशल मिडियावरून व्यक्त होत रहाणे हा एक पर्याय मला दिसत होता. शिवाय काही लेखन वृत्तपत्रांतूनही झाले.

मी केलेल्या लेखनातील काही महत्त्वाच्या विषयांवरचे लेख एकत्र प्रसिद्ध करावेत अशी एक फर्माईश आली.

वाटले होते, २०२१मध्ये हे घृणास्पद विचार फोफावू देणारे राज्य थोडेतरी अशक्त होईल. पण तसे निदान केंद्रात तरी झाले नाही. आपण फॅशिझमच्या वाटेवर सात वर्षांची वाटचाल मुकाट केली. इतिहास जसा घडेल तसा घडेल. पण निदान त्याच्या नोंदी, विरोधाच्या नोंदी ताज्या असतानाच शब्दांकित झाल्या होत्या याचा लेखा असायला हवा. त्याचबरोबर अवनत होत गेलेल्या समाजावर प्रखर टीका झाली तर त्याचीही नोंद असायला हवी.

म्हणून हा लेखसंग्रह.

डॉ. मुग्धा कर्णिक

कविता महाजन ही माझी धाकटी मैत्रीण मला सोडून अचानक चालती झाली. तो धक्का अजूनही अनेकदा तितक्याच तीव्रतेने जाणवतो.

स्वतः विपुल सामाजिक लेखन करणारी कविता माझ्या राजकीय लेखनाची चाहती होती. काही लिहिलेले वाचल्यावर फोनवर त्याबद्दल बोलत रहायची. स्वतःचे विचारही शेअर करायची. फार अर्थपूर्ण गहिरे नाते होते आमचे.

आता हे न होणे खूप जाणवते.

माझ्या राजकीय-सामाजिक लेखांचे हे ई पुस्तक तिच्या स्मरणी अर्पण.

मुग्धा

# लेखानुक्रम


1. **वैचारिक पातळी उंचावायची तर...**
2. **लढाऊ पत्रकार आणि सत्तामदांधांचे ट्रोलिंग**
3. **वेळ आलेली आहे**
4. **तर शिरच्छेद!**
5. **युद्धांचे दलाल आणि माध्यमांचे स्वामी**
6. **भीम पॅन्थर्स**
7. **भीम पॅन्थर्स**
8. **लोकशाहीवरील संकट आणि आपण**
9. **खुन्या गर्दीचा सैतान अवतरला आहे**
10. **पत्रकारितेचा कस लागेल**
11. **पशुसंग्रहालयात गाय**
12. **इतिहासाची बोंब आणि बोंबाबोंब**
13. **ट्रोलायण**
14. **झिंदाबाद-मुर्दाबाद**
15. **बेडकांपासून उत्क्रांत**
16. **लोकशाहीची गाय मारली जाईल...**
17. **हिंदुत्ववादी खुन्याचा कबुलीजबाब**
18. **नैतिकतेची ऐसीतैसी**
19. **वर्ष संपत असताना...**
20. **पंचगव्यात विज्ञानाचे समर्पण की तर्पण**
21. **देश म्हणजे काय हो?**

# वैचारिक पातळी उंचावायची तर...

प्रश्न आहे कोणत्याही सत्याला भिडण्यासाठी, असत्याला तोडण्यासाठी आपण किती वैचारिक तयारी दाखवतो हा. त्या सत्याला केवळ माध्यमांतून लखलखत्या चर्चा, संघर्ष समित्यांचे राजकारण, वेगळ्या वाटेने चालत असल्याचे भांडवल करून भिडता येते असे नाही. आणि असत्य केवळ पैसा, नोटा, एखादे कंत्राट मिळणे, एखादे पद मिळणे, निवडणुकीत विजय मिळून राज्य करण्याच्या बारा वाटा उघडणे अशा केवळ द्रव्यगामी कामांपुरते मर्यादित नसते.

भ्रष्टाचाराची व्याख्या आपण फार वरवरची आणि उथळ करून ठेवली आहे. पैसे खाणे किंवा अधिक पैसा कमावण्यासाठी मधल्या दुव्याला पैसे खाऊ घालणे किंवा दुसऱ्याचा अधिकार असलेले द्रव्य-मालमत्ता स्वतःच्या खिशात घालणे किंवा स्वतःच्या वाट्याचे द्रव्य काही प्रमाणात मिळवण्यासाठी त्यातला थोडा वाटा दुसऱ्याला चिडचिडत कां होईना देणे म्हणजे भ्रष्ट आचरण अशी व्याख्या सर्वसामान्यपणे केली जाते. आपली लायकी नसल्यामुळे जगण्याच्या ज्या काही सुविधा आपल्याला कमावता येणार नाहीत त्या मिळवण्यासाठी खोटेपणा करणे म्हणजे भ्रष्टाचार ही थोडी व्यापक व्याख्या.

भ्रष्ट आचाराचा आरंभ भ्रष्ट विचारांतून होतो हे सुध्दा सामान्यतः मान्य केलं जातं. पण विचारांच्या भ्रष्टतेची व्यापकता पैशाच्या व्यवहारांच्या पलिकडे पोहोचते हे मान्य केलं जात नाही. वैचारिक क्षमता असलेल्या बुध्दीवंतांनी आपल्या जीवनशैलीला धक्का लागेल असे सत्य नाकारून, तत्वे आणि विचार बाजूला सारून तथाकथित व्यवहारी विचार करून जगत रहाणे ही सर्वात मोठी नीतीभ्रष्टता आहे हे मान्य केलं जात नाही.

त्या त्या मानवी संस्कृतीच्या टप्प्यांवर बुध्दीवंतांचे विचार हे संपूर्ण मानवी क्षमतेचं मर्मस्थान असते. त्यांचे विचार भ्रष्ट किंवा अशक्त झाल्यास मानवी क्षमताच विदीर्ण होते. आणि मग तो अक्षम, अकार्यक्षमांचा समाज लायकी नसताना सुखसमृध्दीची जीवनशैली मिळवण्यासाठी भ्रष्टाचाराच्या वाटांचा राजमार्ग मळवू लागतो.

आपल्या देशात साधीसुधी कामं करण्यासाठी चिरीमिरी द्यावी लागते आणि महाप्रचंड व्यवहारांसाठी कोटीकोटींचे किकबॅक्स मिळतात याने हळहळणाऱ्या सर्वांनी यापेक्षाही मोठी शोकांतिका काय आहे त्याकडे लक्ष द्यावे. ते म्हणजे आपल्या देशातील बुध्दीवंतांनी सत्याचा मूलगामी विचार करणे नाकारले आहे. असत्याला आव्हान देण्याची आपली क्षमता ते विसरले आहेत, त्यांच्या वैचारिक क्षमतेचे विरणे देशाच्या चारित्र्याला विदीर्ण करीत आहे.

हे सारं सुरू कुठे होतं. कुणी म्हणतात, सत्ता भ्रष्ट करते. सर्वंकष सत्ता सर्वंकष भ्रष्टाचार माजवते. पण यालाच पायबंद बसावा म्हणून मानवी इतिहासात समाजव्यवस्थांनी नियम आणि राजव्यवस्थांनी कायदे करायला सुरुवात केली.

आणि नीतीविषयक प्रगल्भता वाढवण्याचे काम तत्वज्ञांनी करायला घेतले. नीतीमत्ता, नीतीभ्रष्टता, सदाचरण, दुराचरण, याची मूलतत्वे तपासण्याचे, पुन्हा घडवण्याचे कामही होत राहिले. नीतीशास्त्र आणि तत्वज्ञान विकसित होण्यामागचा मूळ हेतूच तर तो होता. आणि जेव्हा जेव्हा तत्वज्ञांनी आणि नीतीवेत्त्यांनी सत्तेपुढे पड खाल्ली किंवा आपली भूमिका बजावताना तत्वांना मुरड घातली तेव्हातेव्हा समाजप्रवाहाला नीतीभ्रष्टतेचे वळण मिळाले.

आज आम्ही आमच्या विद्यापीठांतून, शाळाशाळांतून सुमार नीतीमूल्यांची फोलपटं देतो आहोत पाठ्यपुस्तकांच्या पानांतून. आम्ही स्वतःला शिक्षण-व्यवस्थेतील चक्रांमधले दाते बनवून घेतलंय आणि फिरतोय गरगरा बटण चालू असेतोवर. स्वतःला बुध्दीवंतांच्या पंक्तीत बसवून घ्यायला आम्हाला आधार असतो तो फक्त उपाधीचा किंवा नावानंतर उमटणाऱ्या बाराखडीच्या भेळेचा.

मौखिक पाठांतरित ज्ञानाच्या मर्यादा पुस्तकांच्या छपाईनंतर ओलांडल्या गेल्या. पण आता पुस्तकी ज्ञान ही फार विचलित करणारी संज्ञा निर्माण झाली कारण पुस्तकांवरून केवळ काही वेचक ज्ञानाचे चमचे भरवणारी पाठ्यपुस्तके शिक्षणाचा मापदंड ठरू लागली. आता तर विशिष्ट पदवी नंतर विशिष्ट पदव्युत्तर आणि विशिष्ट पदव्युत्तर शिक्षणानंतर डॉक्टरेट अशी चळत रूढ झाल्यानंतर पाठ्यपुस्तकांचेही धड ज्ञान नसलेले लोक विद्वानांच्या पंक्तीत येऊन बसू लागले. डायजेस्टच्या मदतीने अनेकजण फर्स्ट क्लासही मिळवतात. कुणाकुणाच्या गरजांचा आधार घेऊन थिसिस लिहून देणारी दुकाने, थिसीस मान्य करून घेणारी केंद्रे विद्यापीठांमधून निर्माण

झाल्यावर अनेक विद्यावाचस्पती पाइपातून घरंगळले आहेत. हे झाले शिक्कामोर्तब मिळालेल्या विद्वत्तेचे दुश्चित्र.

आता या परिघाबाहेर केवळ जिज्ञासेपोटी मिळवल्या जाणाऱ्या ज्ञानाचे आणि माहितीचे चित्र कसे आहे?

इंटरनेटमुळे कुणीही कमावलेले ज्ञान सर्वदूर पोहोचणे शक्य झाले. ज्ञानक्षेत्रातील ही प्रचंड मोठी क्रांती होती. टेलिव्हिजनचा शोध १९२०मध्ये बाजारात आणला गेला. तेव्हापासून टेलिव्हिजनमधून करमणुकीबरोबरच ज्ञान आणि माहितीचा प्रसारही सुरू झाला. १९५०मध्ये इलेक्ट्रॉनिक कॉम्प्युटर्स विकसित झाले. १९६०मध्ये इंटरनेटचा लष्करासाठी विकास आणि वापर सुरू झाला. १९८०-८१मध्ये इंटरनेट सर्वसामान्यांच्या वापरासाठी, विद्यापीठांसाठी उपलब्ध झाले. १९९०मध्ये नेट कनेक्टिविटी मिळण्याची सुरुवात झाली आणि नव्या सहस्रकाच्या सुरुवातीला इंटरनेट कनेक्टिविटी ही आवश्यक बनू लागली. आता ती गृहीत धरली जाते. ज्ञान आणि संपर्क यासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाने माणसाच्या बुध्दीला, वैचारिक क्षमतेला उपलब्ध करून दिलेले समर्थ साधन.

पण जसे अन्न मिळवण्यासाठी प्रथम निर्माण झालेली शस्त्रसाधने नंतर हिंसाचार-विनाशासाठीही माणसाने वापरली तसेच आता या ज्ञान मिळवण्याच्या साधनांचे होऊ लागले आहे.

इंटरनेटद्वारे ज्या सुविधा निर्माण झाल्या त्यांपैकी अनेक सुविधा आज ज्ञानप्रसाराऐवजी अज्ञानप्रसार करताना दिसतात. इमेल, वेबसाइट्सबरोबरच सध्या सोशल मिडियातील फेसबुक, ट्वीटर, व्हॉट्सऍप साधनांच्या वापरातून तर ज्ञानाऐवजी अज्ञानाला निष्ठा वाहिल्या जाताना दिसत आहेत. सुलभसंपर्कातून जग एकवटण्याऐवजी दुहीचे निरोपच अधिक पोहोचत आहेत. वैज्ञानिकतेशी, त्यात अंतर्भूत असलेल्या विवेकविचाराशी कवडीचा संबंध नसलेले कट्टर धार्मिक गट, कट्टर वर्णद्वेषी गट, कट्टर राजकीय भूमिका असलेले गट ही साधने वापरून साऱ्या हेतूंनाच सुरुंग लावत आहेत. सोशल मिडियावरून हिंसाचाराचा संदेश पोहोचवणे, कारस्थाने करणे, खोट्याचे खरे आणि खऱ्याचे खोटे करणे सोपे झाले आहे. साऱ्या जगाला दुराचाराच्या तोंडी देणारे वेगवेगळ्या गटांचे ट्रोल्स आणि अतिरेकी यांच्यासाठी ही साधने अगदी सहजप्राप्य बनली आहेत. त्याच वेळी एखाद्या गटासाठी, भूभागासाठी सोशल मिडियाचा किंवा इंटरनेटचा वापर शासकीय पातळीवर थांबवून, किंवा लोकांना विविध कारणांनी त्यापासून वंचित ठेवून जुलमी सत्ताधारी स्वतःसाठी सोयीची परिस्थितीही निर्माण करू शकतात. जसे आज जगातील मागास सरकारांच्या भागात केले जाते.

याचीच आणखी एक बाजू अशी की याच परिवर्तनातून भरभरून करमणूक देणारी माध्यमे निर्माण झाली. मागास राजकारणी, प्रतिगामी धर्मकारणी यांच्या फासात येणारी जनता सोडून, कशाचेच काही न वाटणारा एक फार मोठा वर्ग तयार झाला.

कोण मिळवणार ज्ञान, कोण वाचणार, कोण काहीतरी गुंतागुंतीच्या प्रश्नांत लक्ष घालणार, कोण डोक्याला ताप करून देणार...

सर्वसामान्य घराघरात या विधीनिषेधशून्य, विवेकशून्य आणि अगदीच सुमार अशा मनोरंजनाच्या साधनांनी ठाण मांडले. वाचनसंस्कृती वाढवणारे किंडल किती घरात असतील, आणि टीव्हीचे एकाहून अधिक सेट्स किती घरांत असतील अभ्यास करायला हवा.

मुलांच्या अभ्यासाच्या वेळेलाही टीव्हीचा आवाज कमी न करणाऱ्या आईवडिलांनी, आजीआजोबांनी भरलेली घरे किती आहेत पाहायला हवे.

मठ्ठपणाची परमावधी असलेल्या मालिका पाहिल्या नाहीत तर आपले प्राण जातील की काय असे वाटणारी एक वयोवृध्द पिढी अनेक घरांतून मानाच्या स्थानावर आपतः असते. त्यांना दुखवायचे नाही म्हणून त्यांची मुले त्यांचे टीव्ही पाहणे सुरू ठेवतात. मग त्यांची मुले आजीआजोबांच्या सोबतीने पुन्हा तीच गचाळ करमणूक पाहून डोकी भरून घेतात. त्यांना या सुमार मनोरंजनाच्या समुद्रात चहुकडे पाणी आहे पण पिण्याला थेंबही नाही हे कळत नाही हे या देशात नक्कीच दिसते आहे. चकचकित घरे, तंडणारी माणसे यांच्या मालिका पाहाणाऱ्या लोकांच्या मनातील नीतीमूल्यांच्या व्याख्या विरविरीत होत जात चालल्या आहेत. तंत्रज्ञानातून इफेक्ट्स वापरून केलेल्या चमत्कारांच्या पौराणिक मालिका पाहून त्यांच्या डोक्यातील अविवेकाच्या श्रद्धा घट्ट होत चालल्या आहेत. ही वयोवृध्द, मानाने श्रेष्ट माणसे बेजबाबदारपणे वागत आहेत हे त्यांना कोणीही धारिष्ट्य दाखवून सांगत नाही ही मोठीच शोकांतिका आहे.

अवैचारिक मनोरंजनाला, डोक्याला ताप नको या भावनेला सोकावलेली मुले कोणत्याही मुद्द्याचा, घटनेचा, प्रणालीचा गांभीर्याने विचार करूच शकत नाहीत असा त्यांच्या मेंदूंचा साचाच बनून जातो. फार थोडी मुले या सगळ्या भेंडोळ्यातून सुटतात आणि काहीतरी वेगळे करू लागतात. ही विचार करणाऱ्या मुलांची संख्या दिवसेंदिवस कमीकमी होत चालली आहे. आणि याची चिंता या घरांना वाटत नसेल तर देशाचे कठीण आहे.

संपर्काचे हे तंत्रज्ञान आपली बौध्दिक प्रगती, उत्क्रांती करण्याऐवजी बुद्धीची क्षमता अधोगतीला नेत चालले असेल तर त्यात दोष त्या तंत्रज्ञानाचा नाही, त्याचा गैरवापर करणाऱ्या माणसांचा होता याची इतिहासात नोंद होईल.

***

# लढाऊ पत्रकार आणि सत्तामदांधांचे ट्रोलिंग

‘एडेलमन ट्रस्ट बॅरोमीटर’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एजन्सीने जगभरातील माध्यमांवरचा सामान्य लोकांचा विश्वास उडत चालला आहे असे दर्शवणारा सर्वेक्षणाचा अहवाल प्रसिध्द केला आहे. जगभर लोकांना माध्यमे ही श्रीमंतांच्या, राजकारण्यांच्या हातातील बाहुली बनून केवळ नफेखोरी करणाऱ्या कंपन्यांसारखी वागतात असे वाटते. यात भारतातील माध्यमांचाही समावेश आहे.

गंमत अशी की चोराच्या उलट्या बोंबा या न्यायाने अशीच अविश्वासार्ह, आणि पगारी प्रचार करणारी काही नवी ऑनलाईन नेटकर माध्यमे या अहवालाचा हवाला देऊन अनेक भारतीय माध्यमे कशी देशाला बदनाम करतात, असहिष्णुतेचा बागुलबुवा उभा करतात म्हणून ती अविश्वसनीय आहेत अशी बोंब ठोकू लागली आहेत. सरकारच्या विरुध्द बोलणाऱ्या पत्रकारांना प्रेस्टिट्यूट (माध्यमांतील वेश्या) असे संबोधणे, आपल्या बाजूने वळवण्यासाठी पोटार्थी पत्रकारांना उत्तेजनपर लालूच देणे  वगैरे गोष्टी सरसहा घडत आहेत. इतके की या झुंडीच्या विरुध्द ब्रही काढायला अनेक पत्रकार घाबरू लागले आहेत. तरीही अनेकजण आपला कणा टिकवून आहेत. सत्याची चाड टिकवून आहेत. अन्यायाच्या विरुध्द लिहीत, बोलत आहेत. विश्वासार्हता जी काही टिकून रहाते ती याच विरोधाचा आवाज शाबूत ठेवणाऱ्या पत्रकारांमुळे.

स्वातंत्र्यसेनानी चमेलीदेवी जैन यांच्या नावे स्त्री पत्रकारांना दिला जाणारा फार मोठ्या प्रतिष्ठेचा पुरस्कार या वर्षी आउटलुकमध्ये काम करणाऱ्या पत्रकार नेहा दीक्षित यांना देण्यात आला. या पुरस्काराचे कारण होते गेल्या वर्षीचा एक शोधवृत्तांत.

गेल्या वर्षी जुलैमध्ये त्यांनी ‘आउटलुक’ या मासिकात एक शोधवृत्तांत प्रसिध्द केला. ‘ऑपरेशन बेबीलिफ्ट’ असे त्या लेखाचे शीर्षक होते. आसाम, प. बंगालमधील काही दारिद्र्यग्रस्त आदिवासी वस्तीच्या भागांतून लहान मुलींना शिक्षणासाठी म्हणून आईवडिलांपासून दूर करून दूर गुजरात, पंजाब अशा राज्यांत पाठवले गेले. वर्ष होऊन गेले तरीही त्यांच्या आईवडिलांशी त्यांचा कोणताही संपर्क नाही. या मुली नेताना कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली नाही. त्यांना कुठे ठेवले आहे याचा काहीही पत्ता नाही. नेहा दीक्षितने अशा प्रकारे नेलेल्या एकतीस मुलींच्या प्रकरणांचा पाठपुरावा केला. तीन महिने ती या भागात फिरत होती, त्या मुलींच्या आईवडिलांना भेटत होती. त्या मुलींना पाठवण्यासाठी दुवे म्हणून काम केलेल्या संघविचाराच्या अधीन झालेल्या स्थानिकांनाही भेटत होती. हे सारे लोक रास्वसंघाच्या सेवाकार्य करणाऱ्या संघटकांच्या प्रभावाखाली आलेले लोक होते. आदिवासींना आदिवासी न म्हणता वनवासी म्हणण्याची लबाडी करणारे संघजन त्यांच्यासाठी गेली तीसेक वर्षे सेवाकार्य करीत आहेत. त्यामुळे प्रभाव तर आहेच. आदिवासी संस्कृती ही मूळ हिंदू संस्कृतीच आहे- कुठल्याही तत्वाची पूजा म्हणजे हिंदूधर्मच असतो हे त्यांचे लाडके तत्वज्ञान तिथे प्रसारित केले गेले. त्यांचे मूळ देवतार्चन अलगद काढून तिथे रामकृष्ण आणि शिव यांची रोपणी झाली. आर्थिक

मदतीची लालूच, सन्मानाची लालूच यातून ते सहज साध्य होऊ शकले. या सेवाकार्याचा डंका नेहमीच पिटला जाताना आपल्याला वेळोवेळी ऐकू येतो. आणि काही ठिकाणी खरोखरच सालसपणे काम चालत असेलही. त्यामागील हेतू संघटित हिंदू धर्माचा प्रसार करणे हाच असला तरीही अगदीच नाडलेल्याला मदतीचा हात कोणत्याही हेतूने मिळाला तरी तो उपयोगीच असतो. पण या परगण्यांमध्ये मात्र कुणाचेतरी पाऊल घसरले.

लोकांना फसवून, अंधारात ठेवून त्यांची मुले कुठेही पाठवणे आणि त्यांचा संपर्क होऊ न देणे याला साध्या भाषेत अपहरण म्हणतात. आणि ही अपहरणे संघाच्या सेवाभावी हातापायांनी केली हे सत्य नेहा दीक्षित यांनी खुलासेवार मांडले. या लेखाविरुध्द बोलणाऱ्या संघाच्या किंवा भाजपच्या लोकांनी या मुलींना नेमके कसले शिक्षण देऊन नेमके काय घडवले जाणार आहे? त्या या देशात की परदेशात कुठे आहेत? याची उत्तरे दिली नाहीत. संघाचं काम किती छान आहे, किती गोड आहे, किती मस्त आहे असल्या वर्णनांपलिकडे या मुलींचा ठावठिकाणा शोधण्यात त्यांची मदत झाली नाही. केंद्रात त्यांचे सरकार असूनही किंवा असल्यामुळेच या तक्रारींना काहीही प्रतिसाद मिळाला नाही. संघाचे काम चांगलेच असते अशी अंधश्रध्दा बाळगणाऱ्या लाखो स्वयंसेवक आणि राष्ट्रसेविकांना या प्रकरणी काही सत्य असेल तर अशी शंकाही सतावत नाही हे दुःखद आहे. नेहा दिक्षितचा अहवाल कित्येक तपशील देतो. छायाचित्रांसह खरी माणसे दाखवतो. तरीही छे ते सगळं संघविरोधकांचं कुभांड आहे अशी शहामृगी भूमिका सज्जन घेत आहेत. आणि मग दुर्वर्तनी ट्रोल तर काय त्यासाठीच पगार घेतात... हे सारे मांडल्यानंतर नेहा दीक्षितला

गलिच्छ भाषेत बलात्काराच्या धमक्या येऊ लागल्या, ती हिंदूविरोधी, देशद्रोही आहे हा लाडका आरोप तर सतत होतोच आहे. गुवाहाटी न्यायालयात ती आदिवासी समाजात दुही फैलावते असा आरोप करून तिच्याविरुध्द खटला दाखल करण्यात भाजपचे काही सदस्य सक्रीय झाले.

'बेटी बचाओ'चे 'बेटी उठाओ' कसे झाले? या मुलींचे अपहरण झाले का, त्या खरोखरच कुठे गायब झाल्या असतील हे महत्त्वाचे प्रश्न कुणालाही पडले नाहीत? मुख्य मुद्दा काय ठरला, तर नेहा दीक्षितने हे कोणत्या हेतूने लिहिलं? ती देशद्रोही आहे का?

गेली दहा वर्षे नेहा दीक्षितने मुलांच्या व्यापारासंबंधी, शोषणासंबंधी शोधपत्रकारिता केली. २०१०मध्ये मदरशांत चालणारे शोषण, २०११मध्ये सारांदाच्या जंगलात चाललेले शोषण तिने उघडकीस आणले. पण तिच्यावर कधीही हेत्वारोप झाले नाहीत. पण नव्या मनूच्या नव्या युगातले ट्रोलशिपाई हेत्वारोपांशिवाय काहीही बोलतच नसतात. प्रकाशक, संपादक सर्वांवर हेत्वारोप झाले. आणखीही काही हात पिरगळण्याच्या क्लृप्त्या वापरल्या गेल्या असतील. कारण नंतर तिचा लेख स्वीकारून छापणाऱ्या कृष्णा प्रसाद या संपादकाला आउटलुकच्या प्रकाशकांनी कोणतेही कारण न देता काढून टाकले. मग इतर माध्यमांनी चर्चा सुरू केली ती अभिव्यक्ती स्वातंत्र्याची. ज्या अन्यायग्रस्तांवर वृत्तांत होता त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कुणीही शब्द वेचले नाहीत.

गेल्या आठवड्यात पश्चिम बंगालमधून जुही चौधरी या भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्ष बाईंना अटक झाली. विजयन आणि पहिल्या महाभारत

सीरीयलमध्ये द्रौपदी म्हणून दिसलेली रुपा गांगुली यांनीही या रॅकेटला मदत केल्याचे पुढे येत आहे. आता हे बंगालच्या देशद्रोही तृणमूल सरकारने रचलेला डाव आहे वगैरे भजन सुरू झालेच आहे. पण गेल्या जुलैनंतर हे प्रकरण आता उघड होणे म्हणजे नेहा दीक्षितच्या शोधवृत्तांताला सशक्त दुजोरा मिळाल्यासारखे झाले आहे.

मुद्दा असा आहे, की असे काम करणारी, आणि गरीबातल्या गरीबांची व्यथा मांडणारी माणसंही भारतीय पत्रकारितेत आहेत. माओवादी ठरवून छळ करून मग आत्मसमर्पणाचे नाटक उभे करून पुरस्कार, पदोन्नतीसाठी माणसांच्या जिवांशी खेळ करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांविरुध्द लिहिणारे अनेक पत्रकार आहेत. निर्भयपणे त्यांना कायद्याची मदत करणारी माणसे आहेत. त्यांना सतत धमक्या येतात. पण आजकाल या धमक्यांचे रंग जरा जास्तच भडक बटबटीत झालेले दिसतात.

नेहा दीक्षित म्हणतात: “ऑनलाइन ट्रोल्सच्या हल्ल्यापासून कोणतीच स्त्री पत्रकार, कलाकार किंवा लेखिका वाचत नाही. या पूर्वी मी खाप पंचायतींच्या विरुध्द लिहिलं तेव्हा काही व्यासपीठांवरून मला काळनिळं होईपर्यंत कसं बदडावं याची आखणी केली जात होती. मी उत्तर भारतातील वधूंच्या व्यापारावर लिहिलं तेव्हा माझ्या गुह्यांगात काटेरी दांडकी, किंवा धारदार धातूची पट्टी घालून माझ्यावर बलात्कार केला जाईल असं वर्णन करण्यात आलं. ‘लव जिहाद’बद्दल मी लिहिलं तेव्हा मी ‘लष्करेतोयबा’वाली आहे असं सांगितलं गेलं. मी हिंदुत्ववादी राष्ट्रवादाबद्दल लिहिलं तेव्हा मला ‘राहूल गांधीची रखेल’ म्हटलं गेलं. गलिच्छ लैंगिक मजकूर, लिंगाची चित्रे माझ्या इनबॉक्समध्ये अनेकदा येतात. एखादा

काटेकोर सत्यमांडणी केलेला वृत्तांत दिल्यानंतर जर हा असला प्रतिसाद मिळणार असेल तर कुणाही वार्ताहराला ते खच्ची करणारं ठरतं. या मुळे घाबरलेले अनेक पत्रकार गप्पच रहाणं पसंत करतील.”

ही भीती खरी आहे. कोणत्याही मुद्द्यांवर विरोधी लिहिणाऱ्या अनेक पत्रकारांना त्यांच्या मुलीचं बरंवाईट करण्यात येईल अशा धमक्या आल्या आहेत. अलिकडेच स्वाती चतुर्वेदी यांनी लिहिलेल्या पुस्तकातील सत्यशोधानंतर तिच्यावरही ट्रोलधाड पडलीच होती. तरीही सत्य समोर आणण्याचे काम तिने पार पाडले. पण अनेक पत्रकार गप्प बसून ‘संसारामधी ऐस आपुल्या उगाच भटकत फिरू नको’ हीच वहिवाट रुळवतील हे शक्य आहे. सोशल मिडियामध्ये जसे ट्रोल्स घुसलेले आहेत तसेच पत्रकारितेतही आहेत. पत्रकारिता हे क्षेत्र ज्ञानाचे आणि विचारांचे क्षेत्र आहे. सत्यरक्षणाचे क्षेत्र आहे. त्यात शिरलेले, हाती गलिच्छ धमक्यांचा सोटा घेतलेले झोंड ही मोठी चिंताजनक गोष्ट ठरणार आहे. पत्रकार नामोहरम झाले तर मग जाहिरातींसाठी माध्यम कंपनी चालवणारे शेठिये- जे आधीच सरकारपक्षाकडे लीन आहेत- त्यांचीच पत्रकारिता चालेल.

सत्याचे वार्तांकन झाकोळणारे भयाचे हे वातावरण प्रयत्नपूर्वक दूर करायला हवे.

***

# वेळ आलेली आहे...

कसलीही विशेष लायकी नसताना केवळ संघटनेच्या पाठिंब्याच्या बळावर इतर लोकांवर जबरदस्ती करणे, आपल्याला हवं तेच करवून घेणे हे काही आपल्या समाजात नवीन नाही. इतरही अनेक देशांत ते चालूच असतं. अपवादात्मक काहीही झालेलं नाही, तरीही आय़आय़टीच्या मूड इंडिगोमधे भित्ती चित्रांमधून काढलेल्या हनुमानाची प्रतिमा शिवसेनेचे काही कार्यकर्ते आणि नेते यांनी गुंडगिरीची झलक दाखवून काढायला लावली आणि आय़आयटी सारख्या बुध्दीमान विद्यार्थ्यांच्या ठाण्याने हा बिनमहत्त्वाचा, किरकोळ प्रश्न आहे त्यावर बोलण्यासारखं काहीही नाही असं म्हणत चित्र खोडून टाकलं- यामुळे बदललेल्या रोगट वातावरणाची छाया थोडी अधिकच गडद झाली हे नक्की.

पाच वर्षांपूर्वी मुंबई विद्यापीठात रोहिंटन मिस्त्री या ख्यातनाम लेखकाची कादंबरी अभ्यासाला होती. अभ्यासक्रमाची कीर्द संपतासंपता युवानेत्याला काही चकमक हवी म्हणून त्या कादंबरीवर आक्षेप घेऊन ती अभ्यासक्रमातून काढायला भाग पाडणारी गुंडगिरी यातलीच होती. आणि घाबरून तात्काळ आज्ञापालन करणारे अधिकारीही यातलेच होते.

पोरं बाळगून रिमोटराज्य करणाऱ्या दिवंगत नेत्याच्या नावे विद्यापीठांच्या भाषा विभागात अध्यासन सुरू करण्याची घोषणा करणारे मंत्रीसंत्री यातलेच होते.

गतवर्षी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात सत्ताधारी पक्ष किंवा त्यांच्या मातृसंस्थेच्या अजेंड्याच्या विरोधात असलेल्या विद्यार्थ्यांना देशद्रोही ठरवण्याचा

जो तमाशा झाला तोही यातलाच होता. रोहित वेमुलाला आत्महत्येप्रत नेऊन सोडणारी परिस्थिती जराही न हाताळणारे विद्याजीवी यातलेच होते.

यात गुंडगिरीने मनमानी राबवणाऱ्या संघटनांचा दोष नाही. त्यांची ती सहजप्रवृत्ती आहे. असल्या प्रवृत्तींना पायबंद बसावा यासाठी व्यक्तीस्वातंत्र्यवादी लोकशाही व्यवस्थेत न्याय, माध्यमे, शिक्षण या क्षेत्रांत काम करणाऱ्या विचारी लोकांवर मोठी जबाबदारी असते.

ती जबाबदारी निभावणे त्यांनी पातळ केले की असल्या टोळीबाज आदिम प्रवृत्ती काळजात घेऊन जगणाऱ्या टिळेधारी, गंडेधारी, ताबीजधारी लोकांची सद्दी सुरू होते. त्यामुळे अपराध कुणाचा- या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आहे- वैचारिक कृतीचा आळस करत तुस्त झालेल्या विचारी लोकांचा.

यात एक असा प्रतिवाद केला जातो- ‘त्यांना’ हिंसा करायला काही वाटणार नाही. नुकसान आपलंच होणार- कदाचित् जन्माचं नुकसान. पण हा वैचारिक कृतिशीलतेचाच नव्हे तर वैचारिक उद्गाराचाही आळस केवळ गुंडगिरीपुरताच मर्यादित राहिलेला नाही.

आठ नोव्हेंबरपासून पाचशे-हजाराच्या नोटा रद्द करण्याचा जो निर्णय झाला त्यावरही विद्वत्क्षेत्रातले फार मोजके लोक स्पष्टपणे, ठामपणे विरोधात बोलत होते. अभूतपूर्व अशी परिस्थिती उद्भवली. भ्रष्टाचार संपवण्याचे नारे देत दुप्पट भ्रष्टाचाराची दालने खुली केली गेली. गरीब स्तरातील, निम्न मध्यमवर्गीय स्तरातील लोक त्यात भरडले जात राहिले. पण वृत्तपत्रांत किंवा टीव्हीचॅनेल्सवर नेहमीच बोलणाऱ्या

लिहिणाऱ्या मूठभर बहाद्दर निर्भय व्यक्तींव्यतिरिक्त, विद्वत्तेच्या सुरनळयांच्या शिड्यांच्या आधारावर सुखवस्तू नोकरी पटकावलेले विद्वान कसे चुप राहिले हे पाहात रहाणं क्लेशकारक होतं.

विद्यापीठे, इतर उच्च शिक्षण संस्था यांमधून चालणाऱ्या सामाजिक विज्ञानाच्या विभागांतून या विषयांवर भाष्य व्हायला हवे होते, चर्चांचे, वादांचे, टीकेचे मंथन व्हायला हवे होते. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, न्यायशास्त्र, कृषिअर्थशास्त्र अशा प्रत्येक विभागाविभागातून देशातल्या परिस्थितीवर कोरडे ओढले जायला हवे होते. पण ते झाले नाही हे स्पष्ट आहे.

आमच्या एका मित्राने कलाविद्याक्षेत्रातील एका सार्वजनिक संस्थेच्या जाहीर कार्यक्रमात नोटा रद्द झाल्यामुळे किती वाईट परिस्थिती उद्भवली त्याचा उल्लेख करताच त्या संस्थेचे (विरोधी पक्षाचे राजकीय पाठबळ असलेले) अध्यक्षमहोदय त्यांना समजावू लागले. अशी जाहीर टीका करणे बरे नव्हे हो...

या राज्यातले तथाकथित जाणते नेते तोंडात गुळणी धरून बसले आहेत त्यांची कारणे समजूच शकतात. पण काळा पैसा असण्याचा संबंध नसलेले खरोखरच स्वच्छ चारित्र्याचे अभ्यासू विद्वानही नको ती भानगड म्हणून तोंडाला कुलूप घालून बसतात तेव्हा या जनगणमनाचे दुर्दैव साक्षात उभे राहिलेले मला दिसते आहे.

सर्व नोकरदार विद्वानांच्या नोकऱ्या सुरक्षित आहेत, एवढ्या वर्षांच्या युनियनिझमनंतर नोकरीची शाश्वती वाटू नये अशी काहीही परिस्थिती नाही... निवृत्तीनंतर त्रास होईल असा विचार करून आमचे विद्वान कठीण घडीला गप्प

रहाणार असतील आणि सत्ताधारी झुंडीपुढे नांगी टाकणार असतील तर त्यांना सामाजिक विज्ञान विषयांतील तज्ज्ञ म्हणवून घेण्याचा अधिकारच उरत नाही.

फार थोडे... फारच थोडे विद्वान निर्भयपणे बोलत आहेत. बाकिच्यांच्या गप्प रहाण्यामुळे त्यांची सुरक्षितता दिवसेंदिवस धोक्यात येते आहे.

हैद्राबादेत रोहित वेमुलाच्या मागे उभे रहायलाही विद्वान शिक्षक पुढे आले नाहीत, जेएनयूच्या शिक्षकांचा अपवाद सोडला तर आझादीच्या मूल्यासाठी बहुसंख्य विद्यापीठे वा संस्थांमधील बहुसंख्य विद्वान मान ताठ करायला तयार नाहीत ही परिस्थिती भयावह आहे. इतके कसे पोटभरू झालो आपण?

बुध्दीजीवी, बुध्दीवादी लोक हे सत्तेचे मित्र असायला हवेत. ते सत्ताधाऱ्यांपासून दूर जाता कामा नयेत. त्यांचं बिनसलं तर ते आक्रस्ताळा गोंधळ घालू शकतात याबद्दल थोडी भीती असतेच सत्ताधाऱ्यांच्या मनात.

पण आजचे बुध्दीवादी सत्ताधाऱ्यांकडून धोका होण्याची चाहूल लागली तर लागलीच तोंडाची गुपचिळी करताना दिसतात.  आपला  देश याच बुध्दीमंतांनी अपात्र समित्यांच्या हवाली करून टाकला आहे. गजेंद्र चौहानला एका आवाजात विरोध नाही केला आपल्या बुध्दीमंतांनी. काही बोलले आणि बरेचसे गप्प राहिले. पाठ्यपुस्तक महामंडळावर थेट प्रतिगामी पुनरुज्जीवनवादी एडकेबिडके नेमले गेले- आम्ही काय करणार म्हणून शिक्षणक्षेत्रातील नामवंत गप्प राहिले. इंडियन कौन्सिल फॉर हिस्टॉरिकल रिसर्चच्या अध्यक्षपदी फुसके संशोधन असलेला, आपल्या खिशातला वायएसआर राव आणून बसवला- आता तो लोकांच्या माथी हरप्पन

नर्तिकेची मूर्ती म्हणजे पार्वती आणि तो सुप्रसिध्द पुतळा म्हणजे शिवशंकर असला बोगस रिसर्च मारू लागला आहे. आम्ही मनातल्या मनात कण्हतो फक्त.

२०१४ साली मुंबई विद्यापीठात भरलेल्या नॅशनल सायन्स काँग्रेसमध्ये पुष्पक विमानाचा अंतरिक्ष प्रवास वगैरे पतंग विज्ञानाच्या नावाखाली उडवले गेले. टिआय़एफआरचे संशोधक डॉ. वाहिया सोडले तर भल्याभल्या ज्येष्ठ विद्वानांनी दाती तृण धरले. कुणीही हा पाचोळा उडवून देण्यासाठी धजले नाही.

आता कॅशलेसने खिसे कापलेल्या लोकांना आमचे अर्थशास्त्रज्ञ अजूनही समजावून सांगत आहेत की ही उपासमारी म्हणजे देशाच्या प्रगतिपथावरचा एक टप्पा आहे म्हणून. हुकूमशहा सक्षम असेल तर लुळ्यापांगळ्या लोकशाहीपेक्षा तोच भला, स्वातंत्र्यापेक्षा समृध्द गुलामगिरी भली असं सहज म्हणू लागलेत विद्वान. आपला बलसागर नेता कल्याणकारी आहे. तुरुंगांत सडत पडलेली संशयित दहशतवाद्यांची, आदिवासी नक्षलवाद्यांची जिवंत प्रेते परिस्थिती बिघडण्याला जबाबदार आहेत असंही बिनदिक्कत मान्य करतात. डॉ. साईबाबांसारख्या विकलांग प्राध्याप्राकाच्या कारावासाविरुध्द परदेशातील विद्यापीठांचे प्राध्यापक उभे राहिले. पण देशातून कोलकाता, बिहार आणि पंजाब या केवळ तीन राज्यांतील सातआठ विद्यापीठीय प्राध्यापकांचा सहीनिशी पाठिंबा गेला.

निर्भय माणूसपण विसरून गेलो आहोत कां आम्ही पगारांच्या पिंजऱ्यांत?

खरोखर आजच्या बुध्दीवंतांची काळजी करण्याचं सत्ताधाऱ्यांना खरंच काही कारण नाही. पुरस्कार परत करणारांची रेवडी त्यांनी उडवलीच. आणि बाकी पगारी

बुध्दीवंत शासकीय पदे, हुद्दे, मानधने मिळाली की सोयिस्कर भाषणं-लेखनं करू लागतात. आजच्या सोशल मिडियाच्या जमान्यात किती कमी शिक्षक-प्राध्यापक खुल्या आवाजात बोलतात मोजून घ्यावं.

फ्रेंच इतिहासकार, तत्वज्ञ मायकेल फौकॉल्ट म्हणतो सत्तेचे खेळ कोणकोणत्या पातळ्यांवरून चालतात, लोकांच्या स्वातंत्र्यावर हुकुमशाही तत्वांची पकड कशी घट्ट होत जाते हे दाखवणं हे विद्वानांचं काम आहे. शोषण कसं चालतं ते लोकांना माहीत असतं. पण ते खिळखिळं करण्यासाठी कोणत्या वाटा चोखाळायच्या हे बुध्दीवंतांनी सांगायला हवं. जे जसं आहे त्यासमोर झुकून न रहाता परिस्थिती बदलता येणं शक्य असतं हे विद्वानांनी सोप्या भाषेत लोकांना समजावत रहाणे, वाट प्रत्यक्ष दाखवणे हेच त्यांचं-आमचं खरं काम आहे. ते करायला हवं.

नाहीतर पोटभरू विद्वानांचा धाक परिक्षांपुरताच राहील. त्याही तर गुंडाळून ठेवता येतात, कारण भयाचा राजदंड चालवणारे टिळे-गंडेधारी मवालीच बलवत्तर होत रहातील.

आजच्या भारताच्या घसरत्या लोकशाही मूल्यांच्या आणि चढत्या गुंडगिरीमूल्यांच्या संदर्भात सर्वच बुध्दीवंतांनी, -शिक्षणक्षेत्रातल्या पगारी बुध्दीवंतांनीही- आपण काय करतो आहोत, काय करणं टाळतं आहोत- याचा विचार करायलाच हवा अशी वेळ आलेली आहे. वेळ निघून जाऊ नये.

***

## तर शिरच्छेद!

सध्या भारतात सत्तासमर्थन असलेल्या अनेक बिनडोक वाचाळवीरांना शिरच्छेद करण्याची जबरी खुमखुमी आलेली आहे. जवळपास साऱ्या जगाच्या शब्दकोषातून हद्दपार झालेला शिरच्छेद हा शब्द गेल्या वर्षभरात अचानक भारतात कानावर येऊ लागला आहे.

भारतीय प्राचीन वाङ्मयात- ज्यात इतिहासाची बीजे क्वचितच असतीलही- शिरच्छेदाचे तुरळक उल्लेख आहेत. म्हणजे कृष्णाने शिशुपालाचा शिरच्छेद केला, द्रोणाचा शिरच्छेद दृष्टद्युम्नाने केला, राहूचे शिर उडवून अवकाशात फेकले गेले, किंवा शिवशंकर, दुर्गाकाली यांच्या गळयात नरमुंडमाळा असतात म्हणजे त्या नरांचे शिरच्छेद त्यांनी केलेले असतील वगैरे. या पलिकडे फारसे उल्लेख सापडत नाहीत. गेल्या सहस्रकाच्या उत्तरार्धात शिरच्छेदाची शिक्षा देण्याचे प्रमाण पाश्चात्य देशांत बरेच जास्त होते. तेव्हा भारतीयांच्या तुलनेत पाश्चात्य अगदीच रानटी होते असा आपला लाडका आणि काही प्रमाणात सत्य समज आहे. जर्मनीतील ल्यॅन्डर्स भागात, फ्रान्स, इंग्लंडमध्ये शिरच्छेदाच्या शिक्षा सरसकट फर्मावल्या जात असत. इस्लामी देश, जपान, सेल्टिक प्रांत सारीकडे शिरच्छेदाने मारणे रुळलेले होते.

ब्रिटनचा राजा पहिला चार्ल्स याला घटनात्मक राजेशाहीच्या चर्चेच्या काळात क्रॉमवेलच्या राजवटीत शिरच्छेद करून ठार करण्यात आले होते. त्या काळात

शिरच्छेदाने मृत्यू देणे हा देहान्तशिक्षेचा सर्वात सन्माननीय प्रकार मानला जात असे. कारण मारल्या जाणाऱ्या माणसांना कमीत कमी वेदना होऊन मृत्यू येत असे निरीक्षणांती ठरवण्यात आले होते. फ्रेंच राज्यक्रांतीतील दहशतीच्या राजवटीत जे घाऊक शिरच्छेद झाले त्यात जर्मन अभियंता अंटोन लुई याने डिझाइन केलेले शिरच्छेद संयत्र वापरावे आणि मरणाऱ्याला कमीत कमी त्रास व्हावा असे डॉ. जोसेफ गिलोटिनने सुचवले. तो वापर सुरू झाला आणि त्या संयत्राला गिलोटिनचेच नाव चिकटले. १९७७पर्यंत गिलोटीनने शिरच्छेद करणे फ्रान्समध्ये सुरू होते. नंतर १९८१मध्ये तेथे मृत्यूदंडाची शिक्षाच कायद्याने बंद करण्यात आली.

नाझींनीही गिलोटिनचा वापर करून हजारो लोकांचे शिरच्छेद केल्याचे उघड झाले आहे. फ्रेंच क्रांतीमधे शिरच्छेदाने १६५४९ लोकांना मारले गेले तर नाझींनीही तोडीस तोड १६००० लोकांना गिलोटिनखाली मारले. अखेर एकविसाव्या शतकात या सर्व देशांनी शिरच्छेदाची शिक्षा पूर्णपणे थांबवली. फक्त सौदी अरेबियाच्या शासनाने शारियानुसार शिरच्छेद आणि अल काइदा, आय़सिस यांच्या दहशतवाद्यांनीच शिरच्छेद करून जगाला दहशत घालण्याचे बेशरम प्रकार केले.

शिरच्छेद केल्यानंतर रक्ताच्या चिळकांड्या दूरवर उडतात, शिरही तीन फूट दूर जाऊन पडते आणि ते दृश्य अतिशय अमानुष, किळसवाणे असते अशी वर्णने आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये लोक पिकनिकसारख्या वातावरणात शिरच्छेद पाहाण्यासाठी येत ही जनविकृतीची परमावधी होती. शोषणाचा कडेलोट झाल्यानंतरची ती प्रतिक्रिया असली तरीही मानवी संवेदनाशीलतेवरचा कलंकच होता तो.

आज एकीकडे मृत्यूदंडाची शिक्षाच रद्द व्हावी यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. पण तरीही जे मृत्यूदंड होतात ते शिरच्छेदाने नसतात.

आज हे पाहाताना ऐकताना अतिशय दुःख वाटते, लाज वाटते की सत्य-शिव-सुंदराचा नामजप करणाऱ्यांच्या देशात हिंदुत्ववाद्यांची सत्ता लोकशाही सभागृहात स्थापन झालेली असताना पुन्हा शिरच्छेदाची उद्दाम भाषा होऊ लागली आहे. आणि असे काही भाषणांत ऐकले की त्याला विरोध करण्याऐवजी श्रोत्यांनाच खून चढतो आहे. असले वक्ते जनतेला अधिकाधिक पटू लागले आहेत. आणि हे बोललेले जनतेला आवडते आहे हे पाहून अधिकाधिक वक्ते उधळू लागले आहेत. विकृतीचे दुष्टचक्र गरगरत फिरते आहे.

रास्वसंघाचे एक सह प्रचारप्रमुख पदावरचे प्रचारक डॉ कुंदन चंद्रावत यांनी उज्जैन येथील सार्वजनिक सभेत बोलताना केरळच्या मुख्यमंत्र्यांचा शिरच्छेद करून ते आपल्याकडे आणून दिल्यास  एक कोटी रुपयांचे बक्षिस देण्याची घोषणा केली. आता त्यांची हकालपट्टी करण्याचे औचित्य संघाने दाखवले आहे. (अर्थात जो एकदा संघात जातो तो कायम संघातच असतो हे जसे नथुरामच्या बाबतीत खरे होते तसे कुणाच्याही बाबतीत खरे असते तो भाग वेगळा.) त्यांच्यावर कायदेशीर कारवाईही झाली. पण त्यानंतर आपले विधान मागे घेण्यापूर्वी ‘मी जे बोललो त्याला लोकांचा जो प्रतिसाद मिळाला त्यामुळे मी आनंदात आहे’ असेही त्यांनी सांगितले होते.

नेहमीच आगखाऊ बोलण्यात पुढे असणारे हैदराबादेतले भाजप आमदार टी राजासिंग योगी आदित्यनाथचे सरकार उत्तरप्रदेशमध्ये आल्यानंतर खूपच उत्साहित

झाले. आता उत्तर प्रदेशात ‘अपने बाप की सरकार’ आहे. देशभरातून सगळे रामसेवक तेथे जाऊन मंदिर बांधतील. पुढल्या वर्षी तिथे राममंदिर झालेले असेल वगैरे वक्तव्य करतानाच त्यांनी आणखी एक दुगाणी झाडून टाकली. जो अयोध्येत राममंदिराच्या बांधणीला विरोध करील त्याचा मी स्वतः शिरच्छेद करेन असे त्यांनी जाहीर केले.

पश्चिम बंगालमध्ये हनुमान जयंती जोरात साजरी करणाऱ्या एका जमावावर पोलिसांनी छडीमार केला. त्यावरून संतप्त झालेले भाजप युवा आघाडीचे नेते योगेश वार्ष्णेय यांनी आवाहन केले की कुणीही पुढे यावे ममता बानर्जींचा शिरच्छेद करावा आणि अकरा लाखाचे बक्षिस घेऊन जावे. यानंतर परिसरात तणाव निर्माण झाला, पोलिसतक्रार झाली आणि सीआयडीने दखल घेत वेगवेगळी खून, कारस्थान, जनसमुदाय भडकावणे याबाबतची कलमे लावून कारवाईस सुरुवात केली आहे. भाजपच्या नेत्यांनी हा मूर्खपणा आहे असे म्हणून वार्ष्णेयपासून अंतर राखायला सुरुवात केली. इकडे आणखी एक मूर्ख शिरोमणी टिपू सुलतान मशिदीचे इमाम- जे ममतांच्या निकटवर्ती आहेत म्हणे त्यांनी कडी केली- वार्ष्णेयचे शिर कापून आणणारास त्यांनी बावीस लाखाचे बक्षीस जाहीर केले. तुम्ही एक वेडे तर आम्ही दुप्पट वेडे. मग आणखी एकजण सरसावले- समाजवादी पक्षाचे माजी आमदार जमीर उल्ला म्हणाले वार्ष्णेयची जीभ कापून आणा. वार्ष्णेयने मी हे रागाच्या भरात बोललो असे सांगून माफी वगैरे मागून टाकली. राग येणे, मारामाऱ्या हे काही राजकारणात नवीन नाही. पण प्रश्न आहे तो बदललेल्या भाषेचा. आपली संतापाची

भाषा अधिकाधिक हिंस्र होऊ लागली आहे. पुढे जाण्याऐवजी अधिकाधिक मागास होऊ लागली आहे. आणि हे मनपसंत वाटू लागले आहे.

आणि अगदी कालपरवा काश्मीरच्या चिघळत्या परिस्थितीबद्दल बोलताना संतप्त दगडफेक करणाऱ्या काश्मिरी लोकांची बाजू घेणाऱ्या डॉ. फारूख अब्दुल्ला यांचेही शिर कापून आणून देणारास बक्षीस जाहीर झाले आहे. आग्रा येथील बजरंगदलाच्या गौरक्षा दलाचे प्रमुख गोविंद पराशर यांनी फारूक अब्दुल्ला यांचे शिर कापून आणणारास मी एक लाख रुपयाचे इनाम देईन अशी घोषणा केली.

मागे रामदेव बाबानेही जो भारतमाता की जय म्हणणार नाही त्याचे डोके उडवले पाहिजे अशा अर्थाचे भाष्य केले होते.

या सर्व शिरच्छेदवेड्या, मृत्यूदात्या लोकांमध्ये अर्थातच इस्लामचे खंदे पाईकही आहेत. त्यांचे तर आदर्शच अलकाईदाचे दहशतवादी. उत्तर प्रदेशमधील बसपचे आमदार याकूब कुरेशी यांनी मोहंमदाचे तथाकथित कार्टून प्रसिध्द करणाऱ्या पॅरीसमधल्या चार्ली हेब्डोच्या पत्रकारांना मारणाऱ्यांना एकावन्न कोटीचे बक्षीस जाहीर केले होते. एवढा पैसा ते कुठून आणणार होते हा प्रश्न पडण्यापेक्षाही एवढा द्वेष हे लोक कुठून आणतात हा खरा प्रश्न आहे. अकबरुद्दीन ओवेसीने तर आम्ही पंचवीस कोटी भारतीय मुसलमान शंभर कोटी हिंदूंना ठार करू असला बकवास केला होता...

असे काही करायची तयारी प्रत्यक्षात गरीब जनतेने दाखवली नाही तरीही त्यांना असली भाषा आवडते आहे हे खरे संकट आहे.

पुन्हा एकदा सत्ताधारी पक्षाच्या बाजूने असणाऱ्या सामान्य मतदारांना, लोकांना, तरुणांना आवाहन करावेसे वाटते. या विकृतीच्या आगीशी खेळ खेळू नका. जे धर्मविकृतीचे दुष्टतत्व आयसिस, अलकाईदाला जन्म देऊन गेले तेच दुष्टतत्व तुमच्या धर्मविकृतीच्या पोटीही फळेल. निरपराधांचे प्राण घेणाऱ्या, कुटुंबे उद्ध्वस्त करणाऱ्या घटनांचे कारण या देशाच्या प्राचीन संस्कृतीतून पुढे येऊ नये. अनेक दुष्ट गोष्टींसोबतच या संस्कृतीत अतिशय चांगल्या गोष्टीही आकाराला आल्या आहेत. आपल्या संस्कृतीतील सुंदरतत्वाच्या गळ्यातली नरमुंडमाळा कायमची त्याज्य ठरवून त्यातील चौसष्ट कलांचेच जतन करण्याचा शहाणपणा दाखवायला हवा. भारतात गिलोटीन कलेचा उदय व्हायला नको.

शिरच्छेदाची भडक भाषा करून केवळ मद्दडांच्याच भावनेला हात घालणारे जे नेते आहेत त्यांचा बंदोबस्त वेळीच केला पाहिजे. नाहीतर तुमच्याच संस्कृतीच्या मस्तकाची शंभर शकले उडून तुमच्याच पायाशी लोळू लागतील. तो स्वतःच स्वतःचा केलेला शिरच्छेद पाहायला शिल्लक असेल फक्त वेदनेचा कल्लोळ... नानगरहारच्या भग्न गुहांमध्ये उडालेल्या कल्लोळासारखा.

***

# युद्धांचे दलाल आणि माध्यमांचे स्वामी

महाराष्ट्रातल्या बहुसंख्य लोकांना राजीव चंद्रशेखर हे नाव माहीतही नसेल. पण हे नाव माहीत असायला हवं. याची काही महत्त्वाची कारणं आहेत. एक म्हणजे आपले नेशन वॉन्ट्स टु नौ वाले ओरडब गोस्वामी यांनी जे नवीन रिपब्लिक नावाचे न्यूज चॅनेल काढण्याची घोषणा केली आहे त्याचे मॅनॅजिंग डायरेक्टर आणि त्या चॅनेलमध्ये पैसा घालणारी असामी म्हणजे राजीव चंद्रशेखर. राज्यसभेत अपक्ष पण एनडीएचे समर्थक खासदार म्हणून ते आहेत. आणि अपक्ष म्हणून इतका काळ कर्नाटकमध्ये वावरल्यानंतर गेल्याच वर्षी रीतसर केरळ एनडीएचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली.

राजकारणात कुठल्या व्यक्तीचं भाग्य कसं फळफळेल हे वहिवाटेने चालणाऱ्या सामान्य माणसाला कधीही कळू शकत नाही. बरेचसे शिक्षण अमेरिकेत झालेले, अतिशय तल्लख असे हे राजीव चंद्रशेखर. यांचे भाग्य आता विविधांगाने फळफळू लागले आहे असं लवकरच देशाला पाहायला मिळेल. मोदीप्रणित भाजप सरकारने पाकिस्तानशी युध्द करण्याचा ज्वर सुरुवातीच्या दिवसांत बऱ्यापैकी चढवत नेला. मग आंतरराष्ट्रीय राजकारणातील वातावरण पाहून आणि शाल, नजराण्यांची मुत्सद्देगिरी केल्यानंतर तो जरा थंडावला. पण देशातील सत्ता हाती घट्ट ठेवायची तर

मुस्लिम द्वेष, पाकिस्तानशी युध्द वगैरे तथाकथित देशभक्तीचे भजन सुरू ठेवावेच लागेल. त्यामुळे तो प्रश्न कधी ना कधी पुन्हा वर येणारच.

एनडीए सरकारने संसदीय संरक्षण समितीवर राजीव चंद्रशेखर यांची नियुक्ती केली आहे. गेल्या अडीच वर्षांत सरकारी यंत्रणेतून खाजगी व्यक्तींचा फायदा होण्याची अनेक उदाहरणे घडली. त्यात आता राजीव चंद्रशेखर यांचे नाव मुख्य आहे. या अपक्ष खासदाराची ही नियुक्ती मोठी कुतूहलजनक आहे.

भारताला लागणाऱ्या संरक्षण सामग्रीच्या उत्पादनात चंद्रशेखर यांनी गुंतवणूक केली आहे. त्यांची एक कंपनी आहे ज्युपिटर कॅपिटल. या कंपनीची गुंतवणूक आहे ऍक्सिसकेड्स या कंपनीमध्ये. आणि त्या कंपनीच्या इतर उद्योगातला एक उद्योग आहे संरक्षण क्षेत्रासाठी प्रणाली तयार करण्याचं. भारताच्या संरक्षण व्यवस्थेसाठी सामग्री देण्यासाठी त्यांना प्रमाणित करण्यात आले आहे असे त्यांच्या संस्थळावर स्पष्टच म्हटले आहे.

भारतीय संरक्षण सामग्रीच्या उत्पादनासाठी एक भागीदार भारतीय असावा लागतो. तरच विदेशी कंपन्या त्याच्याशी करार करून भारताला हवी असलेली सामग्री भारतात तयार करू शकतात. त्या पध्दतीने ऍक्सिसकेड्स बाजारात विविध विदेशी कंपन्यांशी करार करून आहेच. शिवाय ती स्वतंत्रपणेही कंत्राटे घेते. गेल्या वर्षी मार्च महिन्यात या कंपनीला संरक्षण मंत्रालयाचे एक कंत्राट मिळाल्याचे त्यांनी स्वतःच घोषित केले होते.

आता या महोदयांचा युध्दासंबंधीचा उत्साह पहा. पाकिस्तानच्या कुठल्याही व्यक्तीला, संस्थेला, खेळाडूला भारतात प्रवेश देऊ नये अशी त्यांनी सूचना संसदीय समितीच्या बैठकीत केली. पाकिस्तानशी सर्व प्रकारचे आर्थिक, व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध संपवावेत हे विधेयकच त्यांनी मांडले. इतकेच नव्हे तर पाकिस्तानी व्यक्ती असेल असे कुठलेही विमान भारताच्या आकाशातून भारताच्या भूमीवरून उडत जाता कामा नये अशी सूचनाही त्यांनी केली होती. पाकिस्तान हे दहशतवादी राष्ट्र म्हणून घोषित करावे असे विधेयकही त्यांनी संसदेत रेटले होते. त्यांच्या मते पाकिस्तानशी संबंध ठेवणे एकाच प्रकारे संभवते. संघर्षाचा संबंध. युध्दाचा संबंध. असल्या युध्दखोरीला युध्द प्रत्यक्ष कधीच न अनुभवलेले बालिश लोक पाठिंबा देतात. त्यात प्रश्न असतो तो भावनिक. माहिती नसल्यामुळे आगखाऊ बोलणारे लोक अनेक असतात. पण तो भाबडेपणा म्हणून सोडून द्यायला हवा. आपल्या भावना चेतवून, खेळवून त्यातून फायदा उकळणारे शस्त्रास्त्रांचे दलाल देशभक्त नसतात तर फक्त फायदाभक्त असतात हे त्यांच्या गावीही नसते. पण युध्दज्वर वाढवणे सोपे झाले असल्याच्या काळात पदाचा दुरुपयोग करून जनतेला युध्दासाठी प्रवृत्त करणारे राजमान्य राजश्री या देशात आहेत याचे भान आपण ठेवायला हवे.

ज्या ज्युपिटर कॅपिटल या कंपनीची राजीव चंद्रशेखर यांनी स्थापना केली ती कंपनी आता अर्णव गोस्वामीच्या रिपब्लिक या नव्या चॅनेलला भागीदार बनून आर्थिक पाठबळ देते आहे. या कंपनीची वाटचाल कशी होणार हे त्यांच्या एका अधिकाऱ्याने पाठवलेल्या इमेल्सवरून स्पष्ट होते आहे.

साऱ्या संपादकांना, वार्ताहरांना त्यांनी कळवले की त्यांची मते आणि त्यांची मांडणी ही मध्यममार्गी पण उजवीकडे झुकणाऱ्या विचारसरणीचीच असायला हवी. आपल्या चेअरमनच्या म्हणजे राजीव चंद्रशेखरच्या विचारधारेशी जुळणारी मते असलेलेच लोक नोकरीवर ठेवले जावेत. आणि चंद्रशेखर यांचे ‘राष्ट्रप्रेम’ आणि ‘शासन’ यांच्या कल्पनांशी सर्व पत्रकारांची चांगली ओळख करून देण्यात यावी. (हा संदेश दुसऱ्या दिवशी घाईघाईने मागे घेण्यात आला). अशा या चंद्रशेखरांच्या जोडीला कल्लोळस्वामी अर्णब आल्यानंतर युध्दज्वर तापवण्याचे प्रयत्न कसे पध्दतशीर पार पडू लागतील ही कल्पना करायला काही फार मोठ्या कल्पनाशक्तीची गरज नाही.

आता प्रश्न असा आहे, ज्यांचे हितसंबंध सरळसरळ संरक्षण सामग्रीच्या उत्पादनात गुंतलेले आहेत अशा व्यक्तींना संसदीय संरक्षण समितीवर ठेवणे हे केंद्रात कुणालाच कसे अयोग्य वाटत नाही? युध्द होण्यात स्वारस्य असलेली व्यक्ती संरक्षणाच्या संसदीय समितीवर? की हेच योग्य वाटते?

सामान्यांनी एक लक्षात ठेवायला हवे. युध्द ही एक अत्यंत घातकी घटना असते. त्यात मरणारे सैनिक सत्ताधाऱ्यांचे गणगोत नसतात. त्यातून येणाऱ्या कष्टमय दिवसांना तोंड द्यायला लागते ते या देशातल्या राजीव चंद्रशेखर, अर्णब आणि सत्तेवर असलेल्या वाचिवीरांना नव्हे. त्यांना फायदाच मिळणार असतो. या ना त्या प्रकारे. अनाथ होणार असतात आपली घरकुले. पंगू होणार असतात साध्यासुध्या लोकांची मुले. शत्रूचा बागुलबुवा फुगवून आपल्याला फसवणाऱ्या या युध्दाच्या कारखानदारांपासून सावध रहायला हवे.

‘जर्मन युध्दपाठातून’ या नावाची बर्टोल्ट ब्रेख्त या जर्मन प्रतिभावंताची ही कविता मी अनुवादित केली होती. त्यातील काही ओळी येथे देत आहे. शंभर वर्षे झाली तरी कवितेची हाक तशीच तीव्र आहे.

...

ज्यांच्या जेवणाच्या टेबलावर यथास्थित अन्न आहे
ते देत आहेत समाधानी रहाण्याचे धडे.
सारा पैसा ज्यांच्या पायाशी जमा होणार आहे
ते समजावत आहेत त्यागाची महती
भरपेट जेवणारे भुकेकंगालांना सांगताहेत
पुढे फार चांगले दिवस येणार आहेत सर्वांना.
देशाला पुढेपुढे नेत खाईत घेऊन चाललेले
म्हणतात सामान्यांना- राज्य करणं भारी कठीण हो...
पुढारी जेव्हा शांततेच्या गप्पा करतात
तेव्हा सामान्य लोकांना समजतं
लवकरच युध्द होणार.
पुढारी जेव्हा युध्दाला शिव्याशाप देतात
तेव्हा भरतीचे आदेश लिहून तयार असतात.
वरचे लोक म्हणतात-
युध्द आणि शांतता दोन भिन्न गोष्टी आहेत.
पण त्यांची शांतता आणि त्यांचे युध्द

जणू एक वारा आणि एक वादळ- समजून घ्यायचं
त्यांच्या शांततेतून युध्द तरारू लागतं
आईच्या पोटी जन्मलेलं पोर
जसं वागवतं तिचाच भयाण तोंडवळा.
त्यांच्या शांततेतून जगलंवाचलेलं जे काही
तेही ठार करून टाकतं त्यांचं युध्द.
युध्द जवळ येत चाललंय.
हे काही पहिलंच नव्हे.
याआधीही झाली बरीच युध्दे.
गेल्या... शेवटच्या युध्दाच्या वेळी
जितं होते आणि जेते होते
जितांमध्येही जनसामान्य होते उपासमार झालेले
आणि जेत्यांमध्येही होते जनसामान्य उपाशी खंगलेले.
कूच करून जाताना माहीत नसतं अनेकांना
त्यांचा शत्रूच त्यांचं नेतृत्व करीत असतो.
त्यांना आज्ञा फर्मावणारा आवाज
असतो त्यांच्या शत्रूचाच आणि-
शत्रूबद्दल बोलणारा तो माणूसच
असतो स्वतःच त्यांचा शत्रू.
हे सेनानायका, तुझा रणगाडा केवढा बलशाली आहे

जंगलं भुईसपाट करत जाईल आणि शेकडो माणसांना लोळवील
पण त्यात एकच दोष आहे
तो चालवायला माणूस लागतो
हे सेनानायका, तुझं बॉम्बर जबरदस्त आहे.
वादळवेगाने ते उड्डाण करतं आणि हत्तीपेक्षा जड ओझं वाहून नेतं.
पण एकच दोष आहे त्यात
ते दुरुस्त करायला माणूस लागतो.
हे सेनानायका, माणूस मोठा उपयुक्त प्राणी आहे.
तो उड्डाण भरू शकतो, आणि संहार करू शकतो
पण एकच दोष आहे त्याच्यात
तो विचार करू शकतो.

...........

युध्दाच्या भीषण खाईत कुणाच्यातरी वैयक्तिक नफ्याच्या महत्त्वाकांक्षांपायी आपले सैनिक, आपली माणसं लोटली जाणार नाहीत एवढी काळजी नक्कीच घ्यायला हवी.

***

# भीम पॅन्थर्स

सहारनपूर आणि शब्बीरपूर. उत्तर प्रदेशमधल्या या दोन शहरगावांची नावं गेल्या महिन्यापासून देशाच्या वृत्तक्षेत्राच्या पटलावर आली. त्याचबरोबर एक नवीन नाव दुमदुमू लागलं, भीम आर्मी.

महाराष्ट्रातला दलित पॅन्थर्स गाजू लागले तो काळ स्वाभाविकपणे आठवला. अन्यायाविरुद्ध, न बदलणाऱ्या वृत्तीविरुध्द मुठी वळून झेपावू पाहाणारे दलित पॅन्थर्स. सारा महाराष्ट्र ढवळून निघालेला. बाबासाहेबांनीच स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाने न्याय मिळवण्याच्या अपेक्षा पूर्ण केल्या नव्हत्या, शिवाय त्यांच्यातील गटतटांची संख्या वाढतीच होती. दलितांचे प्रश्न धसास लावण्यात ते कमीच पडत होते. १९७४मध्ये राजा ढालेंचा ‘काळा स्वातंत्र्यदिन’ हा लेख शिक्षित-अल्पशिक्षित दलित तरुणांच्या उरात घुसला. महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभर दलितांवरचे अत्याचार वाढले होते. दलितांच्या स्त्रियांना नागवे करून धिंड काढण्याच्या घटना ग्रामीण महाराष्ट्रात घडत होत्या. दलित पॅन्थर्स या ताज्या रक्ताच्या संघटनेने विद्रोहाची हाक दिली. दलित तरुणांना सांगितले गेले- सहन करू नका, प्रतिकार करा. प्रथमच असा खंबीर आवाज उमटला होता. वरळीतून हजारोंचा मोर्चा निघाला तेव्हा त्याला मिळालेला प्रतिसाद मुंबईला आणि महाराष्ट्राला जबरदस्त हादरवून गेला. या मोर्चामध्ये मोर्चेकऱ्यांवर ठरवून दगडफेक करण्यात

आली, पोलिसांनी क्रूरपणे बेदम लाठीमार केला. ढाले, ढसाळांना पुन्हापुन्हा अटक करण्यात आले. पण दलित तरुण भिऊन गप्प रहात नव्हते. एक वेगळंच विद्रोही वातावरण तयार झालं, होत राहिलं.

हा झंझावात आता काय करील असं वाटत असताना- दलित पॅन्थर्स फक्त तीन वर्षांची झालेली असताना आणिबाणी जाहीर झाली आणि वादळाला कोंडून पडावं लागलं. दलित पॅन्थर्सची चळवळ अपेक्षेइतकी बळकट राहिली नाही... पुढचा इतिहास तसा गळाठलेला आहे. ठिणग्या होत्याच पण त्यांचा जाळ होऊ शकला नाही.

ही सारे उजळणी मनात होण्याचे कारण देशाच्या राजकीय पटावर जोमदारपणे आलेली भीम आर्मी.

दलितांच्या पाठिंब्यावर, बहुजनांच्या पाठिंब्यावर सत्ता हस्तगत करताना मायावतींनी पहिली घोषणा दिली होती ‘तिलक, तराजू और तलवार, मारो इनको जूते चार’. यात आपण ब्राह्मण, व्यापारी आणि बाहूबली जाती यांच्या विरोधात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नंतर २००७ ते २०१२ या पाच वर्षांत मुख्यमंत्री म्हणून टिकलेल्या, मायवतींनी जिंकताना आपले धोरण बदलले. कांशीराम मॉडेल घेऊन सत्ता काबीज करायचे स्वप्न साकार करण्यासाठी मायावतींच्या लक्षात आले की सपाने बहुजनांच्या मतदारकोषात हात मारला तर आपल्याला ब्राह्मणांचाही पाठिंबा लागेल. ‘बहुजन नहीं सर्वजन’ अशी शाब्दिक चलाखी करून मायावतींनी घोषणा दिली- ‘हाथी नहीं गणेश है, ब्रह्मा विष्णू महेश है.’ आजवरच्या दलित- बहुजनांच्या प्रतिनिधीत्वावर बोळा फिरवणारी ही घोषणा देऊन मायावतींनी भाजपसाठीच रस्ता

जणू तयार केला. नंतर समाजवादी पार्टी सत्तेत आली. मुलायमसिंगसारखा प्रतिगामी विचारांचा तथाकथित समाजवादी नेता उत्तर प्रदेशाला आणखी खातेऱ्यात घेऊन गेला. आता लोकांचा दोघांवरचाही विश्वास उडून भाजपच्या आदित्यनाथ बिश्तची सत्ता आली.

पण हा सत्तापालट होण्यापूर्वीच या आधीच्या दोन वर्षेंपासून भीम आर्मीचे संघटन होत चालले होते. मायावती, आठवले, पास्वान या सर्वांकडून निराशा झालेला दलित तरुण उत्तर प्रदेशातच काय इतरत्रही पर्यायांचा विचार करू लागलेला. महाराष्ट्रातही याची सुरुवात खैरलांजी, खर्डा हत्याकांडांनंतर झाली होती. देशाच्या इतर भागांतही झाली होती.

चंद्रशेखर आझाद रावण असे नाव स्वतःला घेतलेल्या कायदा पदवीधर तरुणाने भीम आर्मीची स्थापना करून दोन वर्षे लोटली आहेत. कॉलेजमध्ये चमार लोकांसाठी पाणी पिण्याचा वेगळा नळ, उच्च जातींसाठी वेगळा नळ या मुद्द्यावरून चंद्रशेखर आझाद रावणने विरोध उभारला. त्यांचे सदस्य वाढू लागले. अगदी छोट्या गावांतही बारीकशी कचेरी तयार झाली. तरुण एकत्र येऊ लागले. यांनीच मायावती आणि सपा यांच्या विरोधात भाजपला मतेही दिली.

पण त्यांच्या अपेक्षांहून निराळे- जे होणार तेच झाले. मायावतींच्या आणि मग मधल्या यादव राजवटीत उत्तर प्रदेशचे बाहूबली ठाकूर ‘जरा सहमे हुए से’ राहिले होते. आदित्यनाथ या ठाकुराच्या विजयामुळे त्यांच्यात पुन्हा एकदा जुना सत्ता मद संचारला नसता तर नवल नव्हते. मुख्यमंत्री आदित्यनाथांच्या जातीचे, ठाकूर जातीचे लोक पुन्हा एकदा आपले हरपलेले जातीय स्थान काबीज करण्याच्या मनःस्थितीत

आले. सहारणपूर आणि शब्बीरपूर या भागात जो संघर्ष पेटला तो याच ‘हम हैं’ दाखवण्याच्या मानसिकतेतून पेटला.

ठाकुरांनी शब्बीरपूरच्या दलितांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याच्या प्रतिष्ठापनेवर हरकत घेतली. परवानग्या आणा तरच हे होऊ दिले जाईल अशी भूमिका घेतली. त्याच वेळी ठाकुरांनी महाराणा प्रतापांच्या प्रतिमेच्या मिरवणुकीचे आयोजन केले. शब्बीरपूरच्या दलितांनी परवानगी दाखवा असा सवाल टाकला. आणि दंगा पेटला.

शब्बीरपूरला बलाढ्य ठाकूरांनी ज्या झपाट्याने घरं जाळली, स्त्रियांवर अत्याचार केले गेले त्याचेही वार्तांकन फारसे झाले नाही. एक ठाकूर तरुण धुराने गुदमरून मेल्याचे वृत्त आले पण नंतर एक दलित तरूण मेला, अनेक जखमी झाले हे फक्त दोनतीन चॅनेल्सनी दाखवले. शब्बीरपूरचे अनेक दलित गाव सोडून दूर गेले आहेत.

वातावरण बिघडले आणि दलित ऐक्याचे आंदोलन धडाडून पेटले. जंतरमंतर वर जमलेला सत्ताधाऱ्यांच्या आणि दलितविरोधकांच्या छातीत धडकी भरवणाऱ्या आंदोलकांचा जमाव शक्य तितका झाकून ठेवण्यात आला. आंदोलकांची संख्या लाखांत असताना केवळ चारपाच हजार लोक जमल्याच्या बातम्या पसरवण्यात आल्या. पण लपवाछपवीने काहीही साध्य होणार नाही.

सोशल मिडियाचा वापर जर प्रतिगामी शक्ती करू शकतात तर सारेच करू शकतात. आणि हा वापर वाढतो आहे. आदित्यनाथ बिश्त यांचे मूसहर लोकांच्या

भेटीला जाण्याचे घाटले तसे प्रशासनातील सेवेकऱ्यांनी त्यांना साबण, पावडर, अत्तर नेऊन दिले. तुम्ही गलिच्छ आहात हे अध्याहृत ठेवून मुख्यमंत्री भेटायला येतील तेव्हा गलिच्छपणे सामोरे न येता साबण वगैरे वापरून आंघोळी करा हे सांगितले गेले. यातून उघडीवाघडी तुच्छता समोर आली. त्याचाही प्रचार झाला. जवानाच्या गरीब घरात भेटीला जाताना याच प्रशासनाने अर्ध्या तासाच्या भेटीसाठी भाडोत्री सोफा, गालिचा कार्पेट यांची तजवीज केली. चमचेगिरी आणि तुच्छता यांचा हा संगम जगासमोर आला.

उत्तरप्रदेशच्या माजोर्ड्या पार्श्वभूमीवर दलित तरुणांना आपल्याबाबत होणाऱ्या भेदभाव आणि अत्याचाराविरुद्ध आपणच उभे रहायला हवे हे सांगणारे नवनेतृत्व ठामपणे उभे रहाताना दिसत आहे. या भीम आर्मीचे लोक नक्षलवादी असल्याची कुजबूज उत्तर प्रदेशच्या पोलिसखात्याकडून सुरू झाली याचाच अर्थ त्यांचे आव्हान सत्ताधाऱ्यांना मोठे वाटते आहे. भीम आर्मीच्या तरुण नेतृत्वाकडे कायद्याचे ज्ञान आहे, आपल्या मर्यादांसकट ताकदीचे भान आहे. उनाच्या दलित मारहाणीच्या घटने नंतर जिग्नेश मेवानींच्या नेतृत्वाखाली गुजरातमधील दलितही एकत्र येत आहेत. महाराष्ट्रातही वातावरणात धग आहेच. जेव्हा दलित पॅन्थर्स महाराष्ट्रात उभी राहिली त्याच वेळी तामिळनाडूतही उभी राहिली. इतरत्रही पसरत गेली. ती संघटना म्हणून फारशी रोवून टिकली नाही किंवा प्रभावी ठरली नाही हे अत्याचारित दलितांचे दुर्दैव. आज या प्रगतीशील भारतात रोटीबेटी व्यवहारापासूनही अजूनही ते खालचे नि आपण वरचे हा दंभ जपला जातो. दलित स्त्रियांवर कितीही अत्याचार झाले तरी

हळहळून गप्प रहाणारा, बलाढ्य जातींचा समाज जातीतल्या एखाद्या महिलेवर अत्याचार होताच केवढा खवळून उठतो हे चिन्ह या दंभाचेच आहे.

चळवळींमध्ये जुने पक्ष, जुन्या संघटना म्यूझियम पीससारख्या जपून ठेवण्याची गरज नाही. त्यांचा इतिहास जरूर नोंदावा. पण प्राण खुंटलेल्या इतिहासाच्या तुकड्यांची धुगधुगी काही नेते मंडळींसाठी जगवत ठेवण्याऐवजी नव्या संघटनांतल्या तेजात सामील व्हावे हे सारीकडच्या संघटनांनी गंभीरपणे लक्षात घ्यायला हवे.

जातीय दंभाच्या छायेतल्या या देशात या वादळी सामाजिक आंदोलनाची गरज अत्याचारित समाजाला खरोखरच आहे. अन्यायविरोधाचा सशक्त पर्याय उभा राहिला आहे. तो केवळ जातीय भावनाशीलतेपेक्षा अधिक शहाणा असो आणि जातीय विद्वेषाच्या पुढे जाऊन सामाजिक न्यायाच्या चौफेर प्रश्नावर त्याचे लक्ष केंद्रित असो.

अन्यायाच्या विरुद्ध झगडणे ही निरंतर प्रक्रिया आहे हे कोण नाकारू शकेल?

***

# लोकशाहीवरील संकट आणि आपण

लोकशाही कशी यावर अनेक तिरकस विनोद सांगितले जातात. ती कशी वाईट आहे, निरुपयोगी आहे वगैरे उपहास केला जातो. आपल्या देशात, आपल्या गाव, जिल्हा, तालुक्यात लोकशाहीच्या नावाखाली सरंजामशाही, गुंडपुंडशाही कशी राबवली जाते याची विषण्ण करणारी उदाहरणे आपण पाहात असतो. जातींच्या उतरंडीला, धर्मांच्या फरकाला आयुष्यात प्राधान्यक्रम देत रोजचे व्यवहार करणाऱ्या या देशात लोकशाहीमूल्ये फार वरवर जपली जातात. संघर्ष उभे राहिले की माणसांवर वार करून संपवण्याची स्पर्धा लागते. पण तरीही सत्य हेच आहे की लोकशाही ही शासनप्रणाली विविध शासनप्रणालींमधली त्यातल्या त्यात कमी वाईट म्हणून आधुनिक जगात स्वीकारली गेली. बहुसंख्येच्या निर्णयानुसार सत्तेवर सरकारे येतात. कधी त्यांचे सरळ बहुमत होते कधी नाही. कधी शासन बरे चालते कधी अत्यंत वाईट. पण यातील सर्वात महत्त्वाचा भाग असतो की लोकशाही प्रणालीमध्ये व्यक्तीस्वातंत्र्याचा सर्वात कमी संकोच होतो. बहुसंख्येचे सरकार चालले तरीही अल्पसंख्यांचे हक्क शाबूत ठेवले जातात. सैद्धांतिक पातळीवर हे अमान्य करता येत नाही कुठल्याही द्वेषभावी व्यक्तीला वा संघटनेला.

कुणाही वेगळ्या विचाराच्या व्यक्तीला, संघटनेला बंदी, मुस्कटदाबी सहन करावी लागत नाही हे लोकशाही तत्वाचे आद्य कर्तव्य असते. विरोधी पक्षाला योग्य

तो सन्मान याचाच अर्थ विरोधी विचाराला योग्य तो सन्मान हे तत्व आदर्श लोकशाहीत जपले जाते. आपण गावपातळीवरची लोकशाही, राज्यांतर्गत लोकशाही राजकारण याबद्दल सहजच खूप चर्चा करतो. जिथे अनेकदा लोकशाही मूल्ये धोक्यात आलेलीच असतात. पण आज अशी वेळ आली आहे की जगातील लोकशाही तत्वांचा खून पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून जागतिक आणि त्या संदर्भात देशपातळीवरच्या लोकशाहीपुढील आव्हानांची चर्चा करायला हवी.

आज जग एका मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे. गेल्या दोनशेचाळीस वर्षांपासून ज्या लोकशाहीकडे जग पाहात आले त्या अमेरिकेतील या वर्षीच्या निवडणुकीने लोकशाही उमेदवाराच्या निकषांचे सारे आडाखेच बदलून टाकले. स्त्रियांबद्दल वाईट बोलणारा, वर्णद्वेष न लपवणारा, इतर धर्मांचा द्वेष उघड करणारा आणि हे करताना उलटसुलट कोलांट्या मारत खरे काय खोटे काय याची भ्रांत जनमानसात तयार करत त्याचा फायदा उचलणारा डॉनल्ड ट्रम्प हा इसम अमेरिकेत निवडून आला. एका हत्याकांडाच्या जबाबदारीचा दोष ट्रम्पकडे नाही एवढीच त्याची उजवी बाजू.

मोदी पंतप्रधानपदी आरूढ झाल्याला अडीच वर्षे लोटली. ट्रम्प अजून अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यायचे बाकी आहेत- आता अकरा तासच उरले. अजूनही अध्यक्षपदी आरूढ झालेले नसतानाही त्याने औध्दत्याची जी आतषबाजी सुरू केली ती पाहाता भारताचे पंतप्रधान मोदी कधीमधि सौम्यच वाटावेत. पण गेल्या अडीच वर्षांत मोदी, त्यांचा पक्ष, त्यांचा संघ यांनी ज्या प्रकारे प्रचाराची धुमश्चक्री

सुरू ठेवली आहे ती पाहाता वाटावे की हे अजूनही निवडणूक मोडमध्येच आहे. निवडणुकींत विविध पक्ष युध्दपातळीवर कामे करतात. पण यांचे तर युध्द सातत्याने सुरू राहिले आहे. यांची प्रचार सेना अजूनही कोणत्याही इश्यूवर एकदिलाने विरोधकांवर तुटून पडते आहे. सत्य-असत्याची सरमिसळ त्यांना अजिबात वर्ज्य नाही. अलिकडेच प्रसिध्द झालेले स्वाती चतुर्वेदी यांचे आय अम अ ट्रोल- हे भाजपच्या डिजिटल सैन्याच्या गुप्त जगाची झलक दाखवणारे पुस्तक अवश्य वाचा. अर्धवट राजकीय जाण असलेले तंत्रज्ञान अवगत असलेले लोक नोकरीधंद्याला लावून त्यांना विरोधकांना सतावण्याचे, अपमानित करण्याचे, तेजोभंग करण्याचे काम लावून दिले आहे भाजपने. ही बाजारबुणग्यांची फौज... नव्या युगातील नव्या मनूचे शेंदाड शिपाई आहेत हे. त्यांना वठणीवर आणण्याचे काम, या सैन्याला आणि त्यांच्या डिझाइनला पुरे पडणे हे लोकशाहीचे रक्षण करू पाहाणाऱ्या सर्वांचे काम होणार आहे. जणू या धोरणाचाच अंगिकार करून तिकडे ट्रम्प आणि त्यांची ब्राईटबार्टवाली सेना जोरात कामाला लागली आहे. कसलाही विधीनिषेध न बाळगता विरोधकांबद्दल वाट्टेल ते लिहिणे, बोलणे, गलिच्छपणा करणे याला ट्रम्पची केवळ साथच नव्हे तर त्याचा क्रियाशील सहभाग आहे.

मोदी स्वतःही अनेक बेमुर्वत भाषेत लिहिणाऱ्या बोलणाऱ्या लोकांचे ट्विटर हॅन्डल्स फॉलो करीत असतात हे पुराव्यांसह उघड झाले आहे. त्यातील बेशरम धमक्यांवरून त्यांनी आपल्या निष्ठावंत झोंडसैन्याला कधीही रोखलेले नाही, टोकलेले नाही. उलट त्यांना बोलावून घेऊन त्यांचे आदरसत्कार वगैरे करणे सुरू केले आहे.

फरक एक जाणवला- की ट्रम्प हे लोकशाही मार्गाने निवडून आलेले असूनही ते लोकशाहीला किती घातक ठरू शकतात याचे समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि राज्यशास्त्रीय विश्लेषण करण्यास अमेरिकन बुध्दीवंतांनी वेळ न दवडता, फार शिस्तबद्ध सुरुवात केली आहे. अनेक वैचारिक व्यासपीठे देशपातळीवर एकत्र येऊन विचार मांडत आहेत.

अमेरिकेत लोकशाही रुजलेली असण्याचे हे द्योतक आहे.

आपल्याकडील चित्र तेवढेसे आश्वासक नाही. विरोधी पक्षैक्याचा बोजवारा सुरूच आहे. आपण सर्व मोदी विरोधकांनी, फॅशिस्ट विचारसरणीला अनुलक्षून, त्यांच्या धर्मवादी विचारकेंद्रावरून त्यांच्यावर टीका केली. त्यांच्या निर्णयांतील फसवाफसवी, जुमले वगैरे वरून विरोध केला, रेवडी उडवली. पण जो मुख्य मुद्दा त्याकडे काहीसे वैचारिक दुर्लक्ष झाले हे मान्यच करावे लागेल. मोदी हे अगदी निखळ लोकशाही प्रक्रियेतूनच निवडून आले आहेत. त्यांनी भलेही धर्माधारे बहुसंख्य मागास विचारांच्या लोकांना आपल्याकडे वळवून घेतले. जाहिरातबाजीवर प्रचंड काळा पैसा खर्च करून लोकांची दिशाभूल करून स्वतःला पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून प्रस्थापित केले. इतर पक्षांच्या नेतृत्वावर अश्लाघ्य आरोप करून, खालच्या पातळीवरची टीका करून लोकांना रिझवत मूर्ख बनवले. फोटोशॉप उद्योगांनी स्वतःला मोठे करणे आणि त्याच पद्धतीने जिवंत किंवा मेलेल्या इतर नेत्यांना बदनाम करणे हेही त्यांनी केले. कदाचित सिद्ध न होण्याजोगे उद्योग त्यांच्या फौजेने निवडणुकांतही केले असतील- पण तरीही जी काही लोकशाही

निवडणूक प्रक्रिया आहे ती पार पाडूनच मोदी बहुमताने निवडून आले आणि विजयी झाले आहेत.

लोकशाही निवडणूक प्रक्रियेचा वापर करून लोकशाहीचे शत्रू निवडून येऊ शकतात हे आजवर अनेकदा सिध्द झाले आहे.  स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या वर्षांत, पूर्वीच्या राजवटींतही लोकशाहीबद्दल यत्किंचितही आदर नसलेले राजे, जमीनदार वगैरे प्रकारांतले उमेदवार निवडून येत राहिले आहेत. त्यात बाहुबळ, धमक्या, भय यांचा वापर उघड होता. त्यातील काहींनी, किंवा त्यांच्या वारसदारांनीही अशाच मार्गांनी पिढ्यानपिढ्या सत्ता मिळवली. कालांतरानंतर थोडीफार लोकशाही तत्वे त्यांच्या किंवा लोकांच्या मनात मुलाम्यापुरती का होईना चढली असतील की नाही शंकाच आहे.

पण सध्याच्या परिस्थितीबद्दल बोलायचे तर मोदी आणि त्यांचा पक्ष हा मुळातच लोकशाही प्रक्रियाविरोधी आहे हा मुद्दा विश्लेषणाच्या पातळीवर फारसा पुढे आलेला नाही. राजकीय विरोधकांचे मुख्य विवेचन म्हणून अजिबातच पुढे आलेला नाही.तसा तर हा मुद्दा रिपब्लिकन पक्षाबाबत अमेरिकेच्या डेमॉक्रॅट पक्षानेही पुढे आणलेला नाही. पण तात्विक, वैचारिक विरोधकांच्या लेखनातूनही ते विवेचन भारतात फारसे पुढे आलेले नाही. अमेरिकेत ते सुरू झाले आहे. आणि असे निर्भय लेखन, भाषण, मांडणी या बाबतीत आपण त्यांचे मॉडेल घ्यायला हवे.

एखाद्या ठिकाणी जमून नारेबाजी करणे, आंदोलन करणे यात संख्या पुरेशी दिसली नाही तर हेतू पराभूत होतो. पण वैचारिक लेखन, भाषण, चर्चा, सोशल मिडियातील घणाघात यामुळे टिकाऊ परिणाम दिसू लागतात. मोदींचे २००२मधले

उद्योग ‘क्लीनचिट’द्वारे पावन झाले कारण त्यांनी कुठेही स्वतःला प्रत्यक्ष समोर येऊ दिले नव्हतेच. पण एका मोठ्या राज्यात लोकशाहीधर्माचे (जुन्याच मानसिकतेतून आलेले त्यांचे ज्येष्ठ नेते त्याला राजधर्म म्हणतात) पालन न करणारा नेता देशाच्या नेतेपदी निवडणूक प्रक्रियेने बसू शकला यात लोकशाही तंत्राचा विजय आहे. पण याच विजयात लोकशाही तत्वांच्या अंतिम पराभवाची बीजे आहेत. ती बीजे कधीही अंकुरणार नाहीत याची काळजी घेणे हे लोकशाहीपुढील सर्वात मोठे आव्हान आहे. आपल्याच नव्हे तर जगातल्या सर्व लोकशाही प्रणालींपुढे हेच आव्हान आहे.

हे का होऊ शकले, मोदी किंवा ट्रम्पच्या विजयाबाबत हा प्रश्न मोठा महत्त्वाचा आहे. यात समाजाचे प्रतिबिंब आहेच. पण समाजाच्या एकंदर आकलनक्षमतेच्या संदर्भात कितीही काथ्याकूट केला तरीही या दोन व्यक्तींनी ज्या शक्यता समोर उभ्या केल्या आहेत त्या शक्यतांचा पराभव करण्याची, त्यादृष्टीने विचार आणि कृती होण्याची गरज आजच्याइतकी कधीच नव्हती.

पुरोगामी, स्वतंत्र विचारसरणीच्या व्यक्तींना लोकशाही मूल्य हेच सर्वात जवळचे शासनमूल्य आहे. शासन या आवश्यक कृतीयंत्रणेची गरज काही केल्या मोडीत काढता येत नाही. सर्व बऱ्यावाईट शक्यतांसह शासनयंत्रणा स्वीकारावी लागते- तेव्हा निदान व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच होऊ नये म्हणून बहुपर्यायी लोकशाही व्यवस्थाच स्वीकारावी लागते. एकव्यक्तीकेंद्री, एकधर्मकेंद्री किंवा एक विचारसरणीकेंद्री शासनव्यवस्था हा व्यक्तींनी बनलेल्या समाजासाठी शाप ठरतो. कारण त्यात दुसऱ्या विचाराला स्थान असणार नाही याचीच काळजी घेतली जाते.

भारत हे तुलनेने नवजात राष्ट्र असले तरीही या राष्ट्राच्या संस्थापकांनी बहुपक्षीय लोकशाही प्रणाली स्वीकारली. वैचारिक विरोध असला तरीही विचार वेगळा असण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी ही प्रणाली व्यक्तीस्वातंत्र्य, समाजाची मोकळी घडण यासाठी उपकारकच आहे. ते तसे नसून भारतीय समाज हा एका शासकाच्या हाताखालीच रहाण्याच्या लायकीचा आहे, प्राचीन भारतीय धर्मसंस्कृतीच्या वर्चस्वाखालीच रहाण्याच्या लायकीचा आहे असे या देशातील एकमेकाला धरून रहाणाऱ्या आणि गोळवलकरी-हिटलरी मूल्यव्यवस्था मानणाऱ्या वर्गाच्या गळी बालपणापासून उतरवले गेले आहे. हिंदू-वर्चस्ववादी अशी ही विचारसरणी मुळातच लोकशाही विरोधी आहे- अगदी थेट इस्लाम वर्चस्ववादासारखीच. हिंदू वर्चस्ववादी, इस्लामी वर्चस्ववादी, ख्रिस्ती वर्चस्ववादी- थोडक्यात धर्मवर्चस्ववादी, श्वेतवर्ण वर्चस्ववादी, वर्ग वर्चस्ववादी अशा कुठल्याही वर्चस्ववादी विचारसरणीच्या गाभ्यांतील विष अगदी असेच जीवघेणे आहे. व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट करणे, विचारांचे मुक्तपण नष्ट करणे आणि साच्यातून बाहेर पडलेल्या मनुष्यप्राण्यांच्या झुंडींच्या मदतीने वर्चस्व कायम करत जाणे ही या सर्व वर्चस्ववादी प्रणालींची कार्यपद्धती असावीच लागते.

युरोप धर्मवर्चस्वाच्या, वर्णवर्चस्वाच्या विळख्यात सापडला होता, त्यांनी बऱ्याच अंशी तो तोडला, अमेरिकेनेही हा विळखा बऱ्याच अंशी तोडला होता. भारतातील आणि इतर अनेक देशांतील विचारवंतांच्या घुसळणीतून कुठलाही वर्चस्ववाद झुगारून देऊन लोकशाही प्रणाली स्वीकारल्या गेल्या. हिटलर, मुसोलिनी, स्तालिन नंतर पुन्हा तशाच पोलादी पकडींत जीव गुदमरण्याची वेळ

जगातील बव्हंश राष्ट्रांनी स्वतःवर येऊ दिली नाही. माओच्या चीनने मात्र या पकडीतच जगणे पसंत केले. द.कोरिया, कांबोडिया, अरब देश, आफ्रिकेतील काही देश येथेही धर्मवर्चस्व किंवा व्यक्तिवर्चस्वाच्या रगाड्याखाली व्यक्ती अजूनही भरडल्या जात आहेत. तेथे व्यक्तीस्वातंत्र्याचा विचार दडपून टाकला गेला आहे. विचार करणे, सत्य जाणणे हा अखेर मानवजातीचा मानबिंदू आहे. पोटभर अन्न-वस्त्र-निवारा मिळाला की माणूस त्याकडे वळतोच. कदाचित् म्हणूनच एका मोठ्या जनसंख्येला नागवण्याचा विचार हुकूमशहा करतात.

जेथे जेथे लोकशाही प्रणाली रुजली तेथे तेथे कोणत्याही विचारसरणीचा शारीर निःपात करणे हे लोकशाही विचाराच्या तत्वातच बसत नव्हते. कू क्लक्स क्लॅनसारख्या अतीव अतिरेकी, विकृत संघटनेवर बंदी येऊ शकली, उघडपणे निओनाझी म्हणवून घेणारांना गप्प बसवणे सोपे होते- पण वरवर सुसंस्कृत, इतिहासातील आपल्या स्थानाचे दाखले देत उघड वर्चस्ववादाची नव्हे पण आपल्याच कथित योग्यतेची खात्री हळुहळू पटवून देणाऱ्या संघटनांना बंदी करणे हे मुळातच लोकशाही तत्वांना धरून नाही.

आज अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षसुध्दा तसा श्वेतवर्ण वर्चस्ववादाच्या तोंडात असूनही त्या वर्चस्ववादी विचाराभोवती घट्ट विणलेला नाही. काही कप्पे अजूनही मोकळे आहेत. पण भारतात मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ- त्यातून निघालेला जनसंघोत्पन्न भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या अगदी सर्वात किरकोळ अशा शिंतोड्यांसारख्या संघटना- त्यात राम सेनै आहे, बजरंग दल आहे, अपर्णा रामतीर्थकरांचा बँडबाजा आहे- यांची वीण मात्र एकमेकांशी घट्ट आहे.

बालपणापासून मने वर्चस्ववादी भूमिकेत जखडून टाकणे, प्राचीन हिंदू धर्माच्या महतीचा मध आणि इतर धर्मांच्या द्वेषाचे विष असे एकत्र मात्रेत चाटवत आपली बाळे वाढवणे हे यांना पालकत्वाचा गाभा वाटते. पुढे अशिक्षित, -अविचारीही- जनसामान्यांतील देवधर्मप्रेमाचा फायदा घेत आपली प्यादी पुढे रेटणे हे या विचारधारेने गेली नव्वद वर्षे करत नेले. इतर धर्मांच्या कट्टर संघटनाही हेच करत असतात. लोकशाही भूमिका असलेल्या विचारी लोकांच्या मनात त्यांचा पार बीमोड करावा असे येणे शक्यच नव्हते. म्हणूनच ते वाढू शकले. आणि आता संधी मिळताच ते लोकशाही ध्वस्त करून धर्मवर्चस्ववादी हुकूमशहाच्या प्रस्थापनेच्या प्रयत्नाला लागले आहेत. लोकशाही मार्गाने लोकशाहीची हत्या करणे जरूर संभवते. तो संभव टाळण्यासाठी केवळ जिवट विचारच उपयोगी आहेत.

एकदा का यांची सत्ता स्थिरावते आहे हे दिसले की सत्ताकांक्षी पक्षांतले अनेक बेडूक इथून तिथे उड्या मारतील, संधाने बांधतील. स्वातंत्र्याचा मार्ग सोडणे, निष्ठा सोडणे सर्वात सोपे असते असल्यांसाठी.

त्यांच्या विषाला उतारा देण्यात भारतीय स्वतंत्रताप्रेमी विचारवंत आणि त्यांच्या अनुयायित्वाने वाढलेले पक्ष अथवा संघटना अपयशी ठरल्या असे आज दिसत आहे. असे का झाले याचा त्यांनीच विचार करावा असा एक शहाजोगपणाचा सल्ला आजकाल नेहमीच देण्यात येतो. त्यात देखत प्रतिगामी विचारांच्या लोकांबरोबरच कुठल्याच राजकीय प्रणालींची नीट माहिती नसलेले लोकही भाबडेपणाने सूर मिसळतात. प्रतिगामी शक्तींच्या लोकशाहीप्रणित विजयाने बावचळून गेलेले अनेक लोकही हा प्रश्न गांभीर्याने स्वतःला विचारू लागले आहेत.

हा प्रश्न विचारण्याची गरज नाही. हा प्रश्न पडून घेण्याची गरज नाही. कारण याची उत्तरे वेगळीच आहेत. जगातले अनेक लोक फार कमी वाचन करतात. या देशातले तर फारच कमी. बहुसंख्यांचे इतिहासाचे, त्यातील महत्त्वांच्या घटनांसंबंधीचे ज्ञान फार तुटपुंजे असते. अनेकदा तर ते केवळ आपल्या परिवाराच्या माहितीच्या चौकटीबाहेर जातच नाही. उदाहरणार्थ- वडील म्हणाले गांधी नादान होते, नेहरू ऐय्याश होते की तीच खात्री निष्ठेने पुढे नेली जाते. संघाची लोकं हलकट असे बाबा म्हणाले की ते तसेच मान्य केले जाते. वास्तव नेमके कसे ते तपासून घेतले जात नाही. त्याबद्दलचे वाचन केले जात नाही. शहरांतही वाचनाचे प्रमाण अत्यल्प आणि दर्जा सुमार. तर गावगाड्यात अडकलेल्यांची कथा काय सांगावी.

धार्मिक परंपरांच्या लचांडात आपतः अडकलेली बहुसंख्या या गरीब देशात पोटापाण्याच्या रोजच्या व्यवहारांत इतकी बेदम अडकलेली आहे की डोक्याला ताप देणारे कोणतेही नवे विचार त्यांना झेपत नाहीत. आठदहा माणसांच्या घरात एक विचार करू पाहणारा माणूस असला तरीही त्याला कुटुंबसंस्थेचा जोरा जेंजारून टाकू शकतो. ही नको इतकी निर्ढावलेली कुटुंबसंस्थाही लोकशाही मूल्यसंवर्धनाला मारक आहे हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षून चालणार नाही.

परंपरेने या देशाच्या जवळपास पन्नास किंवा पंचेचाळीस टक्के जनतेला म्हणजे स्त्रियांना लोकशाही व्यक्तीस्वातंत्र्याची मूल्ये ही मृगजळासमान आहेत. शहरांतही जे पूर्णतः साध्य होऊ शकलेले नाही ते विचारस्वातंत्र्य ग्रामीण स्त्रियांना अपवादानेच मिळते. व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्येच मुळात न रुजलेला समाज व्यक्तीकेंद्री प्रभावक्षेत्रात न आला तरच नवल. काँग्रेस पक्षात घराणेशाही चालली याला कारण या समाजातून

आलेल्या त्यांच्या अनुयायांची तीच जखडलेली मानसिकता आहे. मातृदेवी संकल्पनेच्या प्रभावामुळे नेतृत्वक्षमता असलेल्या काही स्त्रियांना इथे सत्ता मिळाली असली म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याचे सार्वत्रीकरण झालेले नाही हे उघड आहे. अशा स्त्रियांत लगोलग दुर्गा वगैरे देवीरुपे पाहिली जातात. सर्वसामान्य स्त्रीने मात्र असले काहीही करायचे नसते. त्यामुळे हा एक मोठा वर्ग जाणीवपूर्वक मठ्ठ राहील असेच समाज वागतो.

अशा परिस्थितीत काँग्रेसपक्षापेक्षा अधिक गडगडून बोलणारा नेता आणि त्याचा पक्ष अनेक लोकांनी आपलासा केला यात विचारवंतांचा पराभव वगैरे काहीही नाही. या एका जुनाट समाजामध्ये अचानक उगवून आलेल्या लोकशाही तत्वांचे आयुष्य पुरेसे खतपाणी न मिळाल्यामुळे कोमेजले आहे इतकेच.

तरीही या समाजाने व्यक्तीस्वातंत्र्याची चव चाखलेली आहे. मोदींच्या स्वमग्न-स्वप्रेमी व्यक्तिमत्वाने फार मोठा उत्पात करायला सुरुवात केली तर हा समाज काय करेल हे अजून पाहायचे आहे.

संघाच्या साच्यात घडलेले किंवा सावलीत बसलेले अनेक लोक रामराज्य-कल्याणकारी राजा म्हणजेच कल्याणकारी हुकूमशहा योग्य असे उघड बोलतात. सध्या त्यांच्यासाठी मोदी हेच त्या पदाचे योग्य उमेदवार आहेत. बायकोला वाऱ्यावर सोडणारा माणूस- देशासाठी घरदार सोडणारा संवेदनाशील देशभक्त ठरवला त्यांनी. सूडासाठी राज्य पेटू दिलेला सामान्य वकूबाचा नेता पुरंधर ठरवला त्यांनी. आणि प्रचारासाठी कामी लागलेल्या वानरसेनेने- ट्रोलसेनेने भरपूर पूल बांधले त्याने

पादाक्रांत करावे म्हणून. इतिहासाची मोडतोड करून वाट्टेल ते बोलणारा मुळात अर्धशिक्षित मनुष्य विश्वविजेता ठरवायला वेळ नाही लागला त्यांना.

आणि अलिकडचा हा पाचशे नि हजाराच्या नोटा रद्द करण्याचा महामूर्खतेचा निर्णय मोदींनी केवळ स्वतःची व्यक्तिशः ताकद सिद्ध करण्यासाठीच देशाच्या माथी लादला. सगळे बडे मर्जीवाले सुरक्षित झाले होते. पक्षाला तोशीस लागणार नव्हती. पण हा प्रयोग होता- माझ्या थापांना लोक किती प्रमाणात बळी पडतात, किती निमूट सारे सोसतात हे पाहण्याचा. तो त्यांनी पाहून घेतला आहे. हा हुकूमशाही पद्धतीचाच निर्णय आहे. केवळ गोडगोड वाटावीत, आणि कुणीच आक्षेप घेऊ धजणार नाही अशा उद्दिष्टांचे ढोल बडवून त्यांनी जनतेला पुरते हवालदिल केले. अडचणीतील माणसे आणखी अडचण नको म्हणून आला दिवस ढकलत रहातात, बोलत नाहीत- याचा हा वस्तुपाठ ठरला आहे.

मा. मनमोहनसिंग यांनी काय किंवा इतरही विरोधकांनी उद्दिष्टे चांगली पण कार्यवाही वाईट अशी टीका केली. पण या मागचे खरे उद्दिष्ट कथित उद्दिष्टांपैकी एकही नसून- मैं झुकाता हूँ देश झुकता है एवढेच सिध्द करण्याचे होते- आणि ते निंद्य आहे. भिरकावून देण्याच्या लायकीचे आहे.

मोदींचे व्यक्तिमत्व एका अकुशल हुकूमशहाचे आहे हे या घटनेवरून पूर्णपणे स्पष्ट होते. या अकुशल, असंस्कृत हुकूमशहाला आपल्या लोकशाही तत्वांनीच मानेवर बसवून घेतले आहे. बरं- मग पुढे?

आता याला प्रखर विरोध करणे एवढेच स्वातंत्र्यप्रेमी विचारांच्या थोड्या लोकांच्या हाती आहे. २०१९मध्ये पुन्हा एकदा हा गुलामवादी विचार जिंकू शकतो. पण तरीही जी थांबत नाही तीच विचारांची- विचारांच्या स्वातंत्र्याची लढाई आहे. जोवर लोकशाही रचना पूर्णपणे नष्ट करत नाही तोवर जोरात आणि नष्ट केल्यास भूमिगत असा हा विरोधाचा लढा चालला पाहिजे. विरोधी राजकीय पक्ष वेगळे, आणि विचारशील स्वतंत्र व्यक्ती वेगळ्या.

भारतीय संस्कृती ही आमचीसुध्दा आहे. त्यातील बरे ते ठेवून हीण ते फेकून देऊन तिचा प्रवाह खळाळता ठेवणारे आम्ही विचारी लोक. आम्ही तुम्हा साऱ्या बिळातल्या ढोलबडव्यांपेक्षा अधिक संस्कृतीप्रेमी आहोत. तुमच्या देशभक्तीच्या फडतूस कल्पना फुंकतो आम्ही.

समाजाला बंदिस्त करून गुलाम बनवण्याच्या असल्या स्वप्नांना आम्ही विचारांनी विरोध करत राहू. त्यांच्या थापाभूलथापा उघड्या पाडत राहू. त्यांच्या आज्ञांना भिणार नाही. ज्या काही संस्था व्यक्तीस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य जपतात त्यांचे रक्षण करू. तरूण मुलांना विचारस्वातंत्र्याचे मोल पटवून देणारी पुस्तके वाचायला लावू- किती पुस्तके बॅन करतील ते? आमची निर्भयता त्यांना अखेर मोडून पाडेल. आमचा सत्यावरचा ठाम विश्वास त्यांना पराभूत करेल. त्यांच्या गोंडस सुभाषितांतून, घोषणांतून, नैतिकतेच्या फोलपटांतून त्यांना आरपार पाहातो आहोत आम्ही. त्यांची ओळख पटवण्यात तेच मदत करणार आहेत- आम्ही फक्त त्यावरचा उदबत्त्यांच्या धुराचा पडदा फेडून टाकू.

त्या देशात श्वेतवर्णवर्चस्ववादाविरुध्द, त्या देशात इस्लामी वर्चस्ववादाविरुध्द, त्या देशात टोळीवर्चस्ववादाविरुध्द आमचेच वैचारिक सहोदर लढणार आहेत. आम्ही इथे हिंदू वर्चस्ववादाचे पडघम वाजू लागताच थोडे उशीरा का होईना जागे झालो आहोत. आम्ही मोदी आणि त्यांच्या पक्षाच्या कवायती सैन्याशी, बुध्दीमान गोबेल्सशी कुठल्याही सत्तालोभाशिवाय, अप्रामाणिक धनलोभाशिवाय लढणार आहोत.

आज ज्या पद्धतीने मोदींची प्रचारी सेना, पाठिराखे पक्षीय लागेबांधे नसलेल्या विचारवंतांचा अधिक्षेप करतात, त्यांना फुरोगामी, लुळेपांगळे, सिक्युलर वगैरे अभिधाने देतात, त्यांना पैसा पोहोचलाय का विचारतात त्यावरून त्यांना अशा स्वतंत्र वृत्तीच्या विचारवंतांची भयंकर भीती वाटते आहे हे स्पष्ट होते. अधिक्षेपाचे शस्त्र वापरण्याची त्यांच्यावर वेळ आली हे या भीतीचेच लक्षण आहे. नाकारू देत कितीही.

त्यांचे हे शब्द-अपशब्द गौरवपत्रासारखे मिरवावेत. विचारांच्या पातळीवर ते नेहमीच पराभूत होते. नेहमीच रहातील. सत्याच्या पातळीवर ते नेहमीच पांगळे होते. नेहमीच रहातील. त्यामुळे या धुळवडीकडे सरळ दुर्लक्ष करून विचारस्वातंत्र्य प्रिय असलेल्या सर्व विवेकी लोकांनी आपली कठीण अशी झुंज सुरूच ठेवली पाहिजे. ज्या देशात लोकांना ‘यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भविति भारत, अभ्युत्थानम् अधर्मस्य संभवामि युगे युगे’ यासारखे महाकाव्यातले काव्यात्म वचन एखाद्या व्यक्तीच्या जन्माच्या स्वरुपात अजूनही खरे वाटते तिथल्या विचारांच्या ग्लानीची भीती वाटण्यासारखीच परिस्थिती आहे. इथे अजूनही लोक एका विचाराला देवाचे रूप

देतात आणि मग विचार विसरून जातात. जन्म नि मरण यांच्या सोयरसुतकाच्या अविरत सोहळ्यांत  नव्या विचाराचे स्पर्श बुध्दीला हलवून सोडूच शकत नाहीत. विचारांच्या ग्लानीवर उत्तर देतो तो प्रत्येक युगातला नवा विवेकी विचार आणि त्यातून निर्माण झालेली कृती  हे पटवणे कठीण आहे. पण ते पटवले पाहिजे. प्राप्त परिस्थितीशी लढायला उद्युक्त करणारा विवेकवाद आताच्या या मोदीशहासंघरूप संकटाशी झुंजवावा लागेल. धरून चालू त्यांचा पगडा अजून काही काळ कायम राहील. पण अखेर सत्य बाहेर येतेच. आजच त्यांच्या पक्षातील, संघातीलही अनेकांना त्यांचे खरे रूप अलिकडच्या नोटनिर्णयानंतर जाणवले आहे. त्यांच्या स्वभावविकृतीच्या कथा हळुहळू त्यांच्याच आतल्या गोटांतून प्रसृत होऊ लागल्या आहेत. स्वतःवर खूष असलेल्या, राक्षसी महत्त्वाकांक्षी असलेल्या, बोलक्या माणसाचा करिश्मा- रोजच्या पोटापाण्याच्या मागे असलेल्या साध्याभोळ्या लोकांना भुलवतोच याची आपण राज्याराज्यांत अनेक उदाहरणे पाहिली आहेत. मोदी हे त्या सर्वांचे मेरूमणि म्हणायचे. आणि ज्या संघटनेतून त्यांना द्वेषाचे आणि स्वयंश्रेष्ठत्वाचे बाळकडू मिळाले ती संघटना लोकशाहीविरोधी असल्यामुळे त्यांचा धोका फार मोठा आहे. उद्या त्यांचे उजवे हात अमित शहा त्यांची जागा घेऊन आले तर तेही तितकेच धोकादायक ठरतील. या संघटनेच्या विचाराला- अविचाराला थाराच मिळू नये हे साध्य करायचे तर ती झुंज शतकभराची असेल. किंवा अधिक. आत्ताच पुरोगामी का अयशस्वी ठरतात याचे मूल्यमापन करा, ते कधीच जिंकणार नाहीत वगैरे टीकेचा भाग हा त्यांच्या खिजवण्याच्या धोरणाचा भाग आहे. त्याला

बळी पडून पराभूत मानसिकता आपण स्वीकारता कामा नये. पल्ला बराच मोठा आहे.

कारण आपला देश, आपले लोक आहेत हे असे आहेत...

देश सोडता येत नसेल, लोक सोडता येत नसतील तर- देशातील लोकांच्या डोक्यांच्या घड्यांवर पाणी ओतत रहाण्यावाचून दुसरा काय पर्याय आहे?

तेच करत राहू या.

मी मांडलेल्या या विवेचनाचे बरेच मोठे श्रेय येल विद्यापीठातील इतिहासाचे, होलोकॉस्ट इतिहासाचे प्राध्यापक टिमथी स्नायडर यांना आहे. त्यांच्या विश्लेषणांतून या विवेचनाला दिशा मिळाली आहे. प्रा. टिमथी स्नायडर यांनी लोकशाहीच्या संरक्षणासाठी काय करायला हवे या विचाराचे वीस मुद्दे मांडले आहेत. ते मी माझ्या भाषणाच्या अंती, इथे आपल्या सर्वांसाठी तसेच्या तसे देत आहे. हे मुद्दे ऐकत असताना आपल्याकडल्या उदाहरणांचा मी उल्लेख केला नाही तरीही तुम्हाला ती उदाहरणे नक्की आठवतील याची खात्रीच आहे मला.

गरज नसताना अगोदरच माना तुकवू नका. बऱ्याचशा अधिकारशहांना जी सत्ताशक्ती मिळते ती लोक स्वतःहून देऊ करत असतात. असल्या कठीण काळात तर अनेक व्यक्ती शासनाला आपण कसं वागलेलं रुचेल याचा विचार करून आधीच तसे वर्तन करू लागतात. तसं करू नका. त्यांना अपेक्षित असलेला आज्ञाधारकपणा आधीच देऊ केलात तर अधिकारशहांना लोकांना आज्ञांकित करण्यातील शक्यता ध्यानी येतात. आणि त्यांची आपल्या स्वातंत्र्यावरील जुलमी पकड घट्ट होत जाते.

**संस्थेचे रक्षण करा.**

न्यायालये, माध्यमे, किंवा वृत्तपत्रे यांचा मागोवा घेत रहा. कुठल्याही संस्थेला आपली मानत असाल तर तिच्यासाठी काही कृती करावी लागेल. संस्था कधीच स्वतःच स्वतःला संरक्षित करू शकत नसतात. त्यांना सुरुवातीपासून विचारसामर्थ्याचे पाठबळ नसेल तर त्या झरझर गडगडत जातात.

राष्ट्रनेते आणि पुढारी जर नकारात्मक उदाहरणे घालून देत अशतील तर आपण आपले काम अधिकच न्यायबुध्दीने करणे महत्त्वाचे ठरते. कायद्याचे राज्य मोडीत काढणे वकिलांशिवाय शक्य होत नाही, आणि दिखाऊ खटले चालवणे न्यायाधीशांशिवाय शक्य होत नाही.

**राजकारण्यांची भाषणे ऐकताना काही शब्दांकडे सावधपणे लक्ष असू द्या.**

दहशतवाद, अतिरेकी या शब्दांचा वापर वाढू लागला की सावध व्हा. अपवादात्मक परिस्थिती किंवा आणिबाणीची परिस्थिती या कल्पना मोठ्या धोकेबाज असतात. देशभक्तीच्या फसव्या शब्दयोजनांबद्दल मनात संतापच असायला हवा.

**कल्पनेपलिकडची अवांच्छित परिस्थिती उद्भवली तर शांत रहा.**

दहशतवादी हल्ला झाला असेल, तर सर्वप्रथम हे लक्षात ठेवा की अनेकदा सगळे अधिकारशहा अशा घटनांची फार वाट पाहात असतात. त्यातून त्यांच्या

शक्तीचे एकत्रीकरण होत रहायला मदतच होणार असते. राइशटॅगच्या आगीची आठवण ठेवा. असल्या प्रकारची आपत्ती सत्तेचा तोल ढळवायला, विरोधकांना नामोहरम करायला उपकारक ठरते. हिटलरी पाठ्यपुस्तकातला फार महत्त्वाचा धडा आहे तो. त्याला बळी पडू नका.

**भाषेचा सुज्ञ वापर करा.**

सगळेजण एकसाथ जे वाक्प्रचार वापरत आहेत ते वापरणं टाळा. स्वतःची वैचारिक बोली स्वतः घडवा. दुसरे लोक जे बोलत आहेत तेच तुम्ही मांडणार असलात तरीही. झोपण्यापूर्वी इंटरनेट वापरू नका. आपली गॅजेट्स दुसरीकडे चार्जिंगला लावा. आणि वाचा. काय वाचणार? वाक्लाव हॅवेलचे द पॉवर ऑफ द पॉवरलेस, जॉर्ज ऑर्वेलचं १९८४, स्झेस्लॉ मिलोझचे द कॅप्टिव माइन्ड, आल्पर्ट काम्यूचे द रिबेल, हॅना आरेन्डचे द ओरिजिन्स ऑफ टोटॅलिटेरियनिझम, किंवा पीटर पोमेरान्त्सेवचे नथिंग इज ट्रू अँड एव्रीथिंग इज पॉसिबल.

**वेगळे उठून दिसा.**

कुणीतरी असायलाच हवं वेगळं. उक्तीने आणि कृतीने सर्वांसारखंच असणं सोपं असतं. काहीतरी वेगळं करणं थोडं विचित्र, अस्वस्थ करणारं वाटेल. पण थोडं अस्वस्थ झाल्याविना मुक्ती मिळणार नसते. ज्या क्षणी तुम्ही उदाहरण घालून देता, जैसे थेचे गारूड भंग पावते. आणि मग इतर अनेक तुमच्या सोबत चालू लागतात.

**सत्यावर विश्वास ठेवा.**

वास्तव नाकारणे म्हणजे स्वातंत्र्यच नाकारणे. काहीच सत्य नसेल तर मग सत्तेवर कुणी टीकाच करू शकणार नाही, कारण तसं करायला काही पायाच उरत नाही. काहीच सत्य नसेल तर मग सगळाचा देखावा. आंधळं करून सोडणाऱ्या झगझगाटावर कुणीतरी भरपूर पैसा खर्च करत असतं हे कधीही विसरायचं नाही.

**शोध घेत रहा.**

घटनांचे अर्थ स्वतः लावायचा प्रयत्न करा. दीर्घ लेख वाचण्यासाठी वेळ काढा. शोधपत्रकारिता करणाऱ्या प्रिंट मिडियाला आर्थिक पाठबळ द्या. तुमच्या डोळ्यासमोरच्या चकचकत्या पडद्यावरच्या अनेक गोष्टी तुमचे नुकसान करण्यासाठीच तिथे चमकत असतात हे समजून घ्या. विदेशी प्रचाराचा शोध घेणाऱ्या साइट्सबद्दल वाचा.

**थोडं सक्रीय राजकारण.**

सत्ताधाऱ्यांना तुम्ही खुर्चीत बसूनबसून थुलथुले व्हावे, तुमच्या भावना पडद्यावरच्या चकचकाटात विरळ विरंजित व्हाव्यात असेच वाटत असते. बाहेर पडा त्यातून. जरा अनोळखी लोकांत, अनोळखी जागी फिरा. नवे मित्र जोडा आणि त्यांच्यासोबत चार पावले चाला.

**डोळ्याशी डोळा भिडवा, बोला.**

हे केवळ विनम्रता दाखवण्यासाठी नव्हे. आपल्या परिसराशी जोडून घेण्यासाठी करावे लागेल. अनावश्यक सामाजिक भिंती पाडण्यासाठी, कोणावर विश्वास ठेवायचा आणि कुणावर नाही, हे समजण्यासाठी हे करावे लागेल. आपल्याला इतर सर्वांना तुच्छ लेखण्याच्या काळात जगण्याची वेळ आली तर आपल्या रोजच्या जगण्यात डोकावणाऱ्या मनोभूमिकांशी ओळख हवीच.

जगात जे घडतं आहे त्याची जबाबदारी स्वीकारावी लागेल स्वस्तिके किंवा अशाच द्वेषचिन्हांकडे डोळे उघडून पहा. नजर फिरवून काहीच साध्य होणार नाही. या चिन्हांपासून स्वतःला दूर ठेवा आणि इतरांना तेच उदाहरण घालून द्या.

**एकपक्षीय राष्ट्राच्या कल्पनेला विरोध करा.**

ज्याज्या पक्षांनी आजवर एकछत्री सत्ता काबीज केली ते कधीतरी काही काळापूर्वी वेगळे होते. आपल्या विरोधकांना मोडून काढण्यासाठी त्यांनी एखादा ऐतिहासिक क्षण वापरून घेतला. असे होऊ नये म्हणून सर्व निवडणुकांत सहभागी होऊन मतदान करा.

**चांगल्या कामांना आर्थिक मदत करा.**

चांगले काम करणारी एखादी संस्था शोधून तिला नियमित मदत करा. यामुळे आपण नागरी समाजाचा एक भाग आहोत आणि स्वतंत्र निवड करू सकतो हे भान जागे राहील.

**खाजगी अवकाश सांभाळा.**

हलकटपणे वागणारे सत्ताधारी तुमच्याबद्दलची माहिती वापरून तुम्हाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतील. आपला कॉँप्युटर वेळोवेळी मालवेअरमुक्त करा. इमेल्स म्हणजे खुल्या आकाशावर लिहिण्यासारखेच आहे. इंटरनेटवरील पर्यायी मार्ग वापरून संपर्क करा. किंवा सरळ नेट कमीच वापरा. व्यक्तिगत निरोप व्यक्तिशः प्रत्यक्षच द्यायची सुरुवात करा. कायद्याशी संबंधित काहीही प्रकरणे असतील तर ती लवकरात लवकर निपटून टाका. अधिकारशहांचे राज्य अखेर ब्लॅकमेलवर चालते. कुठल्या हुकाला तुम्हाला टांगायचं त्याचा शोध घेत असते. फार जास्त हूक्स ठेवू नका.

**इतर देशांकडून शिका**. विदेशांत आपले मित्र असू द्या. नवे विदेशी मित्र अवश्य जोडा. इथल्या अडचणींतून एक सार्वत्रिक दिशा दिसते आहे. कुठल्याच देशाला एकेकट्याने उत्तरे मिळणार नाहीत. तुमच्याकडे आणि तुमच्या कुटुंबियांकडे पासपोर्ट्स असतीलच असं पहा.

**निमलष्करीदलांकडे लक्ष असू द्या.**

व्यवस्थेच्या विरोधात असल्याचं बोबंलून सांगणारे लोक जेव्हा गणवेष धारण करून, मशाली पेटवून कवायती करू लागतात, एखाद्या नेत्याचं चित्र फडकवत

फिरतात तेव्हा अखेर जवळ आली असं समजा. नेत्याचे निमलष्करी अनुयायी आणि अधिकृत पोलीस किंवा लष्कर मिसळू लागतात तेव्हा खेळ संपला असंच समजायचं आहे.

**शस्त्र धारण करण्यापूर्वी विचार करा.**

सार्वजनिक सेवेचा भाग म्हणून तुमच्याकडे शस्त्र असेल तर देव तुमचं भलं करो आणि तुमचं रक्षण करो. पण भूतकाळात पोलीस आणि शिपाई यांनी केलेली दुष्कृत्ये आठवा. नकार देण्याची मानसिक तयारी ठेवा. याचा अर्थ समजत नसेल तर एखादे होलोकॉस्ट म्यूझियम अवश्य पहा आणि कर्तव्यातील नैतिकता पालनाच्या प्रशिक्षणाबद्दल थोडेसे जाणून घ्या.

**धैर्यवान रहाण्याचा यत्न करा.**

आपल्यापैकी कुणीच स्वातंत्र्यासाठी मरायला तयार नसेल तर आपण सारेच स्वातंत्र्याविना मरून जाऊ.

**देशभक्त असा.**

नवा अध्यक्ष देशभक्त नाही. अमेरिका काय आहे याचे भान येणाऱ्या पिढ्यांना असावे म्हणून चांगले उदाहरण आपणच घालून द्यायला हवे. त्यांना त्याची फार गरज भासेल.

टिमथी स्नायडर यांनी जणू एक रोडमॅप दिला आहे. जो अमेरिकेलाच नव्हे तर लोकशाही प्रेमी भारतदेशालाही मार्गदर्शक ठरणार आहे.

या देशात लोकशाहीप्रणाली रुजण्यासाठी कारणीभूत ठरलेले गांधी, नेहरू, आंबेडकर असे तत्ववेत्ते नेतृत्व वावरून गेले. त्यांनी या लोकशाहीला जे दिले ते असे सहजी पराभूत होणारे नाही. संतति पित्याच्या विचारांचा पराभव करताना पाहतो आपण. पण खऱ्या चिरंतन मूल्यविचाराचा पराभव फार काळ टिकत नाही.

विज्ञान-तंत्रज्ञानाची वाटचाल गेल्या शतकापासून अभूतपूर्व वेगाने सुरू आहे. एका स्थित्यंतराच्या शतकभराच्या काळात इस्लामिक स्टेट, तालिबान, ट्रम्प, पुतीन, मोदी यांच्या सारखी भिरभिरी उठतील जरूर. पण काळ त्यांना अखेर पाचोळ्यासारखा फेकून देईल. विज्ञानाचे वारे, विवेकाचे शब्द जगाचे सारे वातावरण निश्चित करतील असा विश्वास आपण बाळगायलाच हवा कारण ते सत्य आहे.

आपल्या हृदयातली विवेकाची ज्वाळा सतत जळत ठेवण्याची भाषा आपण सर्वांनी शिकायला हवी. भीती ही अत्यंत भीतीदायक गोष्ट आहे हे एकदा स्वच्छपणे कळले की त्यावर मात करायला वेळ लागत नाही.

आपल्या विचारांचे फळ चुटकीसरशी किंवा एकाददुसऱ्या निवडणुकीसरशी नाही मिळणार कदाचित्. पण तरीही हाच विचार खरा आहे. आपली देशभक्ती खरी आहेच आणि आपले मानववंशावरले प्रेम कुठल्याही कुंपणांत बांधले जाणारे नाही.

***

## खुन्या गर्दीचा सैतान अवतरला आहे

सामूहिक हिंसाचाराच्या- मॉब लिंचिंगच्या- घटना काही या जगाला नवीन नाहीत. युद्ध हा एक सामूहिक हिंसाचारच असला तरीही त्यात एक प्रकारे तोल असतो. कारण दोन्ही बाजूंकडे दुसऱ्याला ठार करण्याची शस्त्रे असतात. दुसरा आणि सामाजिक दृष्ट्या सर्वांनाच भयग्रस्त करणारा सामूहिक हिंसाचार म्हणजे दुर्बळ, एकट्यादुकट्या किंवा मूठभर माणसांना एखाद्या तुलनेने मोठ्या जमावाने ठार करणे. यात मारले जाणारे निःशस्त्र असतात आणि मारणारांकडे अगदी जुजबी स्वरुपाची शस्त्रे असतात. जमावाची संख्या आणि त्यांचा हिंसक आवेश हेच खरे शस्त्र असते. कधीकधी अगदी लाठीकाठीसारखे प्राथमिक शस्त्र नसूनही केवळ लाथाबुक्क्यांचा वर्षाव करूनही ठार केले जाते.

संपूर्ण जगभरात, आणि मानवी संस्कृतीच्या असंस्कृत म्हणाव्या अशा इतिहासात दुर्बळांच्या सामूहिक हिंसाचारातून झालेल्या हत्यांची नोंद आहे. भारतात अशा प्रकारे झालेली- निःशस्त्राची सशस्त्र समूहाने केलेली अमानुष हत्या ही अधर्माचे उदाहरण म्हणून महाभारतासारख्या महाकाव्यात नोंदली गेली. अभिमन्यू... आणि तरीही तो युद्धाचा एक भाग तरी होता. तोही शस्त्र घेऊन चक्रव्यूहात शिरला आणि निःशस्त्र झाल्यानंतर मारला गेला.

अप्रगत संस्कृतीच्या एका टप्प्यावर रानटी टोळया एकट्यादुकट्यांना निःशस्त्र करून ठार करत असे आपल्या कानावरून गेले आहे... अमेरिकेत गेल्या शतकात आफ्रिकन अमेरिकनांची गुलामीतून मुक्तता झाल्याच्या द्वेषातून ज्या सामूहिक हिंसाचारातून हत्या झाल्या तेव्हा प्रथम लिंचिंग हा शब्द प्रचारात आला. तेव्हाही हे लिंचिंग इतके वाढले होते की मार्क ट्वेन या प्रसिद्ध लेखकाने म्हटले हा देश आता युनायटेड स्टेट्स ऑफ लिंचरडम अशा नावाने ओळखला जाईल की काय... पण तेव्हाही तंत्रप्रगती आजच्या तुलनेत जेमतेम होती.

पण आज आपल्या देशात तंत्रप्रगतीच्या या एका टप्प्यावर रानटी टोळयांहून अधिक अविचारी हिंसाचार केवळ अनाठायी भयाच्या उद्रेकातून होतो आहे. जमावाने कुणालाही ठेचून मारणे, बलात्कार करून ठेचणे हे या देशात क्वचित कधीतरी होणारे दुःसाहस आजकाल दरमहा होत चालले आहे. कारणे वेगवेगळी... मनःस्थिती तीच. माज तोच. कायद्याची पत्रास न बाळगणे तेच.

२०११ ते २०१३ या वर्षांत देशभरात अशा सामूहिक हिंसाचारांत मारले गेलेल्या १५ व्यक्ती होत्या, तर जखमी झालेल्या २६.

याची सुरुवात कुठून झाली... होय. तीन दिवस काहीही करा... मी तुम्हाला सांभाळून घेतो या त्या आश्वस्त करणाऱ्या अभयदानानंतरच. सर्वांना माहीत असलेले गुपित आहे ते.

२०१४ पूर्वी या देशात गोमांस खाल्ले जात होते. ज्यांना खायचे त्यांना खायला मनाई नव्हती. ज्यांना न खायचे त्यांना खायला सक्ती नव्हती. पण संस्कृतीप्रेमाचे

बेगड शिंगांना बांधून उधळलेल्या मारक्या जनावरांनी हे सारे आपल्या फोडा आणि झोडा नीतीमधून बदलून टाकले.

गोमांस खाल्ल्याच्या, गायींना कापण्यासाठी नेत असल्याच्या केवळ संशयावरून २०१४पासून किती मुस्लिम माणसांच्या हत्या झाल्या... अखलाख, जुनैद, पहलू यांच्या हत्या तर राष्ट्रीय पातळीवर गाजल्या. पण २०१४ नंतर मारहाण झालेले, जखमी झालेले, कायमचे अधू झालेले रफिक, हबीब, असीफ, रेहान, मुहंमद नासिर, नासिरुल हक, मुहंमद समीर, शाकिर मोहसीन, हाशिम, मोईन शोकत अली, कौशिक पुरकायस्थ, शदाब, आफताब... बरीच लांबलचक यादी आहे आजवरची. गोहत्येच्या संशयावरून पाच दलितांना जमावाने ठार केल्याची सर्वात ठळक घटना २००२मध्ये गुजरातमध्ये घडली होती.

इंडियास्पेंडच्या एका अहवालातून असे उघड झाले आहे की २०१० ते २०१७ या काळात गोरक्षा- गोहत्या-गोमांसभक्षण या विषयाभोवतीने जो काही हिंसाचार झाला त्यातील ९७ टक्के घटना गेल्या तीन वर्षांत घडल्या आहेत. गोरक्षण दले, गोमांसाच्या विक्रीवरील बंदी हे सारे सुरू झाल्यानंतर यापैकी ६१ घटना घडल्या. सामूहिक हिंसाचारातून माणसे मारण्याचा जणू परवानाच गोरक्षणातून दिला गेला. आणि यातील सर्वाधिक घटना या भाजप शासित राज्यांतून घडल्या आहेत हेही वास्तव आहे.

हे झालं गोरक्षक, बजरंग दली गोरक्षक अशा हिंदुत्वाच्या काठावरच्या संघटनांच्या जमावांनी केलेले हल्ले आणि मारहाणींचं.

लव जिहादच्या नावानेही कित्येक लोकांना ठार करण्यात आलं जमावांकडून, यात तर फक्त मुस्लिमच नव्हे तर जाती-पोटजातीच्या सन्मानाच्या नावानेही बळी गेले. नितीन आगेलाही जातजमावानेच छळछळून मारलं होतं.

केवळ धर्मद्वेषातून पुण्याच्या मोहसीनला मारणाराही जमावच होता.

पण आता अलिकडच्या दोन महिन्यांतून दिसतंय जमावाच्या अविचारातून सरळ ठेचून, मारहाण करून ठर करण्याची कारणं धर्माशी किंवा रूढींशी संबंधितच राहिलेली नाहीत. कोणत्याही कारणाने हे होऊ लागले आहे. पूर्वी खिसेकापूंना किंवा चोरांना पकडल्यानंतर जमावाने कायदा हातात घेण्याच्या घटना क्वचित होत असत. पण केरळमधल्या त्या मतिमंद चोर तरुणाला मारत सेल्फी काढणाऱ्या जमावानंतर हे वाढतच चालले आहे.

अलिकडच्या त्रिपुरापासून, जळगाव-धुळेपर्यंत वॉट्सॅप विद्यापीठातून मिळालेल्या माहितीवरून बिथरून निष्पापांचे खून करण्याच्या घटना हेच सांगतात.

फार वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यात भौगोलिक सर्वेक्षण करायला गेलेल्यांची गावकऱ्यांनी संशयावरून हत्या केल्याची घटना गाजली होती. पण त्यानंतर योग्य खबरदारी शासकीय पातळीवरून घेतली गेली होती. बऱ्याच वर्षांपर्यंत पुन्हा काही अशा घटना घडल्या नाहीत.

खुनी जमावांना संरक्षण देणे, त्यांच्या बाजूने घोषणा देत मोर्चे काढणे, असल्या हिंसेला प्रोत्साहन देणारांना बक्षीस देणे, सन्मानित करणे असे करणारे लोक सत्तेत आले आहेत. जंगलाच्या नरभक्षक राजाने तरसांना अभय दिले तर याहून वेगळे काय

होणे अपेक्षित आहे. सोशल मिडियावर चुकीची माहिती फिरवणे हे तर गेल्या चार वर्षांत राजमान्य झाले आहे. फिरेल ते सत्य अशी सत्याची नवी व्याख्य़ा झाली. आता अशा फिरत्या सत्याच्या द्वारे  आता वाट्टेल त्या 'धर्म'निरपेक्ष अफवाही उठल्या तरीही हिंसाचार होऊ शकतोच. गलिच्छ भाषेबरोबरच ठार करण्याची भाषा करणारे आय़टी कुबुद्धीवंत माध्यमांतून सामूहिक हिंसाच करत असतात- ती शाब्दिकच राहील याची गॅरंटी संपली.

यांचे तथाकथित 'विचारक' ज्या भस्मासुराला वरदान देऊन चुकले आहेत, तो मनमानी हिंसेचा भस्मासुर आता कुणाच्या डोक्यांवर हात ठेवू शकतो. याला नष्ट करण्यासाठी कुणाचीही मोहिनी कामी येणार नाही. किंबहुना सामूहिक हिंसेच्या भस्मासुराचे कारण पुढे करून अघोषित नाझी राजवट- (आणिबाणी नव्हे ती तर अगदीच सौम्य-मर्यादित हुकूमशाही होती) लवकरात लवकर घोषित होण्याचीच शंका येते आहे.

विवेकाचा लय हर प्रकारे होऊ शकतो.

***

# पत्रकारितेचा कस लागेल

राज्यसत्तेसमोर शेपूट घोळणाऱ्या माध्यमांचा शाप ज्या समाजांना असतो त्या समाजांतील आचार-विचार-उच्चार स्वातंत्र्य धोक्यात येते हे काही कुणी नव्याने सांगण्याची गरज नाही.

राजेशाही, सरंजामशाही भिरकावून देण्याचा संकल्प करून ज्या समाजांनी लोकशाहीकेंद्री शासन व्यवस्था स्वीकारली त्या समाजांना जुन्या पठडीतल्या विचारसरणींचा जोर वाढू नये आणि सत्ताकांक्षी लोकांकडून वा संघटनांकडून मुस्कटदाबी होऊ नये यासाठी स्वतःला जागते ठेवावेच लागते. ही जबाबदारी अर्थातच सर्व लोकांवर असली तरीही न्यायव्यवस्था आणि माध्यमे यांच्यावर ती तीव्रतेने असते.

ट्रम्प महोदय अमेरिकेत निवडून आले आणि शपथ घेण्यापूर्वीच त्यांनी आपण विरोधी माध्यमांना, पत्रकारांना काय प्रकारे वागवणार याची चुणूक दाखवली. एका पत्रकारास तो विकलांग म्हणून खिजवले, काही पत्रकारांना तुम्ही या दोशाचे नाहीत म्हणत हाकलून लावले आणि काही गंभीर प्रकृती चॅनेल्सची खोट्या बातम्या देणारे म्हणून हेटाळणी सुरू केली. व्हाइट हाऊसच्या बातम्या निवडक, मर्जीतल्या पत्रकारांसमोर देण्याचे सत्र सुरू केले.  (होय- आपल्या देशातल्या परिस्थितीशी साधर्म्य वाटत असले तरीही हे सारे अमेरिकेतच होत आहे.)

येणाऱ्या परिस्थितीचा अंदाज येताच शपथविधी होण्याआधीच युएस प्रेस कोरने (US Press Corp) ट्रम्प तात्यांना एक पत्र लिहिले. ते असे-

प्रिय नवनिर्वाचित अध्यक्ष महोदय,

आपल्या अध्यक्षपदाचा उद्घाटन सोहळा होण्याआधी, आपले प्रशासन आणि अमेरिकन प्रेस कोअर यांमधील संबंध कसे असतील यासंबंधी काही मुद्दे स्पष्ट करून सांगितलेले बरे असे आम्हाला वाटते.

आपणास आश्चर्य वाटायलाच नको, की आपले संबंध तणावपूर्णच राहातील हे आण्ही जाणून आहोत. गेल्या काही दिवसांतच आम्ही ऐकून आहोत, की आपल्या संपर्क सचिवांनी व्हाइट हाउसमधून माध्यमांचे कार्यालये बाहेर काढण्याचा विचार चालवला आहे. संपूर्ण निवडणूक मोहिमेतील आपल्या वर्तनाशी ते सुसंगतच आहे. तुम्ही अनेक वार्तांकन करणाऱ्या संघटनांना, माध्यमांना आपल्या सभा-बैठकांचे वार्तांकन करण्यापासून रोखले आहे. ट्विटरवर जाऊन तुम्ही काही पत्रकारांवर व्यक्तिशः टोमणेबाजी करणे, धमक्या देणे असे करू लागला आहात आणि तुमच्या पाठिराख्यांनीही तसेच करावे यासाठी उत्तेजनही दिले आहे. बदनामीसंबंधातील कायदे जरा ढिलेढाले व्हावेत याचा आपण पुरस्कार करीत आहात आणि बदनामीचे खटले भरण्याच्या अनंत धमक्या तुम्ही देऊन झाल्या आहेत. त्यातील एकही खटला भरला गेलेला नाही अर्थातच. तुम्ही शक्य तेव्हातेव्हा पत्रकारांना टाळत आला आहात आणि एकत्र वृत्तसंकलनाची पद्धत धुडकावून तुम्ही पत्रकारपरिषदा घेण्यासही नकार देत आहात. तुम्हाला न आवडणारे काहीतरी लिहिल्याबद्दल तुम्ही एका पत्रकाराच्या शारीरिक व्यंगावरून त्याची जाहीर खिल्ली उडवलीत.

हे सारे करणे ही अर्थातच तुमची व्यक्तिगत निवड आहे आणि एका अर्थी तो तुमचा हक्कही आहे. आपली राज्यघटना माध्यमांचे स्वातंत्र्य जपत असली तरीही

एखाद्या राष्ट्राध्यक्षाने त्याचा सन्मान ठेवावा असे काही त्यात लेखी सांगून ठेवलेले नाही. राष्ट्राध्यक्षांनी नियमितपणे पत्रकार परिषदा घ्याव्यात असेही राज्यघटनेत नोंदवून ठेवलेले नाही.

पण पत्रकारांबरोबर, माध्यमांबरोबर कसे वागावे याचे नियम ठरवण्याचा तुम्हाला जसा हक्क आहे तसाच तुमच्याशी कसे वागावे हे ठरवण्याचा हक्क आम्हालाही आहेच. अखेर, तुम्हाला प्रभाव टाकावासा वाटतो ते स्तंभ आम्ही लिहितो, जो माध्यम अवकाश तुम्हाला भरावासा वाटतो तो अर्थातच आमच्या हाती आहे.

आमच्या वाचकांना, श्रोत्यांना, प्रेक्षकांना कशा प्रकारे सेवा द्यावी हे आम्ही ठरवतो, तुम्ही नाही.

त्यामुळे पुढील चार वर्षांत आमच्याकडून काय अपेक्षा ठेवायची हे तुम्ही जी पार्श्वभूमी तयार केली आहेत, त्यावरच अवलंबून राहील.

आमच्याशी संपर्क राहिला तर स्वागतार्ह आहे, पण तो अत्यावश्यक नाही. तुमच्या प्रशासनाशी पत्रकारांचा संबंध येऊ न देणे हे तुम्हाला फार सोयीचे वाटत असेलही. आम्हाला ते चूक वाटते, पण ठीक आहे- निवड तुमचीच आहे. आम्ही सारे माहितीचे पर्यायी स्रोत शोधण्यात वाकबगार आहोत. स्पष्टच सांगायचं तर, ज्या वृत्तवाहिन्यांना आपण आपल्या मोहिमांत येण्यास बंदी घातलेली त्यांनीच सर्वोत्तम वार्तांकन केले. आम्हाला अमकी बंदी आहे, तमका मज्जाव आहे वगैरे ऐकायला बरं वाटतं असं नाही, पण ते एक आव्हान ठरतं, जे आम्हाला फारच आवडतं.

काय ऑफ द रेकॉर्ड असावं आणि असेच इतर नियम आम्ही ठरवत असतो, तुम्ही नाही. तुमच्या एखाद्या अधिकाऱ्याशी ऑफ द रेकॉर्ड बोलणे आम्ही मान्य करू किंवा न करू. आम्ही तुमच्या पूर्वतयारीच्या बातचितींसाठी, तुमच्या सार्वजनिक उत्सवी गोष्टींच्या पूर्वकल्पनेसाठी येऊ नाही तर न येऊ. आमची निवड असेल. तुमचे नियम अमान्य करणाऱ्या पत्रकारांना बातम्या मिळणार नाहीत, माहिती मिळणार नाही असा समज असेल तर वरचा परिच्छेद पुन्हा वाचा.

तुमच्या प्रवक्त्यांना किंवा भाडोत्री आश्रितांना किती वेळ द्यायचा ते आम्ही ठरवणार. तुमचा दृष्टीकोन काय आहे ते लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न नक्की करू, तुम्ही आमची नाकेबंदी केलीतर तरीही. पण त्याचा अर्थ असा नाही की आम्ही आमच्या वेळात, आमच्या छापील जागेत केवळ सातत्याने खऱ्याचे खोटे करणारांना, सत्याला लवचीक समजून वळवणारांना आम्ही वाव देणार नाही. जेव्हाजेव्हा असे कुणी करतील तेव्हातेव्हा आम्ही त्यांना उघडे पाडू, इतकेच नव्हे, तर अशा प्रकारचे वर्तन वारंवार करणारांना आम्ही आमच्या माध्यमांतून बंदी घालू.

वस्तुनिष्ठ सत्यावर आमचा विश्वास आहे आणि त्या मूल्यावरूनच आम्ही तुमचे मूल्यमापन करू. तुम्ही किंवा तुमचे भाडोत्री आश्रित जेव्हा अगदी सहजसिद्ध करण्यासारखे असत्य ट्वीट कराल तेव्हा आम्ही तुम्ही खोटे बोलता हे स्पष्ट दाखवून देत राहू. आम्ही वास्तवाला चिकटून राहू आणि खोटारडेपणाने रेटलेली भाष्ये आम्ही सत्य म्हणून प्रसृत करावी अशी अपेक्षाच नको. एखादी गोष्ट तुम्ही किंवा तुमच्या चमूतील लोक म्हणतात म्हणून, शहानिशा केल्याशिवाय योग्य बातमी ठरत नाही. दोन्ही गोष्टी महत्त्वाच्याच आहेत.

शासकीय गोष्टींचे तपशील आमच्यासाठी परम महत्त्वाचे आहेत. तुम्ही आणि तुमचे कर्मचारी व्हाईट हाऊसमध्ये बसता, पण अमेरिकन शासन हे सर्वदूर पसरलेले आहे. आम्ही आमचे वार्ताहर दूरवर पेरू, तुमच्या साऱ्या एजन्सींमध्ये पोहोचवू, आणि नोकरशहाकरवी माहिती काढू. परिणाम अशा होईल की तुम्ही तुमच्या सूत्रांकरवी बाहेर जाणाऱ्या माहितीवर बंधने घालण्यात मग्न असाल तेव्हा आम्हाला तुमच्या कामाची, धोरणांची अगदी आतली माहिती मिळत राहील.

आम्ही स्वतःवर यापूर्वीपेक्षाही कडक नैतिक बंधने घालू. संपूर्ण राजकीय पटलात माध्यमांबद्दल अविश्वास पेरण्याचे श्रेय तुमचेच आहे. तुमच्या निवडणूक मोहिमा त्यावरच आधारित होत्या आणि त्यामुळेच आम्ही खणखणीत जागे झालो आहोत. आम्हाला पुन्हा एखदा विश्वास संपादन करायचा आहे. आणि हे आम्ही अचूक, निर्भय वार्तांकन करूनच साध्य करू. आमच्या चुका झाल्या तर त्या मान्य करू आणि स्वतःसाठी अत्यंत कठोर नीतीनियम लागू करून वागू.

आम्ही सारे एकत्र काम करणार आहोत. तुम्हा आमच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या स्पर्धात्मक ईर्ष्येचा वापर करून तुम्ही आमच्या परिवारात भांडणं लावलीत. हे दिवस आता संपले. आता आम्हाला हे कळलं आहे की तुमच्या बातम्या मिळवण्यासाठी आम्हाला एकमेकांना सहकार्य करणं, मदत करणं आवश्यक आहे. त्यामुळे जेव्हा एखाद्या पत्रकार परिषदेत तुम्ही जेव्हा एखाद्या नावडत्या पत्रकारावर ओरडाल, डाफराल किंवा दुर्लक्ष कराल तेव्हा तुमच्या समोर आमची एकजूट फळी उभी असेल. आम्ही सारे महत्त्वाच्या बातम्यांवर एकत्रपणे काम करू. आणि एखाद्या सहकाऱ्याने चांगली बातमी केली असेल तर साऱ्या

जगाला समजावी म्हणून आम्ही सहकार्य करू. आमच्यात मतभेद जरूर असतील, नैतिकता, अभिरुची किंवा समतोल याबाबतीत वादविवादही होती. पण त्यांची सुरुवातही आणि शेवटही आम्ही करू.

आम्ही दीर्घ पल्ल्याचे खेळाडू आहोत. तुमच्यासाठी सगळं अगदी छान सुरळीत होईल असं गृहीत धरलं तरीही तुमची सद्दी जास्तीत जास्त आठ वर्षांची असेल. पण आम्ही इथे आहोत या प्रजासत्ताकाच्या स्थापनेपासून. आणि या महान लोकशाहीच्या जडणघडणीत आमची भूमिका ही सातत्याने मजबूत होत राहिली आहे, सुधारत राहिली आहे. आम्ही कोण आणि आमचे उद्दिष्ट काय या प्रश्नांचा गंभीर विचार करण्यास तुम्ही आम्हाला भाग पाडलेत याबद्दल आम्ही तुमचे ऋणी आहोत.

हे पत्र अमेरिकन पत्रकार-वार्ताहरांच्या लढाऊ बाण्याचं एक द्योतक म्हणून पत्रकारितेच्या इतिहासात नोंदलं जाणार आहे.

आपल्याकडे कसले इतिहास रचले जात आहेत... गमतीजमती पाहू.

भाजप प्रवक्ते संबित पात्रा हे त्यांच्या इतर बांधवांप्रमाणेच चॅनेलवर जाऊन आवाजी चर्चा करतात. मोठ्या आवाजात रेटून-रेकून खोटेनाटे मुद्दे मांडणे, आऱोप करणे, इतरांना बोलू न देणे हे प्रकार महाराष्ट्रात जसे केशव उपाध्याय वगैरे प्रवक्ते मंडळी करतात तेच पात्रा राष्ट्रीय पातळीवर करतात. ‘ओरडा’ चॅनेलच्या अँकरला हेच हवे असते. आणि तीच सवय संबित पात्रांना लागली आहे. पण परवा एनडीटीव्ही चॅनेलवर त्यांनी असाच आरडाओरडा आणि गैरलागू आरोप करायला सुरुवात केली, चॅनेलचा अजेंडा असल्यामुळे मला बोलू देत नाही वगैरे कांगावा

केला. खरे म्हणजे ते स्वतःच हजारिकांच्या बोलण्यात अडथळे आणत होते. निधी राजदान या अँकरने अगदी शांतपणे परिस्थिती हाताळली आणि ते ऐकेनात तेव्हा त्यांना ‘असले आरोप करायचे असल्यास माझ्या कार्यक्रमातून निघून जा’ असे शांतपणे सांगितले. पात्रा धमक्या देत निघून गेले.

यानंतर चोवीस तास जेमतेम उलटले असतील. एनडीटीव्हीच्या संचालक मालकांवर सीबीआयने धाडी टाकल्या. प्रणव रॉय आणि राधिका रॉय यांच्या कार्यालयांसहित, निवासस्थानीही धाडी टाकण्यात आल्या. धाडी टाकण्याचे देण्यात आलेले कारण असे की जे गेल्या आठ वर्षांत कुठल्याही कोर्टात टिकू शकले नाही. संजय दत्त या त्यांच्या माजी करसल्लागाराने त्याला काढल्यानंतर त्यांच्या विरुद्ध ज्या तक्रारी केल्या होत्या त्या कुठल्याही न्यायालयाने ग्राह्य धरल्या नव्हत्या. ज्या बॅंकेचे कर्ज बुडवल्याचा आरोप आहे त्या आय़सीआयसीआय़ बॅंकेने आजही कोणतेही कर्ज शिल्लक नसल्याचे लेखी दिले आहे. कर्जफेड एकरकमी झाल्यास व्याजात जी सूट दिली जाते त्याबद्दल दत्तने तक्रार केली. एक खाजगी बॅंक, एका खाजगी कंपनीला कर्ज देते, फेडताना सूट देते यात शासनाचा कवडीचाही संबंध येत नाही. इतर कुणाचाही संबंध येत नाही, म्हणूनच यांच्या तक्रारी कोर्टात दाखल झाल्या नाहीत. पण सूडाचे राजकारण खेळायचे, त्यात कोणत्याही तत्वांची, लोकशाही मूल्यांनी तमा बाळगायचीच नाही असे ठरवलेल्या सद्दीला त्याचे काय.

इकडे राम-माधव पुरस्कृत, प्रशिक्षित ट्रोलधाड एनडीटीव्हीवरच्या धाडींबद्दल जो काही आनंद व्यक्त करीत आहेत ते फारच चांगले. त्यामुळे मा. मोदीजींच्या सरकारच्या हेतूंविषयीची उरलीसुरली शंकाही फिटते आहे.

एका चॅनेलला घाबरवून सोडायचे हेच एक लक्ष्य यात होते. त्यांच्या दुर्दैवाने एनडीटीव्ही चॅनेलचे मालक आणि बाकी सारे पत्रकारही घाबरट नाहीत. या देशात पत्रकारितेच्या निर्भय परंपरा शाबूत ठेवणारी जी काही थोडी माध्यमे आहेत त्यातील ते एक आहे. आणि आता त्यांच्या बाजूने सारी उर्वरित स्वतंत्र माध्यमे आणि पत्रकार, लेखक, साहित्यिक, कलाकार उभे रहातील.

असं खडबडवून जागं केल्याबद्दल कदाचित् भारतीय पत्रकारितेला या राजवटीचे आभार मानावे लागतील.

पत्रकारितेतील सर्वांनी अमेरिकन प्रेस कोअर कडून धडा घेण्याची वेळ आली आहे. एनडीटीव्हीच्या निमित्ताने या राज्यसत्तेची चाल कळली आहे. तिला पायबंद घालण्यासाठी पत्रकारांनी, लेखक आणि साहित्यिक या सर्वांनी मिळून लोकांना दिशा द्यायला हवी. कारण न्याय, विद्या आणि पत्रकारिता या क्षेत्रांतल्या विद्वान लोकांनी आपल्या शेपट्यांना गोंडे, कलाबूत लावून घेतली तर मग देशाचे ब्रीदवाक्य सत्यमेव जयते बदलूनच टाकावं लागेल.

मग एकच ब्रीदवाक्य-

गाय हमारी माता है, हम को कुछ नहीं आता है...

***

# पशुसंग्रहालयात गाय

२१ नोव्हेंबर २११७

गेल्याच्या गेल्याच्या गेल्या शतकातील राणीबाग, गेल्याच्या गेल्या शतकातील वीरमाता जिजाबाई उद्यान, गेल्या शतकातील राजमाता हीराबेन मोदी उद्यान आणि आताच्या जीववैविध्यउद्यानात प्रचंड गर्दी उसळली आहे.

आज रविवार म्हणून खास सवलत जाहीर करण्यात आली आहे. पंधराशे रुपयांच्या तिकिटावर दहा टक्के सवलत. बुलेट ट्रेनचा खास थांबा बनवून घेण्यात आला आहे. जवळपासच्या सर्व मल्टिस्टोरी पार्किंगच्या जागा फुल्ल झाल्या आहेत.

---

आज आपला अभिमानास्पद वारसा सांगणाऱ्या पशुसंग्रहालयात भारतातून गेल्या शतकात नष्ट म्हणजे एक्स्टिंक्ट झालेला पशू खास आणवण्यात आला आहे.

त्यावर संशोधन करणारे एक राष्ट्रीय पथकही तेथे दाखल झाले आहे. आणि केवळ २० आणि २१ नोव्हेंबर या सुट्टीच्या दिवशी तो पशू लोकांना पाहाण्यासाठी उपलब्ध आहे.

------------------------

या पशूच्या खास काचदालनावरील फलक-

गाय- (बोस इंडिकस / बोस टॉरस- मादी)

भारतात अठ्ठावीस उपजातींचे वैविध्य असलेला हा प्राचीन इंडियन ऑरक्स या जातीपासून विकसित झालेला बोस इंडिकस किंवा बोस टॉरस प्रजातीतील पशू गेल्या शतकाच्या पूर्वार्धात नामशेष झाला. या पशूचे कळप साऱ्या देशभर फिरत राहिले होते. पण काही घटना घडल्यानंतर मानव की हा पशू असे राजकारण उभे राहिले आणि याचे भवितव्य धोक्यात आले. तत्पूर्वी खाण्यासाठी, दुधासाठी, कष्टांसाठी या उपयुक्त पशूचा वापर करण्यात येत असे आणि त्या काळी या पशूचे संवर्धन उत्तम रीतीने होत असे. मधल्या काही काळातील घटनांचा उल्लेख शालेय इतिहासात येतोच. त्यानंतर फार्मिंग कम्युनिटीने उपयुक्तता संपुष्टात आणल्याकारणाने या पशूच्या पालनावर बहिष्कार घातला.

काही वर्षांतच अराजक परिस्थितीत हे गाय(मादी पशू) आणि बैल (नर पशू) सरसकट नष्ट झाले. असे म्हणतात की 'नरपशूं'च्या करणीमुळेच त्यांचा अंतिम विनाश ओढवला.

यापुढे असल्या मुद्द्यांवरून हिंसाचार होणार नाही असे आश्वासन युनोला लेखी दिल्यानंतर वीस वर्षांपूर्वी या वाटाघाटीं सुरू होऊन यावर्षी सफळ झाल्या आहेत.

सध्या भारतात याच्याच जवळील प्रजातीतील (बुबालस बुबालिस) मधील म्हैस हा पशू टिकून राहिला. आणि आता सर्वत्र म्हशी-रेडे पाळण्यात येतात.

हा नमुनादाखल पशू आपल्याला शेजारी राष्ट्राच्या सौजन्याने मिळालेला असून, त्याचा नर नमुनाही आणवण्यासाठी वाटाघाटी सुरू आहेत. त्या यशस्वी झाल्यास प्रजननाच्या प्रयत्नांतून पुढील शतकाच्या सुरुवातीस भारतात पुन्हा एकदा हा पशू चांगल्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकेल अशा आशावाद प्राणीतज्ञ जागवीत आहेत.

विशेष सूचना

कृपया काचेवर टकटक करू नये.

ऐंशी-नव्वदीतल्या लोकांनी पशूला गवत चारण्याचा आग्रह व्यवस्थापनाकडे धरू नये. तसे केल्याने काहीही वैयक्तिक फायदे (जुन्या भाषेत पुण्य) मिळत नाहीत असे स्पष्ट करण्यात येत आहे.

-हुकुमावरून.

***

# इतिहासाची बोंब आणि बोंबाबोंब

चितौडचा राणा प्रतापसिंह हळदीघाटाच्या लढाईत विजयी झाला होता असे इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचे राज’कार’स्थानात अधिकृतरित्या घाटते आहे. हरप्पा येथे मिळालेली नर्तिकेची म्हणून ओळखली जाणारी मूर्ती ही पार्वतीची आहे असे एक लांगुलचाल निवृत्त प्राध्यापक म्हणालेच आहेत. इतिहासाचे पुनर्लेखन हा या देशातील प्रतिगामी विचारसरणीचे नेतृत्व करणाऱ्यांचा अधिकृत कार्यक्रमच आहे. त्यात हेच नव्हे तर यासारखे अनेक मुद्दे चर्चेसाठी आणि मग कृतीसाठी घेण्यात आले आहेत.

मध्यंतरी पद्मावती काव्यावरील चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा इतिहासाची मोडतोड या विषयावरून काथ्याकूट सुरू झाला. इतिहासाची मोडतोड आपण करावी, बाकी कुणी मात्र करू नये असा खाक्या हल्ली दिसतो आहे. यासंबंधीच्या एका चर्चेत कलेक्टिव मेमरी किंवा सामूहिक स्मृतीचा विषय आला. आणि समूहाच्या मनात असलेल्या स्मृती म्हणजेच लोकसमज यांनाच इतिहास म्हणून मान्यता मिळावी अशी जोरदार, आततायी मागणी करण्यात आली.

सामूहिक स्मृतीचे महत्त्व आहेच. एक से भले दो या न्यायाने एका संपूर्ण समूहाकडे असलेली सामाजिक, राजकीय किंवा ऐतिहासिक घडामोडींसंबंधीची आठवणीस्वरूप माहिती अभ्यासकांना उपयोगी ठरू शकते. पण त्याचा अर्थ असा

नाही की त्यातील सर्व तपशील योग्यच असतील, सत्यच असतील. अनेकदा सामूहिक स्मृती या काही हेतूने वावरणारे राजकीय गट ठाकूनठोकून तयार करत असतात. विशेषतः धर्म आणि राज्यसत्तेच्या जुगाडात हितसंबंध गुंतलेले गट किंवा व्यक्ती या प्रकारच्या हेतूने शिस्तशीर काम करीत असतात. आयसिस-दाएश (इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड लेव्हांट) किंवा अल काइदा सारख्या मानवद्वेष्ट्या धर्मसंघटना जेव्हा आपला प्रचार करून तथाकथित प्रेषिताच्या शब्दाचे अवडंबर माजवतात तेव्हा त्यासंबंधीच्या स्मृती या त्यांच्या लक्ष्य समूहात एका साच्यातून काढल्यासारख्या असतात. याचाच अर्थ त्या घडवलेल्या सामूहिक स्मृती असतात आणि त्यांचा वर्तमानाशी किंवा ऐतिहासिक सत्यांशी काहीही संबंध नसतो. दुसऱ्याचे उदाहरण घेतल्यावर आपल्याला पटते की असे मानणे चूक आहे- म्हणून हे उदाहरण. भारतात या अधोगती झालेल्या वृत्तीचा उदय वेगळ्या धर्माचे रूप घेऊन व्हायला नको असेल तर सरसकट कोणत्याही सामूहिक स्मृती किंवा सोप्या भाषेत लोकसमज म्हणजेच इतिहास हे मानण्याची चूक कदापि करता कामा नये.

खरे म्हणजे गेल्या हजार-दोनहजार वर्षांच्या इतिहासात गुंतून पडून तीसेक हजार वर्षांच्या उत्क्रांतीतून आजच्या शारीरिक-बौध्दिक पातळीला पोहोचलेल्या मानवजातीने एवढे घोळ घालून ठेवले आहेत हीच गोष्ट दारूण विनोदी आहे. मानवजातीचा इतिहास उण्यापुऱ्या तीस हजार वर्षांचा तर नक्कीच आहे. भाषेचा-लिपीचा शोध, अग्नीचा वापर,  दगडांची शस्त्रे, साठा करणे, निवारा उभारणे, निसर्गातील बदलांशी सामना करण्यासाठी चामड्यांचा आणि मग सुती वस्त्रांचा वापर करणे, शिकारीचे तंत्र, शेतीचा शोध, पशुपालनाचे तंत्र आणि त्याला जोडून

चाकाचा वापर, रंगांचा वापर आणि मग त्यातून स्फुरलेल्या कलात्मक आविष्कारांची सुरुवात या चांगल्या गोष्टी मानवजातीतल्या नेमक्या कुणी मुळात शोधल्या याचा काहीही पुरावा आपल्याकडे नाही. तरीही हे सारे झाले आणि वारशाने साऱ्या मानवजातीला मिळाले. शस्त्रांचा वापर आपापली साधनांवरील मालकी शाबूत ठेवण्यासाठी हिंसा करण्यासाठीही झाला, संघर्षाचे तंत्रही विकसित झाले, वर्चस्वाचे तंत्रही विकसित झाले तेही साऱ्या मानवजातीकडे चालत आले. काळ्या, गोऱ्या, गव्हाळ, पिवळ्या साऱ्या वर्णांमधून पसरले. पण तीनचार हजार वर्षांपलिकडचे मनावाचे राजकीय-सामाजिक जीवन काय होते, त्यातल्या प्रभावशाली व्यक्ती नेमक्या कशा होत्या याबद्दल संदिग्धता असूनही काही प्रमाणात ते आपल्याला माहीत आहे. त्यापूर्वीच्या काळातील उत्क्रांतीची, प्रगतीची किंवा अधोगतीची वाटचाल आपल्याला पुरातत्वीय अवशेषांचा मागोवा घेत धडपडत, धूसरधूसर कळू लागली आहे. पुरातत्वीय अभ्यासाची साधने तंत्रदृष्ट्या जसजशी प्रगत होत जातील तसतशी ती धूसरता कमी होत जाईल. तरीही आपण अडकून पडलो आहोत ते गेल्या हजारदोनहजार वर्षांच्या ज्ञात इतिहासात. मानवी राजकारणात आणि धर्मकारणातही गुपिते, कारस्थाने यांचे प्राबल्य इतके असते की कालपरवा घडलेल्या राजकीय धर्मकारणी घटनांतही नेमके काय-कसे-कुणी-केव्हा केले ते नोंदले जाऊ शकत नाही. तर जेव्हा नोंदींची साधने कमी होती, प्रगत नव्हती, खात्रीची नव्हती त्या काळातील इतिहासाबद्दल कुणीही छातीठोकपणे विधान करून तेच चिरंतन सत्य असल्याचा दावा करीत असेल तर तो केवळ मूर्खपणा किंवा हेतूपूर्वक दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे असे खुशाल समजावे.

इतिहास जाणून घेणं खूप महत्त्वाचं असतं हे फार लोकांच्या लक्षातच येत नाही. सनावळ्या पाठ करणं आणि सन एका वर्षाने चुकला की एक मार्क घालवणं ही भीती म्हणजे इतिहास हा विषय हे विद्यार्थी दशेत डोक्यात पक्क बसवलं गेलेलं असतं.

महाराष्ट्रात शाळा न शिकलेल्या लोकांना शिवाजी महाराजांचा काळ आणि मग एकदम पांडवकाळ हाच प्राचीन इतिहास वाटतो आणि तोच तेवढा महत्त्वाचा वाटतो. शालेय शिक्षणाशी तोंडओळख झालेल्यांच्या बाबतीत बोलायचे तर आपल्या काही प्रिय ऐतिहासिक व्यक्तिमत्वांबद्दल शिकताना त्यांचे भरताड किस्से हाच इतिहासाचा भाग म्हणून जास्त डोक्यावर बसवला गेला आहे. उदाहरणार्थ महात्मा गांधींचे शेळीचे दूध पिणे, लोकमान्य टिळकांची शेंगांची टरफले, सरदार वल्लभभाई पटेलांची काखमांजरी असल्या ऐतिहासिकदृष्ट्या क्षुल्लक महत्त्वाच्या गोष्टींवर इतका भर दिला गेला की त्यांच्यासंबंधींच्या बाकीच्या घटनांच्या जोडीने हेच अधिक लक्षात राहिले. फार उदाहरणे न देता मुद्दा मांडायचा तर इतिहास शिकवताना इतिहासातील व्यक्तीमत्वे चकाचक मोठाली सजवणे हेच अधिक होत गेले.

आपल्या प्राचीन-अर्वाचीन इतिहासाच्या नोंदीही फारशा शिस्तबध्द नाही आपल्याकडे लेखी नोंद ठेवण्याची सुरुवात जेमतेम आठशे ते हजार वर्षांपूर्वीपासून झाली. या नोंदीही राजस्तुतीला किंवा राजाचे आदेश यांच्या संदर्भातील अधिक. महाराष्ट्रात गेल्या शतकापासून हे काम मोठ्या कष्टपूर्वक प्रथम वि.का. राजवाडे आणि नंतर इतर अनेक इतिहाससंशोधकांनी केले. पण पाठ्यपुस्तकी इतिहासात मात्र त्या अभ्यासाचे अगदीच थरथरते प्रतिबिंब पडते.

चीन या देशाचे कौतुक करावे लागेल. त्यांच्याकडे साडेतीन हजार वर्षांचा राजकीय इतिहास लेखी नोंद केलेला आहे. या नोंदींतूनच एक घटना जगाला माहीत झाली होती. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील क्विन राजेशाहीच्या काळात राजा आणि त्याचा प्रधान ली सी याने कन्फूशियसच्या तत्वज्ञानाची सारी पुस्तके, काव्यसंग्रह आणि इतिहासाची पुस्तके जाळून टाकण्याचा आदेश काढला. ४६० विद्वानांना जिवंतपणी गाडण्याचाही हुकूम होता, पण त्या घटनेचा खरेपणा अजून सिध्द होऊ शकलेला नाही. (सामाजिक स्मृतीत तो रेखलेला असला तरीही तो खराच असेल असे नाही!) पण महत्त्वाचे हे की तत्वज्ञान, काव्य याच्या बरोबरीने इतिहासाचे ज्ञान लोकांना होणे हे त्या राज्यकर्त्यांना जोखमीचे, धोकादायक वाटत होते.

आपल्याला न भावणारी, आपल्या राजकीय मतांच्या विरुध्द जाणारी पुस्तके जाळण्याचे प्रयत्न हे काही नवीन नाहीत. ख्रिस्तपूर्व सातशे वर्षांपासून यासंबंधीच्या नोंदी आहेत. इतिहास पुसून टाकण्याचे प्रयत्नही नवीन नाहीत. भयग्रस्त राजवटी आणि विचारसरणींचे अनुयायी अशा प्रकारे मुक्त विचाराचा उद्गार दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात, घडलेल्या इतिहासाची मोडतोड करू पाहातात. कधीकधी त्याला इतिहासाचे पुनर्लेखन असे गोंडस नावही दिले जाते. इतिहास संशोधनाचा किंवा कोणत्याही शास्त्रीय पायावरील संशोधनाचा आत्माच हा असतो- की सतत शोध घेताना, आधीच्या माहितीनुसार जे रचलेले आहे त्याचा पुनर्विचार करण्याची तयारी असतेच. संशोधनाच्या ओघात कित्येक जुने समज मोडून पडतात, आणि नव्या दिशा मिळतात. याला इतिहास किंवा पुरातत्वीय संशोधन म्हणतात. पुनर्लेखन असे

म्हणण्याची गरजच नसते. जेव्हा मनात आधीच अंतिम उत्पाद ठरवलेला असतो आणि मग त्याला जुळणारी मांडणीच बसवायची असते तेव्हा त्याला पुनर्लेखन म्हटले जाते. आणि तेव्हाच सामूहिक स्मृती म्हणजेच इतिहास असले भुक्कड प्रतिवादही केले जातात. तेव्हाच संख्येच्या बळावर, हिंसकतेच्या बळावर किंवा पुंडाईवर माज करून आम्ही मांडतो तोच इतिहास असेही म्हटले जाते. किंवा कधीकधी आमच्या पगड्या हेच आमच्या विद्वत्तेचे पुरावे असेही म्हटले जाते.

इतिहासाचे सत्य, ज्ञान आणि हेतू या सर्वांपेक्षा फार निराळे आहेत. हे समजणारा समाजच विवेकाच्या आधारावर प्रगती करू शकतो. ते विसरलेल्या समाजाच्या नेतृत्वाचे इप्सित केवळ हिंसकतेतून राजसत्ता-धर्मसत्ता बळकावण्याचेच असते.

***

# ट्रोलायण

स्वाती चतुर्वेदी यांनी लिहिलेल्या ‘आय अ‍ॅम अ ट्रोल’ या पुस्तकाची चर्चा जोरात आहे. पक्षाच्या प्रचारासाठी किंवा दुसऱ्या पक्षाला खिजवण्यासाठी, विरोधकांना नामोहरम करण्यासाठी सोशल मिडिया आणि निगडित तंत्रज्ञानाची मदत घेऊन प्रचाराचे राक्षसी यंत्र चालवणे हा आजच्या युगाचा राजकीय फंडा बनत चालला आहे हयाची साक्ष काही प्रत्यक्ष पुराव्यांसकट देणारे हे पुस्तक आहे.

भारतापुरते मर्यादित आणि त्यातही मुख्यत्वे भाजपपुरते मर्यादित अवकाश ठेवून पत्रकार लेखिकेने हा एक शोधअभ्यास या पुस्तकामार्फत मांडला आहे. लेखिकेला स्वतःला प्रत्यक्ष त्रास झाल्यानंतर तिने या विषयाच्या मागे जायचे ठरवले आणि शोधपत्रकारितेच्या शैलीनेच ते लिहिले आहे.

भारताच्या राजकीय प्रचाराच्या अवकाशात इतक्या प्रभावीपणे आधुनिक तंत्रज्ञानी वाटांचा वापर करून यश मिळवणारा पहिला पक्ष भाजप (आणि त्यामागचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) असल्यामुळे पुस्तक अर्थातच भाजपला टोकदारपणे रुतण्यासारखे झाले आहे.

ट्रोल हे पात्र पाश्चात्य किंवा प्रामुख्याने उत्तर युरोपीय परीकथांमधून आलेले आहे. खादाड, क्रूर, मठ्ठ, राक्षसी ताकदीचे, आकाराचे ट्रोल्स रात्रीशिकार, लुटालूट वगैरे कारभार करतात आणि सूर्य उगवताच गुहांमधून लपतात. प्रकाशापासून दूर जातात, कारण सूर्यकिरण अंगावर पडले तर त्यांचे दगडात रुपांतर होते. महायुध्द

काळात ट्रॉलिंग या मासेमारी तंत्राचे आणि ट्रोल चे एकत्रीकरण झाले आणि शत्रूचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी भलतीच काही कारवाई करणे याला ट्रोलिंग म्हटले जाऊ लागले.

या पात्राला सोशल मिडियावर कधी कसा संदर्भ प्राप्त झाला ते पाहाणंही मोठं मजेशीर ठरेल. ऐंशीच्या दशकापासून हा शब्द इंटरनेट संदर्भात वापरला जाऊ लागला. एखाद्या ग्रुपवर कुणी नवखा आहे का ते पाहाण्यासाठी अगदी साधेसुधे प्रश्न टाकून नवखेपणा उघड करणे म्हणजे ट्रोलिंग करणे होते. अलिकडे जो संदर्भ आला आहे त्यानुसार डोके बाजूला ठेवून तोच तोच प्रतिवाद ठरवून करणे, आता पुरे म्हटलं तरीही वाद घालतच रहाणे, विरोधी मत असलेल्यांच्या भिंतींवर जाऊन आगखाऊ भाषा वापरून विरोधी मत असलेल्यांना त्रास देणे, बदनाम करणे, शिव्या घालणे- नको तो सोशल मिडिया असे करून सोडणे याला ट्रोलिंग म्हटले जाऊ लागले, इनबॉक्समधे जाऊन शिव्या देणे, धमक्या देणे, ट्वीट करताना नावे घेऊन बदनामी करणे, फोटोमॉर्फ करून ओंगळ लिहिणे हे सारे हळुहळू ट्रोलिंगमध्ये समाविष्ट झाले. व्यक्तिगत जीवनात, भिंतींवर, संवादांत असले काही झाले तर तो प्रकार त्रासदायक असला तरीही एका ब्लॉकमध्ये काम होते. पण या पुस्तकात ज्या ट्रोलिंगबद्दल लिहिले आहे ते संघटित राजकीय गुन्हेगारी स्वरुपाच्या ट्रोलिंगबद्दल आहे. त्याचा व्यक्तिगत ट्रोलिंगशी संबंध नाही हे प्रथम लक्षात घ्यायला हवे. असले ट्रोल्स ही अनेकदा मूठभर खऱ्या माणसांनी चालवलेल्या हजारो बेनामी पात्रांची सोशल मिडियातली छद्मरुपे असतात. प्रत्येकाची झूल वेगळी. पण लिहिणे तेच. एकादा शब्द इकडेतिकडे करून तोच तोच प्रचार वाजवत रहाणे हे या ट्रोल्सचे काम. त्यामुळे

व्यक्तिशः आपल्या आवडीने शिवीगाळ करणाऱ्या, प्रचारकी लोकांना आताच्या व्याख्येनुसार ट्रोल म्हणता येणार नाही.

जसे अनेक लोक आज सोशल मिडियावर लिहिताना शिवराळ, गलिच्छ भाषेत लिहितात, एकमेकांवर हेत्वारोप, बदनामी वगैरे सारेच चालते. जाती, धर्म या अखिलभारतीय लाडक्या विषयांवरून लोक अत्यंत खालच्या पातळीवर उतरून एकमेकांवर शेणगोळे फेकत असतात. पण याला ट्रोलिंग म्हटले तरीही या बारीकसारीक ट्रोलिंगचा संदर्भ या पुस्तकाला नाही.

संघाचे एक तंत्राभिमुख विचारवंत राम माधव यांनी भाजपच्या आय़टी कक्षाचे श्रेय स्वतःहून स्वतःकडे घेतले आहे त्यामुळे या कक्षाची- किंवा भारतातील ट्रोलधर्माची संस्थापना राम माधव यांनी केली असे म्हणायला हरकत नाही. त्यांची एक मुलाखत या पुस्तकात तशीच्या तशी छापलेली आहे. ती नीट वाचली असता एक गोष्ट स्पष्ट होते. की शंकर म्हणतो- हो मीच हा भस्मासुर निर्माण केला आहे पण तो जे काही उत्पात (इथे प्रेस्टिट्यूट वगैरे शिवीगाळ) करतो आहे ती मला मान्य नाही. मी स्वतः असं कधीही करत नाही. फार भारी आहेत रामजी माधवजी.

एक गोष्ट मान्य करावीच लागेल. ज्या पध्दतीने ही सोशल मिडियाचे युध्दतंत्र संघधुरिणांनी वापरले आहे त्यातील कष्ट कौतुकास्पद आहे. बिहारहून आलेल्या एका युवकाला रोजगार मिळवून देणे, त्याला एबीसीडीपासून शिकवणे, कॉम्प्युटरचे ज्ञान देणे, प्रशिक्षित करणे या गोष्टी त्यांनी ज्या सौहार्दाने केल्या त्याचे फळ त्यांना त्या मुलाच्या निष्ठेतून मिळाले आहे. (आता त्याचाही थोडा भ्रमनिरास झालेला आहे हे ही येतेच त्यात पुढे).

असाच भ्रमनिरास झालेली साधवी खोसला ही आय़टी सैन्यातील स्वयंसेविका जेव्हा ट्रोलिंगच्या गलिच्छपणामुळे सैन्यापासून दूर झाली. आणि स्वाती चतुर्वेदीला भेटली. तिने दिलेल्या तपशीलवार माहितीतून पुस्तकाचा मुख्य गाभा आकारलेला आहे. मुस्लिमद्वेषाचा अतिरेक झालेला पाहून साधवीचे डोळे उघडले. आशा आहे अशाच प्रकारे अनेकांचे डोळे उघडतील. अखेर कुठेतरी सदसद्विवेकबुध्दी जिवंत रहावी.

पंतप्रधान या ट्रोलसैन्यातील निवडक लोकांना फॉलो करतात. (अशी लगन पाहिजे. नाहीतर तिकडे काँग्रेसचे नेते चांगल्याचांगल्या कार्यकर्त्यांनाही भेटत नाहीत, आपल्या पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनाही भेटत नाहीत.) या ट्रोलसैन्यातील कुणीही कितीही असभ्य भाषा वापरली तरीही त्यांना कुणीही रोखत नाही. त्यांच्यावर पक्षशिस्तीचा बडगा उगारला जात नाही. किंबहुना हे या प्रकारेच चालले पाहिजे अशीच इच्छा दिसते आहे.

भाजपचे जसे ट्रोलसैन्य आहे त्या तुलनेत काँग्रेसचे काहीच नाही. आप या पक्षानेही पध्दतशीर सोशलमिडियाचा वापर ट्रोलिंगसह सुरू केला आहे. पण भाषा अजून तुलनेत कमी असभ्य आहे.

मुख्यतः हे राजकीय ट्रोलिंग म्हणजे सोयीच्या असत्यांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे तंत्र आहे. वीपीएनची(वर्च्युअल प्रायवेट नेटवर्क) भिंत अनेक गोष्टी दडवून ठेवू शकते. त्या आड राहून लाखोंच्या संख्येने खोट्यानाट्या द्वेषमूलक अशा वक्तव्यांचा प्रसार करणे आणि त्याद्वारे भाबड्या किंवा मठ्ठ, हिंदुत्ववादी लोकांचा पाठिंबा मिळवत रहाणे हा भाजप-संघ आय़टी कक्षाचा मुख्य हेतू आहे. बाकीचे

राजकीय पक्षही सत्तेसाठी टक्कर घ्यायला यात सहभागी होतील. पण फॅशिस्ट विचारसरणीच्या हाताशी असे तंत्रज्ञान आले आणि ते त्यांनी प्रभावी पणे वापरले तर गोबेल्स झक मारेल आणि हिटलरही अशी परिस्थिती भारतात यायला उशीर लागणार नाही.

आप पक्षाचे असेच सोशल मिडियावर लढणारे युनिट आहे. हे पुस्तक वाचून कदाचित् बाकी पक्षही जागे होतील. आणि खोट्या नावांनी खोटा प्रचार करण्याचा साथीचा रोग साऱ्या भारतभर किंवा जगभरही पसरेल. या सर्वात मनमोकळे लिहिण्याबोलण्याचे, आपले मत मांडण्याचे विश्वासाचे स्थान म्हणून फेसबुक आणि ट्विटर यांचे स्थान जाईल. वॉट्सॅप ग्रुप्सवरूनही प्रचाराची राळ उडवली जाते. सत्य काय नि असत्य काय ते तपासून पाहाण्याचा विवेक वॉट्सॅप फॉर्वर्ड्सनी जवळपास संपुष्टात आणलेलाच आहे.

सोशल मिडियामुळे कितीतरी चांगल्या गोष्टी घडल्या. माहितीच्या स्फोटातून निघालेली ऊर्जा सर्वत्र पसरण्यासाठी सोशल मिडियाने खूप चांगली भूमिका निभावली. रसिकता, कला, इतिहास, अनेकाने मानवी प्रज्ञेची क्षेत्रे अनेक लोकांपर्यंत लोकांनीच पोहचवण्याचे हे साधन होते. व्यासपीठ होते. आता राक्षसी सत्ताकांक्षेने या व्यासपीठात माती कालवली असे होऊ नये.

आय ॲम अ ट्रोल असे म्हणू शकणारे लोक अजूनही तसे कमी आहेत. भाजपच्या आय़टी कक्षात काम करणारे दोनतीनशे लोक, त्यांना फॉलो करणारे लाखो लोक या खोट्या आय़डेन्टिटीजच्या ट्रोलिंगच्या आसुरी पकडीत आलेलेच आहेत. असत्यमेव जयते या सूत्रानुसार आपण काम करतो आहोत किंवा बळी पडतो

आहोत हे भान त्यांना कदाचित् येणारही नाही. पण हे पुस्तक वाचणाऱ्या अनेकांना ही आजवर फ्युचरिस्टिक वाटणारी साय-फाय भीती खरी ठरू शकते याचे थोडेसे भान यावे..

***

# झिंदाबाद-मुर्दाबाद

कोणत्याही देशाच्या मुर्दाबादच्या घोषणा देणं म्हणजे तोंडची वाफ फुका दवडणं असतं. एक देश एकजिनसी नसतोच. अगदी तालिबानी मूर्खांच्या आणि गलिच्छीकरण झालेल्या इस्लामच्याही देशांत काही लोक, अनेक व्यक्ती सत्प्रवृत्त, विचारी पण सत्तेला भयभीत असतात. त्यामुळे कोणत्याही देशाच्या मुर्दाबादच्या घोषणा आणि त्याच न्यायाने झिंदाबादच्याही घोषणा तशा निरर्थक असतात.

भारताची बरबादी झाली तरी चालेल पण आम्ही लढत राहू असे म्हणणे हे अगदीच मूर्खपणाचे आहे. पाकिस्तान झिंदाबादला तर कणाचाही अर्थ नाही. ही एक जबरदस्त अपरिपक्वताच आहे. त्या घोषणांचे खरेखोटे बाहेर येईलही पण त्या दिल्या गेल्या असल्या तर तो निव्वळ मूर्खपणा आहे. यात वादच नाही. पण त्या मूर्खपणावर समज देणे किंवा त्यांच्या पाठीशी असलेल्या राजकीय संभाषिते देणाऱ्या गटांशी बोलणे महत्त्वाचे की त्यांना दहशत घालणे महत्त्वाचे याची चर्चा करायला हवी. दहशत घालण्याचा मार्ग चार चवल्यांची अक्कल असलेल्या उथळ लोकांना फार मस्त वाटतेय हे पाहातोच आहोत. पण जगाच्या पटावर, बुध्दी वापरणाऱ्या विचारी लोकांच्या मंचावर या दहशतीची खरी किंमतच केली जाईल.

प्रश्न असा आहे की आपण परकीय सत्ता असल्याप्रमाणे असला मूर्खपणा करणारांवर देशद्रोहाचा आरोप ठेवणे, त्यांना कायदा हातात घेऊन एकेकट्यांना

गाठून मारझोड करणे, सामाजिक बहिष्कारासाठी कर्मचाऱ्यांना प्रवृत्त करणे हा दहशतवाद आहे. खऱ्या दहशतवादाचे उत्तरही आपण दहशतवादाने देत नाही. अफझलगुरूला क्रातीकारकच मानणाऱ्या पक्षाबरोबर युती करून काश्मीरात सत्तेचे केशर कपाळी लावतो.

चुकत असलेल्यांना समजाऊन सांगणे फार कठीण नाही. रोहित वेमुलाच्या आत्महत्येनंतर संतप्त, क्षुब्ध झालेल्या लोकसमूहांना, त्यातील कार्यकर्त्यांनाही व्हाया अभाविप दहशत घालण्याचाच प्रयत्न होतो आहे. सत्ताधारी गटाचे कुणीही ही समजूत काढू इच्छित नाही. किंबहुना पंतप्रधानांचे वर्तन मौनीबाबांचेच आहे. एक वाक्य- भारतमातेचा सुपुत्र वगैरे फेकल्यानंतर त्यांनी या इश्यूकडे ढुंकूनही पाहिलेले नाही. देशात वेगळा विचार करणारी माणसे आहेत. त्यांना स्वतःच्या घरात घेऊ नका हवं तर- पण त्यांना देशद्रोही ठरवण्याचा जो उन्मादी, उन्मत्त प्रयत्न होत चालला आहे आणि ते मत व्हायरल करण्याचा पद्धतशीर टेक्नोब्रिलियन्ट पण मुळात मद्दड प्रयत्न होतो आहे तो  देशाच्या एकंदर घडणीला बाध आणणाराच ठरेल हे नक्की.

भोळसटांनो, आणि मोदीबिदीप्रेमाचा ज्वर चढलेल्या देशप्रेमींनो, तुमच्यापेक्षा वेगळा विचार करणाऱ्या लोकांचंही या देशावर प्रेम आहे. सतत जागं राहून निर्भयपणे बोलणे हा त्याच प्रेमाचा भाग आहे. आमच्याकडे जी विचारशक्ती आहे, बुध्दी आहे, व्यासंग आहे त्याच्या जोरावर तुमच्या कालबाह्य विचारप्रणालीत समाविष्ट झाल्यासारखं दाखवून आम्ही तुम्हाला केव्हाच उल्लू बनवू शकतो. पण तसं करणार नाही आम्ही- हा आम्ही निवडलेला कठीण पर्याय आहे.

संघ आणि भाजपचा विरोध केला की त्यातील काही सुसंस्कृत, सभ्य लोकांना खूप दुःख होते. कालच एका स्त्रीने खूप कळवळून संघ किती चांगला आहे वगैरे स्वानुभव लिहिले. भाजपच्या सरकारने कशी चांगली कामे केली आहेत हेही पटवून देण्यासाठी लोक मधूनमधून संपर्क करीत रहातात. आणि ते जे म्हणतात ते अगदी योग्यच आहे. जसं कोणताही देश संपूर्णपणे टाकाऊ असत नाही असं मी काल म्हटलेलं, तसंच कोणताही पक्ष किंवा एका विचारप्रणालीचे संघटन असलेले कोणतेही लोकसमूह सरसहा सगळेच बैल किंवा राक्षस नसतात. त्यात सरमिसळ असते भल्याबुऱ्यांची, सभ्य-असभ्यांची, नीतीमानांची आणि भ्रष्टांची. हे प्रत्येक संघटनेबाबत खरे आहे. संघटनाच कशाला? एकाच व्यक्तीत गुणावगुणांची सरमिसळ दिसतेच आपल्याला. आणि हेच लक्षात ठेवून कुणालाही शाब्दिक फाशीवर सरसहा लटकावू नये हेही पटण्यासारखेच. (खऱ्या फाशीवरही लटकावू नये कुणा व्यक्तीला. जगू द्यावे तुरुंगात पिचत.)

भाजप राजवटीने चांगली कामे केलीत हे सांगणाऱ्या निष्ठावंतांनी स्वतःही हे पाहायला शिकावे की आधीच्या सत्ताधाऱ्यांनीही चांगली कामे केलीच. आपल्या बदललेल्या परिस्थितीत बरीच उदाहरणे देता येतात. तर काही कप्पे तसे उपेक्षित राहून गेले आहेत.

पण पक्षधारा म्हणून, पक्ष धोरण म्हणून, सर्वंकष सत्ता अवगत करण्याचा मार्ग म्हणून तुमच्या संघटनांचे कर्तेधर्ते जर चुकीचे असंस्कृत मार्ग निवडत असतील आणि तरीही तुम्ही संघ माझा चांगला नि पक्ष माझा फार भला म्हणत राहिलात तर तुम्ही

तुमच्या छोट्या निष्ठा जपता पण जीवनाच्या चिरंतन मूल्यांपाशी असलेल्या निष्ठांना तिलांजली देता असेच अखेरीस तुमच्या लक्षात राहील.

आपल्या देशाच्या भल्यासाठी आपण प्रहरी झाले पाहिजेच. देशाविरुध्द घोषणा देणारे आपल्याला नकोसे वाटतील हे योग्यच आहे. पण सत्याची शहानिशा न करताच तुम्ही कुणाला तुडवायला निघालात आणि त्यात तुमचा कुणी निरपराध देशबांधवच बळी गेला तर त्यात कुणाचे भले आहे. शहानिशा न करता चुकीच्या माणसाला चोर समजून जमावाने ठेचून ठार मारल्याच्या घटना घडल्या आहेत अनेक. तसेच हे होईल. तुम्ही तुमच्याच देशात जन्मलेल्या लोकांना हीन लेखू लागलात तर खरेच ती तुमची देशनिष्ठा आहे का? देश म्हणजे केवळ जमीन, खाणी, झाडे, प्राणी, संपत्ती नव्हे ना? सर्वात पहिली येतात इथली माणसं. तुम्ही तर त्या माणसांना नामोहरम करणाऱ्या सर्वांना डोक्यावर घेता, समर्थने करता. अपराध कुणी भलत्यानेच केले आणि दुरून दुरून संबंध नसलेली केवळ त्या धर्माची अनरक्षित माणसे मारली गेली तुम्ही समर्थन करता. त्याची नैतिक जबाबदारी असलेल्याला महान मसीहा मानता. या देशाच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत गेली अनेक शतके लोटली गेलेली ज्यांना वरच्यांनी शूद्र मानले, क्षुद्र मानले, त्या समाजाच्याच पोटी जन्मापघाताने आलेली नवी प्रजा अजूनही भेदभावाचे घाव गावागावांतून सोसते आहे, त्यांच्यातला कुणी वर पोहोचला की त्यांना आमच्या करातून फायदे उकळणारे फुकटे म्हणणारे लोक तुमच्यात आहेत हे तुम्ही नाकारता किंवा समर्थने करता.

तुमच्या संघधारेत, पक्षधारेतही माणसे आहेत, काँग्रेसमध्येही माणसे आहेत, डाव्या विचारसरणीचीही माणसे आहेत, स्वतंत्र वृत्तीने तिन्ही धारांतील चुकांचा

विचार करणारीही माणसेच आहेत. शिवाय सारी याच देशाची, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे याच पृथ्वीची लेकरे. तरीही तुमच्या श्रेष्ठींनी, त्यांच्यातल्या संकुचित विचारांच्या बलवत्तर व्यक्तींनी सत्तेसाठी निर्घृणपणे वागायचे ठरवले तर तुम्ही काय किंवा कुणी काय- व्यक्ती व्यक्ती म्हणून न्यायाचा विचार करणार की नाही हा प्रश्न आहे.

नाहीतर- अनेक साठे, मोघे, भावे आपापल्या ठिकाणी पूर्ण नैतिक व्यक्ती असतील याची मला मर्यादित खात्री आहेच. नैतिकतेची अंतिम कसोटी कदाचित् जवळ आलेली असेल. संघविचार सत्तेत नसताना ती यायचा प्रश्नच नव्हता. पण तो जिथे सत्तेवर होता त्या राज्यात त्या कसोटीला संघविचाराचे सामान्य लोक खरे उतरले नाहीत हे स्वच्छ दिसले आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, हैदराबाद विद्यापीठात जे काही झाले, त्यात संघविचाराच्या तरुणांनी जे काही केले त्याला अस्थानी उन्माद म्हणून ओळखण्याची नैतिक ताकद तुम्ही दाखवणार कांय़ जे त्यातून बाहेर पडले त्यांच्या कारणांकडे तरी सहृदयतेने पाहाणार कां?

की केवळ अमकातमका अभाविपचा नव्हताच, आमच्यात राजिनाम्याची पध्दतच नाही, अमक्याने राजिनामा दिलाच नाही असलेच सुरू ठेवणार?

प्रत्येकाने अखेर आपापली गृहीतके तपासून पाहायला हवीत.

मेंदू सामूहिक नसतोच. बुध्दीनिर्णय सामूहिक कधीही नसतो.

आपापली तेजस्विता आणि नैतिकता आपणच जपायची असते.

आपणांमधील सुसंस्कृत, नैतिक व्यक्तींना संघविचाराशी लढण्याच्या अभिनिवेशात मी दुखावले असेन तर क्षमा असावी. पण त्यात तुम्हा सर्वांशी वैयक्तिक असे काहीही नाही. तुम्ही तर अजूनही नैतिकतेची आशास्थान आहात.

***

# बेडकांपासून उत्क्रांत

'वेद' हा शब्दच 'विद' म्हणजे 'जाणणे' या मूळ क्रियापदातून निर्माण झाला आहे, आणि म्हणून वेद हा शब्द ज्ञानाशी संबंधित आहे. वेद हा एक ज्ञानसंचय असेल तर तो काही डबक्यासारखा साचलेला नसावा. भारतात ज्ञानविषयक चर्चा, खंडनमंडन या साऱ्या जिवंत प्रक्रिया होत्या त्या मारून टाकायला डोक्याचे डबके झालेली परंपराशरण माणसंच कधीकाळी कारणीभूत झाली. पाठांतरे, उद्धृते देणे, आवर्तने करणे म्हणजे ज्ञानात, विद्येत भर टाकणे नसते. तर विश्लेषक, अन्वेषक बुद्धीने विचार करणे, निरीक्षणे करणे, नवनवीन कल्पनांचा विचार करणे, त्या सिद्ध करणे, पडताळून पाहाणे, अनेक कसोट्यांवर घासून सत्यापर्यंत पोहोचणे अशी मोठी प्रक्रिया असते ज्ञानाची. जगात अनेक ठिकाणी या प्रक्रियेनुसार मानवी बुद्धी कामाला लागली. मानव जीवन आणि मृत्यूही सुखकर व्हावा, मन आणि बुद्धी संपन्न व्हावे म्हणून अनेक प्रतिभावंत, बुद्धीवंत झटत राहिले. यात भारतातले प्राचीन विचारवंतही होते, पौर्वात्या आणि पाश्चिमात्यही होते. एका कालखंडात वेगळा विचार मांडल्याबद्दल पाश्चिमात्य बुद्धीमंतांना, वैज्ञानिकांना छळ सोसावा लागला. पण भारतातील तशाच कालखंडात कितीही वेगळा विचार मांडला, क्रांतीकारक विचार मांडला तरीही कुणाला ठार करण्यात आले, जाळण्यात आले, कारावासात टाकण्यात आले अशी उदाहरणे ऐकिवात नाहीत. तरीही कूपमंडुक व्यवस्थेमुळे साचलेपणा येत गेला.

आणि आता त्यातून थोडेथोडे बाहेर पडू अशी आशा दिसू लागली तोवर- अमकेतमके वेदात नाही म्हणून असत्य म्हणणारी बेडकं टरारून फुगू लागली. डार्विनची मांडणी कुठे योग्य, कुठे चुकीची याचे परिशीलन अजूनही होत असते. सूर्य पृथ्वीभोवती फिरतो, सृष्टी ही ईश्वराने निर्माण केली असे मानणाऱ्या चर्चच्या जुनाट पाईकांइतकेच मठ्ठ लोक आपल्या धर्मसत्तेत नव्हे तर राजसत्तेत कुदकत आहेत.

असत्यपालसिंह यांच्या मठ्ठ वक्तव्यांसकट त्यांच्यासारख्या अनेकांच्या बेताल बडबडीचा समाचार घ्यायला हवा.

कुठल्याही प्राचीन ज्ञानाबद्दल त्या काळाच्या चौकटीत तेवढे मानवाने साध्य केले म्हणून आदर हवाच. पण ते जे ज्ञान सीमित होते तेच अंतिम म्हणून तीच सीमा आपल्याही पायात बेडीसारखी अडकवू पाहाणाऱ्या सर्वांना ठोकरून लावले पाहिजेच.

या संदर्भात सत्तरएक वैज्ञानिकांनी सत्यपालसिंगांची अक्कल काढणारे पत्र त्यांना लिहिले आहे. त्याचा उपयोग काहीच होणार नाही. पण ते लिहिले आहे याची दखल इतरांनी घ्यायला हवी. बिनडोकपणे अनुयायित्व या एका निकषावर सत्तेत चढलेल्या या लोकांची उत्क्रांती- नव्हे अधोक्रांती एक ओरडलं की दुसरं ओरडू लागतं अशा बेडकांपर्यंत झाली आहे. त्यांची डबकी आटवायची आहेत.

***

# लोकशाहीची गाय मारली जाईल...

आपल्याला मान्य असलेल्या निवडक सत्यांचा आणि असत्यांचा जोरदार प्रचार करणे हे स्टालिन, हिटलर, मुसोलिनी या तिघांनीही केले. ओसामाबिनलादेन आणि त्याच्या माळेतल्या तालिबानी सरदारांनीही हेच तंत्र आपल्या अनुयायांत वापरले. पण या सर्वांसाठी केवळ प्रचार हेच एक साधन नव्हते. त्यांच्या विचारतंत्राची दीक्षा लोकांना, अनुयायांना फार गांभीर्याने दिली जात असे. जे अनुयायीही नाहीत पण विरोधकही नाहीत त्यांना भयाची झलक दाखवली जात असे आणि विरोधकांना सातत्याने घाबरवून सोडले जात असे किंवा सरळ संपवण्यात येत असे.

असत्यांचा वापर हा अशा प्रवृत्तींचा फार मोठा आधार होता. जे आहे ते नाहीच आणि जे नाही ते आहेच असे सिध्द करणे राज्यव्यवस्थेत आरूढ झालेल्या अधिकरशहांना सहज शक्य होते.

हिटलरने वंशशुध्दीची मोहीम हाती घेताना पोलंडमधील बुध्दीमंतांना संपवले तेव्हा त्याचा कथित हेतू दहशत पसरवणे हा नव्हता. तर त्याच्या विचारानुसार पोलिश लोकांना बुध्दीच नसते हे लोकांवर बिंबवले गेले. हे लोकांना मान्यही झाले.

आज आपल्या देशात हीच पध्दती वापरली जाताना दिसते आहे. मुस्लिमांना मारायचे नाही. पण ते गरीब गाय मारतात म्हणजे ते वाईट आहेत म्हणून त्यांना मारणे योग्य आहे असे इतर लोकांना सहज पटवता येते आहे. मुस्लिम लोक गोमांस खायचे

थांबले तरीही इतर काही निमित्ते काढून त्यांच्यावर हल्ला करणे सुरू ठेवता येईल. किंवा सरळ ते खातात ती भाजीही गोमांसयुक्त होती असेही पर्यायी सत्य सांगता येईल.

क्रौर्य इतके सहजपणे साध्य होते आहे हे जसे २००२मध्ये गुजरातमधल्या लोकांना कळले तसेच हळुहळू देशभर कळू लागेल. आणि मग भयाची लाल-भगवी सावली भराभर लांबत सर्वदूर होत जाईल.

आता हळुहळू सत्ताधारी पक्षावर टीका म्हणजेच देशद्रोह असे वारे वाहू लागलेच आहेत.

आज भाजपच्या नक्वींनी जे म्हटले आहे... ते भाजपच्या दृष्टीने फार धोरणात्मक महत्त्वाचे आहे. अल्वर येथे झालेल्या दुर्घटनेबद्दल नक्वी राज्यसभेत म्हणाले की असे काही या पृथ्वीतलावर घडलेलेच नाही. त्यावर टीका झाल्यानंतर ते पुढे म्हणाले की हा सारा बनाव आहे. गुंडांनी लोकांना मारले आहे. ते गोरक्षक नव्हतेच. प्रत्येकजण काही गोरक्षक असू शकत नाही.

नक्वींनी इस्लाम धर्म त्यागला असेल तर चांगलीच गोष्ट आहे. यात त्यांचा धर्म आणण्याची काहीच गरज नाही. पण त्यांचे नाव मुस्लिमसादृश असल्यामुळे त्यांच्या मुखे आलेले असत्य- पर्यायी सत्य हे सत्ताधारी गटांना त्यांच्या उपगटांना फार महत्त्वाची मदत करू शकते आहे.

भाजप+संघ+विहिंप+बजरंगदल+गौरक्षक+मठाधिपती+बाबांची गर्दी+तंत्रकुशल प्रचारसेना यांच्या एकत्रित परिणामाने भारतीय लोकशाहीच्या

गायीचा शेंदूर फासून बळी दिला जाईल असे चिन्ह आहे. ते जितक्या आधी ओळखू तितका त्याचा पराभव जवळ येईल. जितके दुर्लक्ष करू तितकी लवकर लोकशाहीची गाय मरणार. आणि हे लोक तिचे मांस मजेत खाणार हे नक्की.

***

# हिंदुत्ववादी खुन्याचा कबुलीजबाब

अलिकडेच एनडीटीव्हीच्या चमूने या खून चढलेल्या गर्दीच्या सूत्रधारांनी, धर्मांध पुढाऱ्यांनी- कोर्टातून पुराव्याअभावी सुटल्यानंतर छुप्या कॅमेऱ्यासमोर ज्या बढाया मारल्या, आपणच झुंडीच्या साथीने या हत्या केल्याची कबुली दिल्याचे व्हिडिओ काढून रिअलिटी चेक या कार्यक्रमातून राष्ट्रीय प्रसारणातून दाखवले.

या दोन विडिओंत बोलणारे दोघे स्थानिक हिंदुत्ववादी होते, आणि त्यांनी जोरात आपल्या कृत्याचे समर्थन केले. त्यांना आपल्या हाताला लागलेल्या निष्पापांच्या रक्ताबद्दल काहीही दुःख नव्हते. होता तो विकृत अभिमान. कॅमेऱ्यासमोर एका मुसलमान मजुराला मारून पेट्रोल टाकून जाळणाऱ्या शंभू रेगरच्या तोडीस तोड असा अभिमान ते दर्शवत होते. शंभू रेगरने स्वतःच व्हिडिओ काढून प्रसृत केला होता- विकृतीची ती पुढचीच पायरी होती. पण कमी तरी तुलनेने कमीच घातक. राकेश शिसोदिया हा हापुरचा खूनी आपल्या निर्दोष सुटकेवर, त्यानंतर झालेल्या जंगी स्वागतावर खूष होताच, पण ‘पुढच्या वेळी असं करताना व्हिडिओ बिलकूल काढणार नाही’ असंही तो सांगून मोकळा झाला. म्हणजे पुन्हा अशाच प्रकारे कुणालातरी मारून हिरोगिरी करण्याची याची तयारी आहेच. मरणपंथाला लागलेला कासिम पाणी मागत होता, ते नाकारलं हे सांगतानाही त्याला आनंदाच्या उकळ्या फुटताना दिसत होत्या...

यासंबंधी झालेल्या चर्चेत आदित्यनाथाचं चरित्र लिहिणाऱ्या शंतनू गुप्ताला या चर्चेत बोलवलं गेलं होतं. तो या व्हिडिओबद्दल, त्यातून प्रकट होणाऱ्या विकृतीबद्दल

अवाक्षरही न बोलता- मॉब लिंचिंगला जातीय स्वरूप देऊ नये असं सुप्रीम कोर्टाने सांगितल्याचं रेटून खोटं सांगत राहिला. आणि हा केवळ कायदा नि सुव्यवस्थेचा प्रश्न आहे असंही. दुसरे भाजपाईं चर्चेत सामील झाले होते. राकेश शिसोदिया म्हणालेला पूर्वी हिंदूंना असं काही केलं असतं, गोहत्येसाठी त्यांनी काही केलं असतं तर त्रास झाला असता- या वाक्याचा आधार घेऊन हे महाशय म्हणत होते की पहा म्हणजे त्यांचे मानसिक खच्चीकरण करत गेल्यामुळे आता हे असं होतंय. या समर्थनाची चढती भाजणी काहीशी अशी होती- गाय ही हिंदूंना पवित्र वाटतेच ना मग कशाला मारावं 'त्यांनी' गायीला, संतापाच्या भरात असं घडू शकतं, पण मुसलमान किती हिंसक असतात, एखाददुसऱ्याला मारलं म्हणजे काही साऱ्या देशात तेच झालेलं नाहीये- उगाच वाढवू नका. या दोघांनीही व्हिडिओत जे दिसलं त्याबद्दल चकार शब्द उच्चारला नाही. शंतनू गुप्ता तर निर्लज्जपणे म्हणाला की हे व्हिडिओ खरे की खोटे ते मला माहीत नाही... संपलं.

तरीही आपल्याला समोर सत्यच दिसत होतं.

या फार महत्त्वाच्या स्टिंग ऑपरेशनमध्ये जो कबुलीजबाब समोर आला त्याचा उपयोग होईल का असा प्रश्न आता समोर ठाकला आहे. ज्या न्यायालयाने पुराव्याअभावी ज्या आरोपींना सोडून दिले होते, ते न्यायालय, ते न्यायमूर्ती हे कबुलीजबाब, या बढाया न्यायपालिकाबाह्य पुरावे म्हणून दाखल करून घेऊ शकतात. तसे ते केले जाईल का. तशी परिस्थिती देशात आहे का. एखादे उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय स्वतःहून सुओ मोटो दखल घेऊन हे पुरावे ग्राह्य

मानून पुन्हा या खुन्यांच्या कबुलीजबाबानुसार त्यांना खूनी ठरवून त्यांचा न्याय करील का?

न्यायालयाबाहेर जर कुणी अपराधाची कबुली दिली असेल तर त्या अपराधासंबंधातील इथर परिस्थितीजन्य पुराव्यांची, साक्षींची छाननी करून तो कबुलीजबाब शिक्षा ठोठावण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी (जे लागू असेल त्यानुसार) न्यायालयासमोर घेतला जाऊ शकतो.

परंतु या बाबतीत अनेक मार्गदर्शक तत्वे घालून देण्यात आली आहेत.

न्यायालयाबाहेरील कबुलीजबाब हा मुळात दुबळा पुरावा मानला जातो. तो न्यायालयीन कसोट्यांवर उतरावा लागतो. असा कबुलीजबाब स्वेच्छेने दिला आहे, सत्याधारित आहे, विश्वासार्ह वाटतो या गोष्टीही त्यात महत्त्वाच्या असतात. आणि ते न्यायालय ठरवते. या कबुलीजबाबाला पूरक असे परिस्थितीजन्य साक्षीपुरावे असावे लागतात. अशा कबुलीजबाबात विसंगती आढळल्यास तो रद्द ठरवता येतो. आणि असा कबुलीजबाब अन्य पुराव्यांप्रमाणेच शहानिशा करून घेतला जातो.

ही मार्गदर्शक तत्वे पाहता यातून कित्येक पळवाटा काढणे हितसंबंधी राज्यव्यवस्थेला शक्यच आहे. त्यामुळे एनडीटीव्हीच्या साहसी पत्रकारितेतून बाहेर निघालेले हे सत्य पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाईलच असे नाही. सत्याचा विरोध करणारे वकील आणि पत्रकार आज या देशात खंडीने आहेत.

या देशातील तिसऱ्या खांबाचे- न्यायपालिकेचे मध्यस्थ समजले जाणारे वकील आणि चौथ्या खांबाचे- पत्रकारितेची अस्त्रे समजले जाणारे पत्रकार या दोन्ही

गटांतर्गत आज उभी फूट पडलेली दिसते आहे. चमचे पत्रकार, चमचे वकील विरुद्ध सच्चे पत्रकार आणि सच्चे वकील. आणि सध्यातरी चमच्यांचा विजय जोरात होतो आहे.

काँग्रेसच्या सत्ताकाळातही चमचेगिरी करणारे पत्रकार होते, युतीच्या काळातही होते. पण आजचे सत्ताधाऱ्यांच्या बाजूचे हिंदुत्ववादी पत्रकार चमचे नव्हे तर ओगराळी बनले आहेत.

काही वकिलांच्या टोळ्या इतके दिवस केवळ गरीब अडाणी जनतेला लुटण्यात गुंतलेल्या असत, आता ते हिंदुत्ववादी झाले आहेत. कन्हैय्या कुमारला पिटणारे, कथुआच्या आसिफाच्या वतीने लढणाऱ्या दीपिका राजावतला धमक्या देणारे हे न्यायपालिकेचे हिंदुत्ववादी मध्यस्थ झाले आहेत.

अशा वेळी न्यायालयांतून सत्याची बाजू लावून धरणारे वकील आणि पत्रकारितेतून वास्तवाची जाणीव करून देणारे पत्रकार हे अल्पसंख्य होत चालले आहेत. या व्यस्त प्रमाणातही लोकशाहीचा, बहुसांस्कृतिकतेचा आत्मा भारतात टिकवून धरण्यासाठी जे लोक बोलतात, लिहितात, सामोरे जातात त्यांचे म्हणणे लोकांनी निदान ऐकून घ्यावे, डोळे उघडे ठेवावेत एवढीच अपेक्षा करण्याइतकी वाईट परिस्थिती आली आहे.

देशाची बहुसंख्या किमान माणुसकी विसरत चालली असेल तर ते भविष्याला लाजिरवाणे ठरेल.

***

# नैतिकतेची ऐसीतैसी

जे काही सभोवार चालले आहे या सर्वांला कारण या देशातील निर्णायक बहुसंख्यांकांची शिथिल झालेली नीतीमत्ताच आहे या विषयी माझ्या मनात शंका नाही. देशात एक असा हिस्सा आहे की ज्याला नीती, बुद्धी, स्वसन्मान याचा विचार करण्याइतकी जगण्याची फुरसतच कधी मिळाली नाही. ज्याला अजूनही सत्तेवर कोण आला, कोण गेला, आणि का आला, का गेला या प्रश्नांवर विचार करायला वेळ नाही, वेळ असला तरीही फारशी साधने नाहीत. तत्वज्ञानात पशुपक्षी आणि लहान मुले यांना निरागस निष्पाप याबरोबरच 'ननैतिक'' (amoral) असे मानले जाते. हा बराचसा मोठा वर्ग तसाच आहे. सांगोपांग विचार करायला मालकीचा वेळ नसलेला वर्ग. आज या प्रकारातील डोळ्यांवर प्रचाराचे भडक फ्लेक्स, कानांवर प्रचाराचे लाउडस्पीकर्स आणि हातात वॉट्सॅप विद्यापीठाचे बोगस सर्टिफिकेट आहे.

आणि दुसरा जो वर्ग आहे तो शतकानुशतके सरंजामशाही, जातिव्यवस्था यांची रसदार फळे चाखत आलेला आहे. साधनसंपत्ती आहे. त्याच्यापाशी ज्ञान आणि माहितीची वानवा नाही. साधनांची अगदीच कमतरता नाही. मालकीचा वेळ आहे. आणि स्वतःच्या विशिष्ट स्थानाचा दुरभिमान पुरेपूर आहे. यात जन्मलेले बुद्धीजीवी जे आजच्या नैतिक पातळीचे निर्देशक आहेत- यात भ्रष्टाचारी बाबू आहेत, जात्याभिमानी पोलीस-जवान आहेत, लबाडी करणारे वकील-डॉक्टर्स-एंजिनीअर्स आहेत. हे लोक आपली स्वतःची ऐहिक विलासाची प्रगती आणि सामाजिक प्रतिष्ठेचे स्थान मिळवणे यापलिकडे त्यांची नीतीमूल्ये फार काही डोकावून पाहात

नाहीत. जे अपवाद जन्मतात घडतात, ते बिचारे एकटे पडतात, एकट्याच लढाया लढतात... आणि आजच्या घटकेला ते फुरोगामी, सिकुलर, लिब्टार्ड ठरतात आणि तरीही ठामपणे आपल्या नैतिक भूमिका बदलत नाहीत.

गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या आणि करोडपती आमदार-खासदारांना नावे ठेवताना, किंवा खोटारड्या उचच्पदस्थांवर टीका करताना त्यांना वश होणाऱ्या आणि निवडून देणाऱ्या या दोन्ही वर्गांकडे पाहिले पाहिजे.

आपल्या नैतिक मूल्यांची घसरण काही आजची नाही. ती गेल्या अनेक वर्षांपासूनची आहे. याची कारणं फार पूर्वीपासून चालत आलेल्या दबलेल्या मानसिकतेतही दडली आहेत.

आपल्याला सत्य बोला-पण कुणाला दुखावू नकाचा डोस पाजला गेलाय आणि तो चांगलाच भिनलाय. म्हणजे सोयीसोयीने सत्य नाही बोलले तरी चालेल हेच अखेर मनात उतरते. आपल्याला ज्येष्ठांचा मान ठेवा हे भरवले गेले- ते ज्येष्ठ मान न देण्यालायक असले तरीही, वयाकडे पाहून त्यांच्या पायांना हात लावा. म्हणजे नाटक करणे महत्त्वाचे हे आपण आपोआप शिकत गेलो.

का लोक निर्भेळ खोटे वागणाऱ्याला, खोटे दावे, खोटा इतिहास, खोटी वचने देणाऱ्याला निवडून देतात आपला प्रतिनिधी म्हणून? कारण एक तर नक्कीच की त्यांना तो आपलासा वाटतो. खोटं बोलण्यात फारसं चूक काय असतं? सगळेच खोटं बोलतात, रोज काही ना काही खोटं वागतोबोलतोच आपण.

खोटं बोलणाऱ्या पंतप्रधानाविरुद्ध क्षोभाचा कल्लोळ का उमटत नाही? प्रचारात खोटं बोललं जाण्यात कुणाला फारसं वावगं कां वाटत नाही? अरे

निवडणुका आहेत, युद्धच आहे ते. माहीतीए ना... प्रेमात आणि युद्धात सारं माफ असतं. आता द्वेषात आणि युद्धात सारं माफ असतं असा नवा फंडा झालाय. आत्ताआत्तापर्यंत जे वर्तन अमान्य केलं जात होतं, जी भाषा त्याज्य ठरवली जात होती ती भाषा लाल किल्ल्याच्या मंचावरूनही यायला लागली, संसदेच्या बाकांवरूनही यायला लागली, तर मग कालांतराने का होईना तिच्या त्याज्य असण्याची धार कमीच होत जाते. पूर्वी ज्याला गटार म्हटलं जायचं ती आता जराशी प्रदूषित नदी ठरते आहे. मान्यता मिळू लागली आहे गटाराला.

गेल्या काही महिन्यांत राष्ट्रीय उच्च पातळीवरच्या सर्व सत्ताधारी नेत्यांचे आणि त्यांच्या पक्षाने चालवलेल्या प्रचारातील असत्य चौफेर वेशीवर टांगले गेले. त्यांच्या मातृसंघटनेच्या काठावरच्या संघटनांनी, जालीय संस्थळांनी चालवलेल्या प्रचारातले असत्य अधोरेखित करण्यात आले. कर्नाटकातील निवडणुकांच्या भाषणांत पंतप्रधानांनी पातळी सोडण्याचीही सर्वात खालची पातळ गाठली. नेहरू भगतसिंगांना भेटले नाहीत वगैरे तद्दन खोटे त्यांना समोर बसलेल्या मेंदू न वापरणाऱ्या जनतेच्या कानात ओतले. पण एक पंतप्रधान देशाच्या इतिहासातील एका महान व्यक्तीबद्दल, एका माजी पंतप्रधानाबद्दल इतकं खोटं बोलतो आहे याबद्दल जनक्षोभ उसळला नाही. विरोधकही आता हां मोदी ना- ते खोटं बोलतातच अशा काहीशा एक प्रकारे मान्य करण्याच्या पायरीला येऊन पोहोचले आहेत. पण मतदाराचं नवल आहे. खोटं बोलणाऱ्या माणसाला नाकारायची गरज त्यांना वाटत नाही. कारण खोटं बोलणं हा त्यांच्याही जगण्याचा भाग झाला आहे? हा एकंदरीत आपल्या मूल्यव्यवस्थेचाच पराभव आहे हे हळुहळू अधिकाधिक स्पष्ट होत जात आहे.

आज आपल्या देशात नुसतेच खोटे बोलणे हे वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवण्यात आले आहे. खोट्याची कलाकुसर करणारा मोठा उद्योगच उभारला गेला आहे. मेक इन इंडिया. एकेक असत्ये घेऊन ती आपल्या पगारी सेनेच्या मार्फत सजवून, मीठमिरी लावून पसरवण्याचे काम चालते. या कामाचा पगार घेणाऱ्यांचे वेगळे. ते केवळ पोटभरू बुणगे सैनिक. त्यातल्या एखाद्या महावीरची सदसद्विवेकबुद्धी जागी होते. बाकी तसेच खांद्यावर बंदुका वाहत रहातात. किंवा पगार न घेता देशाचे भले हे करू शकतील या फसव्या विश्वासापोटी काम करायला घेणारीही फौज आहे, त्यातल्या एखाद्या साधवी खोसलाची सदसद्विवेकबुद्धी जागी होते. पण अनेक पगारी, बिनपगारी लोक असे आहेत की जे हे असत्य आहे, अनैतिक आहे हे स्पष्ट दिसत असूनही डोळेझाक करतात. कारण हे असत्य कालपरत्वे त्यांची अस्मिता बनून जाते. त्यांची ओळख बनून जाते. आपल्या अवतीभवती ही माणसे सहजच दिसतात. भाषेवर उत्तम प्रभुत्व, थोडीफार इतिहासाची जाण, साहित्यिक मूल्यांचे भान असलेली ही माणसे असत्याच्या पकडीत स्वतःची ओळख गडद करू शकतात पण स्वतःचे नैतिक भान गमावून बसतात. ती केवळ एका इतिहासाच्या जोखडाखाली सापडलेल्या वर्तमानाच्या घाण्याभोवती फिरत रहातात. त्यांच्या बाबतीत असत्याचे हीनत्व संपते आणि ती एक जीवनावश्यक कला बनून जाते.

नेत्याने पेट्रोल-डीझेल स्वस्त होऊ दिले नाही, डाळतांदूळ परवडेलसे ठेवले नाही, वचन दिलेली कर सवलतही दिली नाही, पक्षाच्या आय़टीसेल व्यतिरिक्त क्षेत्रात नोकऱ्या तयार झाल्या नाहीत, अतिरेक्यांचा खात्मा झाला नाही किंवा पाकिस्तानला धडा मिळाला नाही हे सारेसारे गौण ठरवण्याची असत्यभक्ती

त्यांच्यात कशी काय भिनत जाते या प्रश्नाचे उत्तर एवढेच आहे की त्यांना सत्याशी देणेघेणे उरले नाही.

आपली संघटना म्हणते तेच सत्य, आपला नेता आणि त्याचा चोपदार जे सांगतो तेच सत्य अशी मनोभूमिका तयार आहे. आणि मेंदू वापरायला वेळ नसलेले, किंवा क्षमता हरपलेले लोक कुणाच्याही सत्यासत्यांनी फरक पडण्यापलिकडे गेले आहेत ही दुसरी मनोभूमिका.

आज सत्याची, सभ्यतेची बाजू लावून धरणारे लोक पप्पू ठरत आहेत. जोराजोरात खोटे सांगण्याची क्षमता नसलेले लोक बिनकामाचे ठरत आहेत हे चित्र जर निर्णायक निवडणुकांतून उभे रहात असेल तर मग सत्य पराभूत होत आहे हे नक्की. निर्लज्जपणे वाट्टेल ते खोटेनाटे नागरिकांच्या तोंडावर मारले जात असेल आणि त्याचा जाब नागरिकांनी विचारला नाही तर त्याची किंमत देशाला चुकवावी लागेल. आज आणि उद्या.

कर्नाटकातील आजच्या सत्ताग्रहणाच्या नाटकापेक्षाही निवडणुकीतून पंतप्रधानांच्या गँगने जे काही केले त्या असत्याचे भान बाळगणे अधिक महत्त्वाचे आहे असे मला वाटते. त्या खोटेपणामागील अनैतिकतेकडे आपण हसून दुर्लक्ष केले तर आपल्या झेंड्याच्या आणि आपल्या ब्रीदाच्या चिंध्या झालेल्या आहेत अशे खुशाल समजावे.

***

# वर्ष संपत असताना...

रविंद्रनाथांच्या दोन कविता वर्ष संपत असताना मनात रुंजी घालत आहेत.

दोन्ही कविता देशासाठी काही मागणाऱ्या, इच्छा व्यक्त करणाऱ्या. एका बुद्धीमान प्रतिभावंत कवीने जे देशासाठी मागितले त्या पलिकडे जाऊन आणखी काय मागावे... त्या दोन कविता लिहिल्याला उणेपुरे शतक लोटले- तरीही अजूनही तेच मागणे मागावे लागते आहे. आता तर त्या मागण्यातील कळकळ अधिकच तीव्र होत चालली आहे.

रविंद्रनाथांच्या १९१० साली लिहिलेल्या- 'चित्तो जेथॉ भयशून्यो 'या कवितेतील आळवणी होती...

चित्त जेथे असेल भयशून्य आणि मस्तक असेल उन्नत

ज्ञान असेल मुक्त

किरकोळ सीमांच्या भिंतीत चिणून

जग नसेल झालेले विदीर्ण खंडित...

शब्द उमटतील सत्याच्या घनगर्भातून अन्,

पूर्णत्वास पोहोचण्यासाठी अथक श्रमांचे बाहू यत्नात राहतील सतत.

विवेकाचा निवळशंख निर्झर नाही जाणार हरवून

प्राण हरपलेल्या सवयींच्या ओसाड खडतर वाळवंटात.

तूच नेशील पुढेपुढे बुद्धीला...

उदारसंतत विचार आणि कृतीच्या मार्गावर.

हे पित्या, जाग येवो माझ्या देशाला... स्वातंत्र्याच्या त्या स्वर्गात.

ही कविता त्यांनी गीतांजली या नोबेल विजेत्या कवितासंग्रहातही अंतर्भूत केली होती.

आणि आज या आपल्या भारतात आपण पाहातो आहोत...

जिवावर बेतलेल्या संकटाचेही सत्य सांगताना जिवाचीच भीती मनांना वाटते आहे. ज्या पेशांमध्ये मस्तक उन्नत ठेवून केवळ सत्याची कास धरायची गरज त्या पेशांतील माणसे झुकायला सांगितलं तर रेंगू लागताना दिसतात. ज्ञान म्हणजे सोलीव सत्याकडे जाण्याचा मार्ग न रहाता, सोयिस्कर सत्य-असत्यांचा सोपान होताना दिसतो आहे. आपापल्या विचारधारांच्या डबक्यांत कोंडलेली चुळकाभर माहिती म्हणजे ज्ञान अशी व्याख्या सहजच होताना दिसते आहे. हा देश कोणे एके काळी साऱ्या जगातील वंश, ज्ञान, कला, विद्या यांना एकजीव करणारी मूस बनला होता- पण आता ‘आपण’ आणि ‘ते’ या भेदाची काटेरी कुंपणे सहजपणे कुठेही उगवून येऊ लागली आहेत. आणि कुंपणांच्या काट्यांना अतीव द्वेषाचे विष माखलेले... सत्याच्या घनगर्भातून शब्द येणे दूर- असत्याच्या दलदलीत रुतलेल्या व्यासपीठांवरून भूलथापांची फेकाफेक राजरोस चालते आहे. सारेच अपूर्ण राहिले

की अर्धवटांचा बाजार जोरात चालतो... असे बाजार दिल्लीपासून गल्लीपर्यंत आहेत.

या देशातील समाजात विवेकाचा विसर पाडण्यासाठीच पीठाधीश झालेले स्वामी, महाराज, बाबा, माँ, साध्वी मंडळी आणि अडचणीतल्या स्त्रिया-बालकांना देहविक्रीच्या धंद्याला लावणारे दलाल एकाच तत्वाच्या आधाराने काम करतात. आणि त्यांना लोकाश्रयाबरोबरच सत्ताश्रयही मिळतो. विवेकाचा निर्झर खळाळण्यापूर्वीच त्याचा चिखल करण्यात निश्चेत रूढी-परंपरा माजत चालल्या आहेत. धर्मनिष्ठेचे देव्हारे माजवले जाताना माणुसकीचा विसर पडतो आहे. बुद्धीनिष्ठा तर दूरच साधीसुधी सहृदयताही तथाकथित धर्माभिमानाच्या पायावर रक्तबंबाळ होते आहे, जिवंत जाळली जात आहे.

बुद्धी पुढेपुढे जात राहीलच- पण ती आज या देशात उपेक्षित आहे. अवमानित आहे. उदारसंतत विचार आणि कृतीच्या मार्गावर जाणाऱ्या प्रज्ञावंतांना हिणवणे हे सातत्याने सुरू आहे. जमेल त्या माध्यमांतून आजच्या सत्ताधाऱ्यांच्या विचारांचे लोक विवेकाचा धिक्कार, विवेकी जनांची खिल्ली उडवणे हे प्रकार अभिमानाने करताना दिसतात. हे एक लक्षणच आहे किडत चाललेल्या समाजपुरुषाचे. विवेकविचारांची कृती करू धजणाऱ्या कुणालाही आज दंडुकेधारी टिळेवाल्यांच्या धमक्या मिळत आहेत. नुकतेच एकाच दिवशी केंद्रीय मंत्री, खासदार अशा लोकांनी ठार करण्याच्या धमक्या दिल्याची, धर्मनिरपेक्षतेचा धिक्कार केल्याची वक्तव्ये वाचायला मिळाली. एक विद्वान आपल्या कार्यक्रमाला गैरहजर राहिलेल्या अधिकाऱ्यांना तुमचा लोकशाहीवर विश्वास नसेल तर व्हा नक्षलवादी आम्ही

तुम्हाला गोळ्या घालू म्हणाले, एकजण धर्मनिरपेक्ष लोकांनी आपल्या रक्ताची ओळख मिटवली म्हणाले... आम्ही घटना बदलण्यासाठीच सत्तेत आलो आहोत म्हणाले, गायींचा व्यापार कराल तर ठार मारू असे एक जण म्हणाले. उन्मादाची बीजे पद्धतशीरपणे पेरत चालले आहेत सत्ताधारी.

भयशून्य चित्त असायचे- त्या देशात रोजची जाग कुठल्या तरी वैचारिक दिवाळखोरीच्या नरकातच येते आहे...

इतिहासाच्या एका कोंदट कोनाड्यात अडकलेल्या मनांची मोट बांधलेल्या एका संघटनेने महाकवी रविंद्रनाथांच्या देशाचे स्वप्न चिरफाळायचा वसा घेतला आहे. पण अशा वेळी रविंद्रनाथांची ही कविताच आपल्याला चिरंतन मूल्यांची आठवण देणार आहे.

रविंद्रनाथांची दुसरी कविता मी आठवते आहे... एकोणिसावे शतक संपण्याच्या अखेरच्या दिवशी त्यांनी ही कविता लिहिली- सन १८९९मध्ये. आणि बरोब्बर शंभर वर्षांपूर्वी त्यांनी ‘राष्ट्रवाद’ या विषयावर पुस्तिका लिहिली होती. राष्ट्रप्रेम आणि आक्रस्ताळा, लबाड संधीसाधूंचा राष्ट्रवाद यातील फरक त्या महाकवीला तेव्हा जाणवला होता. आज त्याचे चटके आपल्याला बसत आहेत. ते म्हणाले होते...

या शतकाचा अखेरचा सूर्य मावळतो आहे...

पश्चिमेकडून जमून आलेल्या लाल-रक्तवर्णी ढगांत बुडतो आहे, द्वेषाच्या आवर्तातून डोकावतो आहे.

राष्ट्रांची खायला उठलेली अस्मिता-

मद चढलेली हांव

स्वतःच्याच निर्लज्ज लालसेतून होईल स्फोट हिंसेचा...

साऱ्या जगालाच गिळंकृत करायला निघालीय ती.

जिभल्या चाटत, चक्काचूर करत, प्रचंड घास करून गिळत,

ती सुजतेय, फुगतेय.

त्या गलिच्छ मेजवानीच्या मध्येच अचानक कधीतरी...

स्वर्गच स्वतः खाली येऊन तिचं हिंस्र हृदय विदीर्ण करून टाकेल.

क्षितिजावरील लालसर प्रकाश तुझ्याकडील शांत पहाटेचा उजेड नाही हे मातृभूमे,

मांसाच्या ढिगांची राख होते आहे चितांवर-

राष्ट्रांचे आत्मगौरवी प्रेम...

स्वतःच्याच वजनाने दडपून आता मरत चालले आहे.

तुझी पहाट होणार आहे, शांतपणे प्रतीक्षा करणाऱ्या पूर्वेच्या अंधारातून.

बुजरी आणि शांत पहाट.

सावध रहा, भारतभूमे.

आण तुझी अर्चना त्या पवित्र सूर्योदयासाठी.

त्याच्या स्वागताचे पहिले गीत येऊ दे तुझ्या ओठी आणि मग गा तू,

ये, हे शांती, देवांच्याच स्वतःच्या कष्टण्यातून जन्मा आलेली पुत्री तू.

ये तुझ्या समाधानाचा अमोल ठेवा घेऊन, शोभू दे हाती तलवार संकटातील धैर्याची,

आणि माथ्यावर असो मुकुट विनम्रतेचा.

माझ्या बांधवांनो, उन्मत्तांसमोर, बलवंतांसमोर लज्जित वाटून घेऊ नका स्वतःला

आपली साधेपणाची शुभ्र वस्त्रे लेऊन ताठ उभे रहा.

तुमच्या माथ्यांवर असो उदार विनम्रतेचा

तुमचे स्वातंत्र्य असो आत्म्याचे स्वातंत्र्य

ईश्वराचे सिंहासन रोजच घडवा आपल्या अभावाच्या विस्तीर्ण क्षेत्रभूमीवर

आणि लक्षात ठेवा, जे भव्य दिसते ते महान असतेच असे नाही

आणि गर्व कधीही चिरकाल टिकू शकत नाही.

ही कविता रविंद्रनाथांनी लिहिली असेल राष्ट्रवादाचे भांडवल करून इतर अनेक राष्ट्रांना, लोकांना नाडणाऱ्या राष्ट्रसत्तांसंबंधात. पण आज आपल्या देशातच कोण राष्ट्रभक्त आणि कोण राष्ट्रद्रोही याचा निवाडा करण्याचा मक्ता घेतल्यासारखे वागणारे सत्ताधारी जिभल्या चाटत, चक्काचूर करत, व्यक्तीस्वातंत्र्याचाच प्रचंड घास करून गिळत, सुजत, फुगत चालले आहेत.

आपणा सर्वांची भारतभूमी त्यांनी भारतमाता ठरवली आहे. मधूनच ते हाळी देतात- वंदे मातरम् म्हणा नाही तर तुम्ही राष्ट्रद्रोही, गायीचं मांस खाणं बंद करा नाहीतर तुम्ही देशद्रोही, आमच्या नेत्याला पूज्य माना नाहीतर तुम्ही देशद्रोही,

राममंदिराच्या बांधणीला पैसा सोडा नाहीतरी तुम्ही देशद्रोही... अमुक करा तमुक करा नाहीतर तुम्ही देशद्रोही. तुम्ही प्रेम करू नका, तुम्ही असे कपडे करू नका, तुम्ही अमक्या दिवशी तमकं करू नका...

अन्य धर्मीयांची या देशातून गच्छंति करणे हेच या देशासाठी श्रेयस्कर हे आज या देशातील धुरिणांची मातृसंस्था कुजबुजत समजावून देत आहे. स्त्रियांनी असे वागावे, असे शिकावे, असे ल्यावे वगैरे उपदेश यांच्या समित्यांतून प्रसृत केले जात आहे. पुरुषप्रधान सत्तेच्या मात्रा उगाळून हलकेहलके पाजल्या जात आहेत. माध्यमांनी फार टोकदार सत्य सांगू नये अशा व्यवस्था अलगद उभ्या केल्या जात आहेत. अशा वेळी रविंद्रनाथांनी केलेली ही दुसरी प्रार्थना आपल्याच देशातल्या बांधवांनी नव्याने मनन करून म्हटली पाहिजे.

शतकभरानंतर राष्ट्रवादाचे भूत उभे करून बहुसंख्यांकांचे प्रतिनिधी म्हणवणाऱ्या लबाडांची दंडुकेशाही या देशात अवतरणार नाही याला आपण बांधील रहावे. राष्ट्रगीताचे कवी गुरुदेव रविंद्रनाथांच्या तेजस्वी काव्याची प्रभा देशावरील काळ्या सावल्यांना कणाकणाने पराभूत करत राहो.

***

# पंचगव्यात विज्ञानाचे समर्पण की तर्पण

हरप्पा संस्कृतीत सापडलेल्या एका मुद्रेमध्ये प्रोटो शिवा म्हणून वा पशुपती म्हणून ओळखली जाणारी एक प्रतिमा आहे. या प्रतिमेतील आकृतीच्या डोक्यावर शिंगांसारखे शिरोभूषण घातलेले दाखवले आहे. काही भारतीय वैज्ञानिकांनाही डोक्यांवर शिंगांसारखे अलंकार घालण्याचा बहुमान दिला पाहिजे. म्हणजे खऱ्या अर्थाने इतिहासरम्यतेला विज्ञानात स्थान मिळून जाईल.

गायीची विष्ठा, मूत, तूप, दही आणि दूध यांचे मिश्रण म्हणजेच पंचगव्याचा वापर मानवी आरोग्यासाठी आणि शेतीसाठी विविध प्रकारे करावा असे प्राचीन ग्रंथांत लिहिले आहे. आणि त्यातील वैज्ञानिक सत्य सिद्ध करण्याच्या हेतूने 'पंचगव्य समिती' स्थापन करण्यात आली आहे.

विज्ञान आणि तंतत्रज्ञान मंत्रालय, अपारंपारिक उर्जा मंत्रालय, जीवतंत्रज्ञान मंत्रालय यांचे सचिव, आयआय़टी दिल्लीचे संचालक, प्रा. व्ही रामगोपाल राव,, आयआय़टीचे ग्रामीण तंत्रज्ञान केंद्राचे संचालक प्रा व्ही के विजय, कौन्सिल फॉर सायन्टिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्चचे संचालक डॉ, रघुनाथ माशेलकर यांच्या मांडीला मांडी लावून असणार आहेत रास्वसंघ आणि विहिंप प्रणित विज्ञानभारती आणि गो विज्ञान अनुसंधान केंद्राचे तीन सदस्य. शिवाय संघसंचालित

विज्ञानभारतीचे संचालक- हो तेच ते 'परम'वैज्ञानिक डॉ. विजय भटकर या समितीचे सहअध्यक्ष आहेत

माना मोडीत निघालेल्या जथ्थ्यात भटकर, मानसिंघका या निष्ठा वाहिलेल्या अपेक्षितांच्या जोडीला डॉ. रघुनाथ माशेलकरही आहेत. यांची आयुष्य सरली तरीही यांची सरकारी मानसन्मानांची हाव संपलेली नाही अशी खेदाने नोंद घ्यावी लागते.

अशा प्रकारे स्थापन झालेल्या समित्यांवर किती खर्च होतो आणि त्यातून काय साध्य होते हा एक विचार करण्यायोग्य मुद्दा असला तरीही या समितीच्या हाती किती कोटींची तरतूद दिली जाते आणि त्या पैशाचा नेमका कशासाठी उपयोग होतो हे सावध राहून पाहिले पाहिजे.

अख्खा आयुर्वेद अनेक आरोग्यसाधनेच्या केवळ अनुभवसिद्ध राहिलेल्या परंतु प्रयोगसिद्ध न झालेल्या दाव्यांनी भरलेला आहे. त्यातील काही औषधयोजना खरोखरच जीवरक्षक आहेत आणि ती औषधे सिद्ध व्हायला हवीत. काही रसायनकल्प जीवरक्षक नसले तरीही परिणामकारक आहेत, पण त्यावर लक्ष केंद्रित करण्यात येत नाही. आयुषवाले फक्त अलोपथीच्या डॉक्टरांना धमक्या देऊन थांबले. की जे अलोपथीचे डॉक्टर्स आयुर्वेदाची शिफारस करीत नाहीत ते देशद्रोही आहेत वगैरे. धमक्या देणे सोयीचे नि फुकाचेच.

परंतु हे सारे संशोधनविषय मागे टाकून केवळ गाय, गाय आणि गाय याच्या भोवतीच विज्ञानप्रयत्न फिरता ठेवण्यामागचा हेतू स्पष्ट आहे. गोमांस खाणारे विरुद्ध गोमांस वर्ज्य समजणारे हे द्वंद्व उभे केल्यानंतर जे हिंसक वळण विहिंपच्या गोरक्षक

कळपाने स्वीकारले त्याने जगभरात छीथू झाली आहे. म्हणून मग येनकेनप्रकारेण गोहत्या आम्ही एवढ्याचसाठी नको म्हणतो हे सांगण्यासाठी हा अट्टहास.

गेल्या दोन वर्षभरांत गोमांसाच्या विषयावरून ऐंशीब्याऐंशी लोक मारले गेल्यानंतर माननीय प्रधानसेवकांनी गेल्या आठवड्यात कळकळीचे आवाहन केले आणि राज्यसरकारांना जबाबदारीची जाणीव वगैरे करून दिली. यानंतर आता पंचगव्य सारख्या समितीची स्थापना झाली आहे.

यातले एक गो अनुसंधानवाले गोवीर मानसिंघका म्हणतात की गाय ही आपल्या संस्कृतीचा मूलाधार आहे. हा शोध कसा लावला हे पाहाण्यासाठी आणि व्हॅलिडेशन करण्यासाठी आता पुरातत्व आणि इतिहासाचीही पंचगव्य समिती नेमायला हवी. म्हणजे आणखी काही पदलोलुप, प्राच्यविद्याकारांनाही अन्नाला लावता येईल.

या क्रांतीकारक कार्यक्रमाचे नाव आहे स्वारोप (SVAROP) सायन्टिफिक व्हॅलिडेशन अँड रिसर्च ऑन पंचगव्य. तीन वर्षासाठी ही समिती काम करणार आहे आणि विविध संस्थांना प्रकल्प देऊन शेणामुताची उपयोगिता सिद्ध करणार आहे.

त्यातही केवळ भारतीय शुद्ध वंशाच्या गायींच्या शेणामुतातून हे फायदे होतात हे सांगायचाही फोकस आहे. कारण विदेशी गायींची हत्या थांबवणे तिकडे कोण मान्य करणार? हा सारा खेळ या समितीतील मान्यवर वैज्ञानिकांना समजत नसेल हे खरे वाटत नाही.

राज्यकर्त्यांच्या मर्जीवर झुलण्याची गरजही संपली अशा वयात असूनही, आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवलेली असूनही डॉ. रघुनाथ माशेलकरांसारखे वैज्ञानिक या साऱ्या सर्कशीत सहभागी होत आहेत हे दुस्सह आहे. हीच वेळ होती सडेतोड प्रश्न विचारण्याची, हीच वेळ होती छद्मविज्ञानाचा वापर शस्त्रासारखा करू पाहाणाऱ्या राज्यकर्त्यांना सडकून काढण्याची.

हळदीघाटाची लढाई लढणारे म्हणून प्रसिद्धीस आलेले हे थोर वैज्ञानिक निराशा करीत आहेत हे नक्की.

त्याच वेळी इकडे काही भारतीय वैज्ञानिक दुसरी लढाई लढायला तयार होत आहेत हे त्यातल्या त्यात आशा जागवणारे वृत्त.

२२ एप्रिल रोजी विज्ञानाला योग्य स्थान मिळावे, पुरेशी आर्थिक तरतूद असावी, धोरणे ठरवताना वैज्ञानिक सत्यांचा विचार करून, त्यांच्याशी सुसंगत अशी धोरणे ठरवावीत, अशा विविध मागण्यांसाठी जगभरातले वैज्ञानिक रस्त्यावर उतरले. डॉनल्ड ट्रम्पच्या विज्ञानविरोधी धोरणांचा कडाडून विरोध करण्यासाठी अमेरिकेत फार मोठ्या संख्येने वैज्ञानिक वॉशिंग्टन डीसी येथे जमले आणि निदर्शने झाली. या वेळी भारतीय वैज्ञानिकांत सन्नाटा होता. पण उशीरा का होईना भारतीय वैज्ञानिकांना जाग आली आहे. भारताच्या इतिहासात हे प्रथमच घडणार आहे. मूलभूत विज्ञान विषयांवरील संशोधनासाठी आर्थिक तरतुदींत काटछाट होऊ नये हा या येत्या निदर्शनांतील महत्त्वाचा मुद्दा असणार आहे, अवैज्ञानिक किंवा छद्मवैज्ञानिक कल्पनांना विज्ञानशिक्षणात थारा मिळू नये आणि केवळ सप्रमाण, प्रयोगसिद्ध विज्ञानच शिकवले जावे ही मागणीही त्यात जोरात पुढे आणली जाईल.

९ ऑगस्ट रोजी 'भारत- विज्ञानाच्या मार्गावरच' या मोर्चाचे आयोजन होत आहे. यात आत्तापर्यंत चाळीस संशोधकांनी, अनेक पत्रकारांनी आणि विज्ञान चळवळींतील कार्यकर्त्यांनी नावे नोंदली आहेत.

या सरकारने उच्च शिक्षणासोबतच विज्ञान संशोधनावरील खर्चाला कात्री लावायला सुरुवात केली आहे. केवळ काही उत्पादने देऊ शकणाऱ्या संशोधनावरच खर्च करण्यापेक्षाही मूलभूत संशोधनाकडे लक्ष देणेही महत्त्वाचे आहे. एकूण उत्पन्नाच्या आठ दशांश टक्के जो काही खर्च विज्ञान संशोधनावर होतो त्यातील बराचसा भाग अणुसंशोधन आणि अवकाशविज्ञान याकडे जातो. हे प्रमाण वाढून ३ टक्केपर्यंत आणावे ही या वैज्ञानिकांची प्रमुख मागणी आहे. विज्ञानसंस्था, विद्यापीठा यांतील संशोधकांची, प्राध्यापकांची पदे न भरून हळुहळू त्यांना शैक्षणिक हलाखीत ढकलण्याचे पाप आधीच्या सरकारनेही केले होते. हे सरकार त्या हलाखीत भर घालेल असे दिसत असताना ही मागणी फार महत्त्वाची आहे.

एकत्र येऊ पाहाणाऱ्या या वैज्ञानिकांत एकवाक्यता आहे छद्मविज्ञानाला मिळणाऱ्या सरकारी आश्रयासंबंधी. उच्च पदांवरील व्यक्ती, मंत्रीगण यांच्या पाठिंब्यामुळे विज्ञानाच्या क्षेत्रात धार्मिक भंपकगिरी सुरू होण्याचा धोका वाढत चालला आहे. गेल्या दोन राष्ट्रीय विज्ञान परिषदांमधून असल्याच भंपक विज्ञानाच्या दाव्यांमुळे विज्ञान क्षेत्रालाच लाज आलेली. आणि तरीही फालतू संस्कृतीअभिमानाच्या मुद्द्यांवर लोक वाद घालत राहिले. आणि ते कोणीही थांबवले नाही. अलिकडेच मध्य प्रदेश सरकारने त्यांच्या इस्पितळांत डॉक्टरांच्या जोडीला ज्योतिषांना बसवून रुग्णांची कुंडली मांडून मगच उपचार सुरू व्हावेत असा

एक नवीन पायंडा पाडायचे ठरवले आहे. कुडमुडी ‘शास्त्रे’ प्रगत विज्ञानाच्या पायात बांधून पुरोहितशाहीचे प्रस्थ वाढवायचाच हा प्रकार आहे हे स्पष्ट आहे. पाळीव मुखंड याचेही समर्थन करतील.

शासनाच्या चुकीच्या विज्ञान धोरणांबद्दल तीव्र निषेध व्यक्त करण्याचे काम वैज्ञानिकांनाच करावे लागेल हे भान अखेर काही वैज्ञानिकांत तरी जागे होते आहे, हीच ती आशा.गायीचे शेणमूत यासंबंधी विज्ञान परिभाषेची मोडतोड ऱ्हांऱ्हीं करून ज्या प्रकारे सरकार पावले टाकीत आहे त्याला विरोध करण्याची तयारी माशेलकरांसारखे ‘पद’दलित मातब्बर दाखवणार नसले तर संशोधकांची नवी फळी त्याविरुद्ध खडी ठाकेल हा दिलासा या येत्या नऊ ऑगस्टला मिळू शकेल.

भारताने देशातीलच नव्हे तर जगातील अंधश्रद्धाळू, अविद्य जनतेला फार फसवी जाळी भेट दिली आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाने दिलेल्या आंतरजालाचा वापर तर खूप भारतीय करतात. पण त्यात जी जाळी ते फेकतात त्यात ज्योतिषशास्त्र, हस्तसामुद्रिक, रत्नशास्त्र, वास्तुशास्त्र असली फेकूगिरी भरपूर असते. आता भारताने जगाला दिलेल्या या फेकूगिरीच्या देणगीत शेणामुताच्या काल्यात दूधदुभतं कालवून फारच मोठमोठाले फायदे होतात या दाव्याची भर पडते आहे. तरीही काही मूठभर विद्वान ही फेकूगिरी ओळखून या सर्वांची किंमत करणार आहेत हे नक्की. या फेकूगिरीत अख्खा देश सामील नाही हे जगाला कळण्यासाठीही हे आंदोलन महत्त्वाचे आहे.

आईन्स्टाईन म्हणाला होता, ‘हे विश्व आणि मानवी मूर्खपणा या दोनच गोष्टी अनंत म्हणता येतील अशा आहेत. त्यापैकी पहिल्याबद्दल मला तेवढीशी खात्री नाही.’

हे आईन्स्टाईनचे वचन सिद्ध करण्याची सध्या अहमहमिका भारतात शासकीय पातळीवरूनच नव्हे तर वैज्ञानिकांच्याही पातळीवरून सुरू आहे, असे नष्टचर्य सुरू झाले आहे.

***

## देश म्हणजे काय हो?

देशात असहिष्णू वातावरण नाहीच असे अनेकजण ठासून सांगत आहेत. आणि त्याच वेळी देशातील असहिष्णू वातावरणामुळे देश सोडून जावे असा पत्नीच्या मनात विचार आल्याचे तिने बोलून दाखवले एवढे सांगणाऱ्या नटाच्या घरासमोर हिंदुत्ववाद्यांची निदर्शने झाली, बहिष्कार टाकण्याची मोहीम सुरू झाली हे नेमके कशाचे द्योतक आहे?!

देश म्हणजे काय याचा विचार करू. देश म्हणजे एक विवक्षित भूमी... तिचे सौंदर्य, तिथल्या नद्या-जलाशय, तिथला समुद्र, तिथले स्थापत्य, तिथले रस्ते, तिथल्या वस्त्या, तिथले पर्वत, तिथले झाडे, तिथली फुलेफळेप्राणीपक्षी, तिथले अन्न, देश म्हणजे त्यातील अनेकानेक लोकसमूह, त्यांचे पेहराव, त्यांचे उत्सव,त्यांचे वैविध्य, त्यांच्या सवयी, देश म्हणजे त्यात असलेले अनेकानेक विचारांचे, मूल्यांचे प्रवाह,देश म्हणजे देशाचे राजकारण, समाजकारण आणि तेथील धर्मकारणही...

आणि तरीही हे संपूर्ण नाहीच. या सर्वांच्या मध्यात व्यक्तीव्यक्ती आणि कुटुंबे आपल्या स्वतःसाठी एक सुरक्षित, सुखद अवकाश शोधतात तो मिळण्याची सर्वात गहिरी शक्यता म्हणजे देश. अनेकदा व्यक्ती केवळ स्वतःसाठीच नव्हे तर आपल्या भावी पिढीसाठी, आपल्या मुलानातवंडांसाठी असा सुखद अवकाश मिळेल का, किंवा आहे त्या अवकाशापेक्षाही सरस अवकाश मिळेल का याचा विचार करतात.

एखादी गावखेड्यात रहाणारी व्यक्ती जेव्हा आपले गाव सोडते तेव्हा ती तिच्यापुरता तिचा देशच सोडत असते. तिला तिथे तिचा अवकाश सुखद होणे कमी

झालेले असते किंवा थांबलेले असते. मोठ्या भावनिक तडफडीनंतरच गाव सोडला जातो. तसाच देशही.

आज मी स्वतः विचार करते आहे- की माझी मुले बरी आहेत दूर आहेत ती. आणि त्यांनी इथे परत यावे वगैरे आग्रह मी आईच्या प्रेमातूनही धरणार नाही. विशेषतः त्यांना मुलगी झाली तर नकोच त्यांनी इथे यायला असाही स्पष्ट विचार मनात येतो. विवेकनिष्ठांना इथे रहावेसे वाटू नये अशी परिस्थिती तर कायमच आहे. धर्म आणि त्यातून निपजलेले वेडाचार पश्चिमेकडेही आहेत. पण ते इथल्यासारखे अंगावर येत नाहीत. इथे रोज उठून बांगेपासून झांजेपर्यंत, पिंग्यापासून धांगडधिंग्यापर्यंत सारेच लाऊडस्पीकरवर असते. इथे कुणीही कुणाची वेडगळ श्रध्दा दुखवायची नाही म्हणून सार्वजनिक अवकाशात चाललेला गोंधळही थांबवू पाहात नाहीत. उलट ते करतात तर आम्ही का नाही अशी सर्वच समाजाची अहमहमिका दिसते. शेजारच्याने बारशाला लाऊडस्पीकर लावला तर आता साखरपुड्याला आपण डीजेच आणू असल्याच प्रकारातली ही अहमहमिका. त्यांनी लावला तेव्हा तुम्हाला त्रास झाला नाही, तेव्हा का नाही बोललात.

काल एक मत असे मांडले गेले की त्या अमक्या मुसलमानाने आपल्या मुलीला बुरखा खाली घसरला म्हणून ठार केले याबद्दल का नाही ते बोलत, तेव्हा का नाही यांची संवेदनशीलता जागी झाली? हे मत युक्तीवादासारखे पुढे करणारांची बौध्दिक क्षमता बारसं नि साखरपुड्यात स्पर्धा करणाऱ्या त्या लोकांसारखीच आहे. अंशात्मक फरक आहे- वस्तुतः नाही.

या साऱ्या प्रकाराला साठ वर्षे सत्ता गाजवणारांनी पायबंद घातला नाही. ना थांबवल्या सार्वजनिक पूजा, ना थांबवले मशिदींवरचे भोंगे. ना थांबवली कुंभमेळ्यांवरची अमाप उधळपट्टी, ना रोखले हाजयात्रेवरचे व्यर्थ खर्च. गेली साठ वर्षे या देशातल्या राज्यकर्त्यांनी सर्वधर्मसमभावाच्या नावाखाली केवळ धार्मिक श्रध्दांचे नको इतके लाड पुरवले. धार्मिक आधाराने वाढणाऱ्या, आक्रस्ताळी बोलणाऱ्या संघटनांनाही अमकातमका समाज दुखावला जाऊ नये म्हणून वाढू दिले.

आपले हिंदुस्थानाच्या अमक्या भागात स्वागत आहे अशा पाट्या विहिंपचे लोक सर्रास लावत होते, मुसलमानांवरचे हीन विनोद शिकवत, द्वेषाची पेरणी करत संघ वाढत होता- पण आम्ही किती चांगले सामाजिक कार्य करते या त्यांच्या मुखलेपाला भुलत त्यांनाही पायबंद बसला नाही. इंदिराबाईंच्या आणिबाणीच्या अतिरेकानंतर जनता पक्षाद्वारे जनसंघाला भारतीय राष्ट्रीय राजकारणात चंचुप्रवेश करू देण्याचे दुष्कर्म कॉन्ग्रेसच्या विरोधातील समाजवादीसाम्यवाद्यांनी केले या राजकीय बावळटपणाला तर देशाच्या इतिहासात तोडच नाही. नंतर पुन्हा एवढ्या बहुमताने सत्ता मिळवूनही काँग्रेसने धर्मवाद्यांचा बाष्कळपणा तसाच चालू दिला. खलिस्तानी चळवळीला मोडून काढण्यात, आसामी क्रोधाला, श्रीलंकेतील वणव्याला विझवण्याची मदत करताना पायाखालचे निखारे मात्र फुलत राहिले. आततायी हिंदू संघटने बहुसंख्येला असुरक्षित वाटायला लावण्यात प्रचारकी सफलता प्राप्त करीत होती हे काँग्रेसच्या नेतृत्वाला जाणवलेच नाही. मुस्लिम आततायी तर सौदीकडे पाहूनच आपले घड्याळ लावत. आणि त्यांच्या मूर्ख वक्तव्यांना लोकशाही व्यवस्थेत ठेचण्याची सोय असतानाही तिकडेही कानाडोळा

करायचा असले गचाळ तंत्र काँग्रेसने वापरले. थोडक्यात काँग्रेसने या दोन उग्र संघटनांना ऊब दिली.

संघ आणि त्यांच्या समविचारी किंवा अधिक उग्र अशा पण भाईबंद संघटनाचा रेटा वाढत गेला. एका राज्यात त्यांच्या हाती सर्वंकष म्हणावी अशी सत्ता येताच काय कसं घडू दिलं गेलं त्याची रक्तलांच्छित नोंद तर इतिहासात कायमची रेखली गेली आहे. आणि या गुजरातच्या विकासाच्या फुगवून फुगवून जो प्रचारकी धुरळा उठवला गेला त्यातून साऱ्या देशातून विस्कळित मते एकवटण्याचा प्रयोग यशस्वी झाला. त्यापूर्वी इथल्या आरक्षणामुळे, इथल्या लांड्यांच्या लाडामुळे देश सोडावासा वाटला असं म्हणणारे कमी नव्हते. त्यांना कुणी देशद्रोही म्हटले नव्हते. आणि अशा तऱ्हेने गेलेल्यांपैकी अनेकांनी या संघटनांची साथ केली आणि करत आहेत. त्यांचे इथले सहानुभाव आज देश सोडण्याचा विचार मनात येतो हे बोलून जे चालले आहे त्याबद्दलची केवळ व्यथा प्रकट करणारांवर ज्या हिंसकपणे व्यक्त होत आहेत, कठोर बोलत आहेत ते पाहून विषादाशिवाय मनात काहीच भरत नाही. इथे विकसनाची संधी नाही म्हणून तिथे जाणारे, इथल्यापेक्षा तिथेच चांगले वाटते म्हणून तिथले नागरिकत्व घेणारे किती आहेत हे मॅडिसनमधल्या भक्त आणि विरोधकांच्या, वेम्ब्लीतील भक्त आणि विरोधकांच्या संख्येवरून लक्षात येतेच. त्यांना कुणीही देशद्रोही म्हणून, इथेच राहून परिस्थिती बदला असे सल्ले देत नाहीत. पण विषादाला शब्द देणाऱ्या अनंतमूर्तींनाही हे विरोधक सोडत नाहीत... हा प्रसिध्द नट तर काय अधिकच सोपा आहे लक्ष्य करायला. त्याच्यावर आग ओकली की आपलेही वलय वाढतेच...

पुरस्कार परत करणारे दांभिक, हिंदुत्वातील हीणावर टीका करणारे हिंदू दांभिक, विरोधाचा सूर लावणारे सारेच दांभिक, भाजपचा पराभव झाला म्हणून आनंद व्यक्त करणारे दांभिक असे बोलणे आता सर्रास या हिंदुत्व सहानुभावींच्या तोंडी रुळले आहे. ही सारी नाझीझम किंवा फॅशिझमचे पदचिन्हे आहेत असे इतिहासाची पाने पाहिलेले लोक बोलतात ते तर खोटे, दांभिक, अनाकलनीय बोलणारेच ठरवले जात आहेत.

काही वर्षांपूर्वी एका शिक्षकांच्या सत्काराला गेले होते. त्यांचे वक्तृत्व, शैक्षणिक कार्य अतिशय उत्तम होते. पण त्यांनी लिहिलेल्या वैज्ञानिक विषयक ग्रंथाचे प्रकाशन करायला आलेले संघाच्या मुशीतून घडलेले एक कायदेपंडित त्यांच्याविषयी बोलताना त्यांची तरूणपणची एक आठवण सांगू लागले. म्हणाले,- अभ्यासवर्ग सुरू होता, आणि एक धिप्पाड, देखणा युवक बोलत होता... त्याच्या कपाळावर अडॉल्फ हिटलरसारखीच एक बट रुळत होती. तेव्हाच मला त्याबद्दल खूप आशा वाटली- की हा तरुण पुढे मागे काहीतरी भव्यदिव्य करणार. पण त्याने शिक्षण क्षेत्र निवडले आणि तिथेही भव्यदिव्य काम केले.

सुचवायचे आहे एवढेच की संघाच्या मऊ कुशीतून, कठोर मुशीतून घडलेले अनेक लोक आपल्यात कुणीतरी अडॉल्फ हिटलर तयार होईल, नॉस्त्रदामसच्या भविष्यकथनातील कठोर नेता तयार होईल या प्रतीक्षेत होतेच. नव्वद वर्षे वाट पाहिली आहे त्यांनी. आणि त्यांना मोदीशहा जोडी गवसली आहे. त्यांच्यात कदाचित् हिटलर होण्याची इच्छा नसेलही- पण भुतावळीला मात्र तीच प्रतीक्षा आहे. लोकानुनयाच्या राजकारणात- येते तीन दिवस हवे ते करा आम्ही सांभाळू असे सांगून

मागे रहाणाऱ्या या नेतृत्वाकडून तसे होणारच नाही याची खात्री नाही. हिंसक उन्माद तर अनुयायांच्या शब्दांशब्दांतून सांडत चालला आहे. शस्त्र धरा, तयारी करा, यांना धडा शिकवा असे सांगणाऱ्या अनेक वेबसाइट्स सुरू आहेत. गोमांस खाणे आणि त्यावरील कट्टर बंदी या विषयावरून नको ते वाद पेटवण्याचा भरपूर प्रयत्न जागोजाग झाला, बळी गेले. तो प्रयत्न एक हत्यार आहे, ते मधूनमधून वापरले जाईलच.

तिकडे मुस्लिम धर्माच्या दहशतवाद्यांनी मूर्खपणाच्या, क्रौर्याच्या सर्व सीमा पार करायला केव्हाच सुरुवात केली आहे. त्यांना खणखणीत विरोध न करणारे आणि व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करणारे इस्लामचे रूढीप्रिय पाईक यां मूर्खांच्या आगजाळीत भरच घालतात.

एकूणात सारीकडचे धर्मवेडे मानवजातीतला गोंधळ अधिकच माजवत चालले आहेत. यात विवेकाचे थोडोथोडे आवाज, त्यांना वाटणारी व्याकुळता याचा गांभीर्याने विचार करण्याऐवजी, भूमिका न घेणारी अधलम्मधलम माणसेही अधिक घाण करीत आहेत. पुढल्या हाका सावधपणे ऐकून इतरांनाही सावध आणि विचारी बनवू पाहाणाऱ्या माणसांचा अधिक्षेप बंद करावे एवढे किमान काम त्यांनी केले तरी खूप झाले. शिक्षित, नागर आणि थोडीफार संपन्नता असलेल्या समाजाच्या बौध्दिक आळसातून ‘धर्म’संकटाचे ढग अधिकच गडद होतील. आयसिसची काळी छाया आहेच, त्यात आता सर्वधर्मीय अविवेकाची काळोखी नको. जे समजत नाही असे वाटते ते समजून घेण्यासाठी प्रयत्न करा. प्रतिक्रियांवर मते बनवणे सोडून द्या. मूळ तपासा. हे साधे सांगणे, मागणे.

***